




# माणूस

एक रुपया • ३ मे १९७५

चित्रवार्ता पुस्तक पुरवणीसह








संपाचा निर्णय या सभेत घेण्यात आला.

संप काळातले दूध वाटप. पोलिस पाहा-यात.





साडेचार हजार कर्मचाऱ्यांची ही कर्मभूमी. तसं पाहिलं तर येथे हजारो फायलींची वसाहत आहे. अनेकांवरचे अन्याय आणि अनेकांचे वशिले या साऱ्यांनाच या फायलींच्या वसाहतीत यावं लागतं. तर नेहमी गजबजणाऱ्या या 'चिवाचिवालयांत सध्या पूर्ण शुकशुकाट आहे. सरकारचं म्हणणं 200-225 कर्मचारी कामावर येतात.
अर्थात संपवाल्यांचं म्हणणं आहे फक्त दहाच.





जहांगीर आर्ट गॅलरीच्या पायऱ्यांवर कर्मचाऱ्यांनी ठाण मांडले. गप्पांचा विषय अर्थात संप. हिशेब अर्थात पगारवाढीचे



संप संपेना.
वेळही जाईना.
तेव्हा घटकाभर करमणुकीसाठी
पत्यांचे डाव असे रंगले.

# "लायन्स" ! मुक्काम महाड



**नेत्रयज्ञ - दंतयज्ञ - उद्घाटन**


डावीकडून (दुसरे) - श्री. नानासाहेब पुरोहित, अध्यक्ष खासदार शां. बा. सावंत, उद्घाटक श्री. अशोकभाई मेहता.

## नेत्रयज्ञ

एका
शस्त्रक्रियेचे
दृश्य



## नेत्रयज्ञ समारोप



कलेक्टर श्री. सुरेशकुमार
भाषण करीत असताना

डावीकडून-
- डॉ. रमेश नाईक.
- श्री. चतुर्भुज मुंदडा.
- श्री. नानासाहेब पुरोहित.
- मुख्य पाहुणे श्री. विरेन शहा.
- श्री. अशोक मेहता.
- श्री. मकवाना
- प्रि. कुलकर्णी
- प्रा. चौधरी
- प्रा. डॉ. ज. से. भन्साळी.

# साप्ताहिक माणूस


| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ३ मे | अंक : अट्ठेचाळीसावा (४८) |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# लायन्स !

## बालगंधर्व रंगमंदिरात 'तमाशा' करणारे !
## महाडात 'यज्ञ' करणारे !

बालगंधर्व रंगमंदिर !

१९ एप्रिल १९७५ म्हणजे भर उन्हाळाच. या रंगमंदिराचं नशीबच थोर. 'नाटक' पहाणं. स्थितप्रज्ञासारखी. काही चालतील, काही पडतील.

रंगमंदिराला सोयरसुतक असायचं कारण नाही.

पण नाटकंच का ?

त्या दिवशी तर रंगमंदिरानं पाहिली चक्क सर्कस.

सर्कस न् पुण्यात ? तीही बालगंधर्व रंगमंदिरात ? येडं की खुळं? दोन्ही पण !! तुम्हीही झाला असतात.

आणि या सर्कशीत काम होतं म्हणजे केलं फक्त सिंहांचं सिंहिणींचं, त्यांच्या गोजिरवाण्या बछड्यांचं ??

Lions ! Lion Ladies !! Leos.

काय कळलं ? नाही ना !! नाहीच कळायचं ! तुम्हा–आम्हाला, संध्याकाळची चिंता अनणाऱ्यांना, रोजगार हमीवर काम करणाऱ्यांना मिलो म्हणजेच 'स्वयमेव मृगेंद्रता......'

तर काय ! बालगंधर्व रंगमंदिरात १९ ला व २० ला 'लायन्स क्लब'चे वार्षिक अधिवेशन झालं, Lions International च्या District 323 D चं. त्यातच २० ला District Governor ची निवडही झाली.

मग त्यात काय एवढं ! रोज कुठे ना कुठे तरी निवडणुका होत असतात. कोणी निवडून येतं, कुणी पडतं. अनेक समाजसेवाभावी संघटनात 'लायन्स क्लब' एक. त्याचं एव्हढं कौतुक ?

का नको ? दुष्काळात गावाकडं सात-आठ हजारांना भाजी-भाकरी देणाऱ्या, डॉ. मोदींच्या मार्गदर्शनाने नेत्रयज्ञ करणाऱ्या 'लायन्स'चं कौतुक आपण केलंच पाहिजे. For the uplift of rural area Lions are...

तर काय सांगत होतो !

सर्कशीत भाग घेतला होता हजार–एक सिंहांनी !!

एम्. टी. पी., एम्. एच्. जे., एम्. आर. जे., एम्. आर. डी., बी. वाय्. पी , बी. वाय्. एन्; एम्. एच्. सी., एम्., टी. सी......... रजिस्ट्रेशनच्या किती तरी गाड्यांनी (फियाट ते डॉज, मर्सिडिज्) त्या दिवशी रंगमंदिराला अक्षरशः घेराव घातला होता.

प्रवेशद्वाराशी, कुल्ल्यावर बसलेला एक हसता सिंह स्वागत करीत होता. समोरच 'कॉन्फरन्स'चा फलक.

आत शामियाना !

उजव्या हाताला व डाव्या हाताला ५–६ गाळे.

एन्क्वायरी, रजिस्ट्रेशन, गिफ्टस्......वगैरे उजव्या हाताला.

डाव्या हाताला पहिल्या गाळ्यात मोठा फलक.

Vote Lion N. B. for D. G.

त्याच्याच शेजारच्या गाळ्यात

Premchand is your choice for D. G.

एन्. बींच्या गाळ्यासमोर उभा राहिलो. हातात त्यांचा परिचय करून देणारी कुणी तरी पत्रकं कोंबली. वर ब्लॉकच छापलेला.

च्यायला, हे तर आपले (डॉ.) नवलभाई.

एकूण नासिक (कश्याकश्यातच ?) मागे नाही म्हणून समाधान.

तिथंच एक गृहस्थ अल्बम चाळत होते. डॉ. शहांनी मालेगाव लायन्सच्या केलेल्या कामांचा सचित्र अहवालच जणू.

गृहस्थ ओळखीचे दिसले.

आपण देशपांडे ?

हो, तुम्ही...!!...

मग जरा चहा वगैरे होतो. गप्पा चालू. माझं लक्ष गाळ्याकडे. जवळजवळ ३० बाय् १५ ची जागा. नवलशहांना मते द्या म्हणून आवाहन करणाऱ्या फलकाबरोबरच जवळजवळ तिन्ही बाजू भरून टाकलेले, डॉ. शहांची छायाचित्रे असलेले मोठे पोस्टर्स. आत पसारा. बरेचसे लिटरेचर. सहज विचार केला. १२ इंच बाय् १० इंच ब्लॉकला अन् हजार एक पोस्टर्सला किती खर्च येईल. पण जमेना. डॉ. शहांची प्रॅक्टिस बरी दिसत्येय. ( परमेश्वर आपले भले करो. )

देशपांडे बोअर होतात. कोणावर तरी गाळ्याची जबाबदारी

सोपवून ' जरा झोपतो जाऊन, काल जागरण झालं. ' ' ठीक ' म्हणत मी निरोप देतो. खरं म्हणजे तिथून देशपांडे जावेत अशी मनोमन इच्छा असते. कारण Premchand यांचा गाळा पाहायचा असतो.

गाळा चांगला सजवलेला. फोटोंनी. बॅनर्सनी. आणि आर्टपेपरवर छापलेल्या जवळजवळ बारा इंच बाय १८ इंचांच्या छायाचित्रांनी. टेबलावर प्रचारपत्रकांचा ढीग. प्रेमचंदांची छबी न्याहाळीत नकळत टेबलाजवळ गेलो.

' Good Morning. ' झिरझिरीत वस्त्रांकिता सस्मित होऊन मंजुळ आवाजात. (पहा, पहा. म्हणे आम्हाला कोण विचारतोय् !)

आणि मीही (उगाचच) हसून लिटरेचर घेतलं.

एक होतं परिचयपत्रक. Your condiate. मध्ये मोठा ब्लॉक. लायन प्रेमचंद आर. बाफना.

आणि दुसरं The Roar (म्हणजे सिंहगर्जनाच ना ?).

दोन्हीही आर्टपेपरवर जवळजवळ २६ पाने. ३७ ब्लॉक्सचा समावेश.

प्रेमचंदांच्या कामाचा आढावा असलेला.

उगाचच नवलभाईंच्या पोस्टरच्या खर्चाचा विचार केला म्हणून खटकलं.

रंगमंदिराला चक्कर टाकली. झाडांवर, भिंतींवर, गाळ्यांवर जिकडे तिकडे आर्टपेपरवर छापलेली उमेदवारांची छायाचित्रे. ' राणी लक्ष्मीबाई झाशीवाले ' देखील सुटल्या नाहीत.

' पेपर कट ' म्हणून ओरडायची सवय लागलीय्. आर्टपेपरवर निर्बंध आल्येत म्हणे. काही तरीच !! सगळीकडे कसं आबादी-आबाद आहे.

एकदम गडबड उडाली. गडबड म्हणजे धावपळ. डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट, इंजीनिअर, कंपनी रिप्रेझेंटेटिव्हज, उद्योगपती...वगैरे वगैरे. चार आकड्यात मासिक हिशेब मांडणारी ' माणसं ' डोळ्या-पुढे आणा अन् त्यांची धावपळ कशी असेल ते पहा.

रंगमंदिराशी लायन्सचा थवा (?) एका सुंदरशा गाडीतून एक ' गोरा आदमी ' उतरला. चौकशी केली. सांगणाऱ्यानं आधी दोन आठ्या मारल्या कपाळावर. मग हळूच (त्याचं त्याला तरी ऐकू गेलं ना ?) Mister Limb, Director & Lions International !!

अशा या आंतरराष्ट्रीय ' लायन 'चं स्वागत पुण्याच्या ' हत्तीनं ' (की गजराजानं ? हो, लिंब केवढे मोठे, हत्ती म्हटलेलं देशी लाय-न्सला कसं आवडावं ?) केलं. सोंड उंचावून. थोड्याच वेळात ताफा रंगमंदिरात लपला. आम्ही आपले बाहेर.

गाळ्यांच्या प्रवेशद्वारात (उन्हं लागू नयेत म्हणून ?) उंची सिल्कच्या पिवळ्या-निळ्या टोप्या घातलेली मंडळी. त्या टोप्यांवर Premchand for D. G. विणलेलं. महिलांच्या उंची वस्त्रांवर, काहींच्या प्रेमचंद तर काहींच्या नवलभाई (फोटोरूपाने) स्थानापन्न. (एकेकाचे नशीब, दुसरं काय !!) बच्छड्यांनी तर मोठ्या बॅन-र्सच्याच टोप्या केलेल्या. विदुषकी टोप्यांसारख्या. (अशा टोप्यांना दुसरी संज्ञा असेल तर ' विदुषकी ' शब्द मागे घेऊ.) मंडळी मोजकीच. ओळखीचं कुणी नाही. म्हणून एका गाडीच्या आडोशाला आलो. सिगरेट पेटवली. एकही गाडी अशी नव्हती की जिच्यावर शहा किंवा बाफनांचे मोठमोठे स्टिकर्स नव्हते.

झुरके मारत असतानाच ५-६ वर्षांची दोन भिकाऱ्याची पोरं ' साएब, ओ साऽऽएऽऽब ' करत छेडू लागली. काही केल्या ती हटेनात.

एवढी बडीबडी मंडळी सोडली न् ही कार्टी माझ्या (सारख्या)-कडे काय मागतायत् ? शेवटी त्या अलिशान गाडीचा आधार सोडला न् झाडाखाली बसलो. पोरं कटली ती पुन्हा आलीच नाहीत.

आत समारंभ सुरू झाला होता. ओळखीची काही मंडळी भेटत होती. ' इकडे कुठे ?' म्हणून विचारत न् येतो म्हणून जात. तेव-ढ्यात सटाण्याची मंडळी रिक्षातून उतरतात.

' काय बाळासाहेब, केव्हा आलात ?' मी.

' काल रात्री. '

' तुम्ही लायन का ?'

' हो. '

' जा न् आत. समारंभ सुरू झालाय्. '

' आम्हाला कोण विचारतो ! ××× यांनी पैसे घेतले न् मेंबर केलं. नाही तर आम्ही कशाला या सुटबूटवाल्यांच्याबरोबर येतोय् ?'

' का बरं ?'

' अहो, आम्ही किर्लोस्कर कंपनीचे मेंबर. दिवसभर हातात नांगर न् उशाला पाभर. बी-बियांण्याची ऑर्डरही द्यायची होती. म्हटलं थोडा वेळ इथं येऊ. ' गप्पा चालू असतानाच नासिकच्या लायन्स क्लबचं एक बडं प्रस्थ आलं. (इंटिमेट, की पात्राचा भपकारा !) सिगरेट ऑफर केली न् तोवर गप्पा चालू. स्वतःला पुढारी समजतात. भाषणबाजी नेहमीचीच.

' का हो, लायन्स क्लबची फी किती ?'

' एकशे तीस रुपये वार्षिक '...' या देशात सुमारे ५० हजार लायन्स आहेत. (सिंहांची संख्या घटली म्हणणाऱ्यांनी शक्य झाल्यास नोंद घ्यावी) आत्ता उद्या जी निवडणूक आहे ती मुंबईवगळता महाराष्ट्रातील सर्व ' जिल्हे ' (म्हणजे आपले) मिळून जो डिस्ट्रिक्ट ३२३ डी आहे. त्यातल्या मेंबरांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर निवडून द्यायचा. म्हणजे तसा मतदारसंघ मोठा आहे फिरायला. पण तेवढी ताकद असलेलेच उभे राहाणार....तर काय लायन्सची समाज-सेवा तुम्हाला माहितीच आहे. (वा...वा...हे काय सांगणं झालं ?) जवळ जवळ ६५ लाख रुपये देशातल्या लायन्सची वर्गणीच जमा होते. बरं, ह्या संस्थेच्या शाखा जगभर आहेत. लायन्स इंटरनॅशनल. संलग्न फी म्हणून सगळ्या लायन्स क्लबला ' इंटरनॅशनल 'ला पैसे पाठवावे लागतात. तेही डॉलर्समध्ये. (वा ! परकी चलन नियमांचा विजय असो !!)...बरं का ! बाफना म्हणजे असं तसं नका समजू मिस्टर. मी नासिकचा असलो म्हणून काय झालं. आपल्याला उमेद-वार ' राईट ' कोण ' रॉंग ' कोण कळत नाही का ? '

.. ...' जरा पाणी पिऊन येऊ का !' वैतागून विचारलं. त्यांची सिगरेटही संपली होती. लायन ××× रंगमंदिरात गेले. समोरून

**रघुवीर मुळे**

दोन पाेजिरवाणी बछडी हातात (क्वालिटी ?) आॅईस्क्रीमच्या काडया चोखत आली न् सावलीला थांबली. दुधी ओठानंच एक-मेकांशी फडर्या इंग्रजीतून त्यांचं गुलूगुलू चाललं होतं. मघाशी मला 'साऽऽएऽऽब' म्हणून सतावणारी दोन पोरं त्यांच्याकडं आशाळ भूतपणे पाहत होती. त्या बछड्यांपैकी एकानं अर्धअधिक आईस्क्रिम असलेली स्टिक फेकून दिली. ही दोन्ही पोरं एकदम त्या स्टिकवर झेपावली. त्यातल्या एकाचा पाय आइस्क्रिमवर पडला न् ते पोरगं घसरलं. दोघंही एकमेकाकडे दीनवाणेपणे पाहत होती. बछडी हसत होती. बोलत होती...'Oh...silly!' मला वाटतं, तो लंच-ब्रेक असावा.

लायन मिस्टर ××× (नासिककर) यांना पुन: गाठलं. म्हटलं, वैतागून चालणार नाही. यांच्याशिवाय लायन म्हणजे काय, कोण सांगणार!!

'अरे, तुम्ही अजून इथेच उभे?'

'हो.' मी.

'काय विशेष?'

'काही नाही. नाशकात कंटाळलो. म्हटलं, एक–दोन दिवस इथं येऊ.' मी.

'म्हणजे मजा म्हणूनच ना!' (डोळे किलकिले करून!)

'...म्हणजे...तसंच!' मी.

'मग चला, मला सोडायचं नाही...' लायन ×××

दुपारी दीडएकचा सुमार. घामानं निथळत होतो. मी त्यांना रस घ्यायचा आग्रह केला. असल्या गोष्टीत आपल्याला रस नाही, अशी कोटी करून त्यांनी स्वत:च आपल्या कोटीला दाद दिली. 'बिअर मारू' म्हणून गेलो.

एक उंची हॉटेल!

(पुणेकरांनो, नाव सांगितलंच पाहिजे का? अशी सहा हॉटेलं रिझर्व्ह होती म्हणे!)

दुसरा माळा, रूम नंबर सहा! (म्हणजे २०६)

लायन ××× मला तिथं घेऊन जातात. आमचं स्वागत तर चांगलं होतं आणि मग 'मेसेज' दिले–घेतले जातात. लायन मला घेऊन रिक्षानं एका दुसऱ्या हॉटेलात.

प्राथमिक गप्पा चालू. बिअर डोक्यात भिनू लागलेली. पुढारी लायन लाइनीवर येतात. भाषणबाजी सुरू. '...तर काय, आम्ही फक्त ६५ रुपये भरले. त्यात दोन दिवसांचं चांगल्या हॉटेलात राहणे, लंच, डिनर, गिफ्टस्. (उजव्या हाताचा अंगठा तोंडाजवळ उलटा नेऊन) हां...ह्याचा मात्र खर्च आपला.' मी धास्तावलो.

'मला आता नको.' मी सावरलो. पण पुढारी लायन म्हणतात

'डोण्ट वरी. बिअरचे पैसे तुम्ही देऊ नका, मी देणार नाही.'

'मग काय तमाशा मांडता?' मी.

'मांडलाय, मांडलाय, मांडणाऱ्यांनी मांडलाय. निवडणूक म्हणजे तमाशा. आपल्याला काय त्याचं?'

'म्हणजे? माझ्या लक्षात नाही आलं.' मी.

'अहो, उमेदवार म्हटला की खर्च आलाच. महाराष्ट्रातल्या २६ जिल्ह्यांच्या लायन्स क्लबना भेटी देणं, फिरणं, पार्ट्या झोडणं, त्यांची (मेंबरांची) व्यवस्था (?) करणं, मतं मिळवणं न् निवडून येणं. आपण ही फक्त बिअर पितोय. तेही उन्हं आहे म्हणून. संध्याकाळी भेटा. स्कॉच् देईन स्कॉच्!'

'भेटतो की, वा, तुम्ही असल्यावर काय कमी?' मी.

'कमीबिमी नाही, पण...तर काय...उमेदवार निवडणं कठीणच. अहो, तांदळात कोळपी न् बासमती निवडून काढता येईल; पण शहा न् बाफना...दोघंही चांगलेत.'

'आता ही पार्टी कोणाची?' मी बिअर ग्लास उचलून हातात धरला.

'××××ची. अन् मी मात्र माझं मत त्यांनाच देणार. म्हणजे त्यांना एकदम दहा मतं मिळणार. कालपासून मला काही म्हणजे काही कमी पडू दिलं नाही, महाराज!! आपल्याला समजतं की नाही, उमेदवार 'राईट' कोण? 'रॉंग' कोण?'

...भरपेट जेवून आम्ही बाहेर पडलो. मी तडक भाग्यश्री लॉज, रूम नंबर २, डेक्कन जिमखाना गाठला. पाहिलं तेवढं बस. स्कॉच-बिच नकोच. जाम ताणली न् रविवारी सकाळी गंधर्व रंगमंदिरात दाखल!!

विदेशी संगीतांच्या धून. श्रीमंतीचं जेवढं म्हणून वैभव दाखवता येईल तेवढं सोनं–लेणं ल्यायलेले स्त्री-पुरुष. कऱ्हाड ते वऱ्हाड रजि-स्टर्डच्या गाड्या. साऱ्यात आगळा उत्साह. हाय...हॅलो...बॉबी... न् काय न् कायचा चीत्कार. पुन: एकदा गाड्यांनी रंगमंदिराला घेराव घातला. समोर 'लाल' पोस्टर– 'Save Petrol...एक लिटर पेट्रोल वाचवा, त्याने दहा किलो धान्य वचत केल्याचे राष्ट्र-कार्य होईल–' बापुडवाणे उभे होते.

रंगमंदिरात कार्यक्रम सुरू झाला. स्वर्गवासी झालेल्या लायन्सना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली (असं कळलं) आणि बाहेर रंग-मंदिरातल्या रंगमंदिरातच १०–५ उच्चवर्गीय महिला, १०–१२ पुरुष (फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन), हातात प्रेमचंद बाफनांचे बोर्ड घेऊन मिरवणुकीने चाललेले.

'Vote for?' (नाजुक) गर्जना.

'Premchand.' (जरा पुरुषी).

आणि त्याच स्टाईलदार नवल शहांची पुढारी लायन ××× मात्र कोणत्याच मिरवणुकीत दिसले नाहीत म्हणून कुतूहलाने बाजूला पाहिलं लगबगीनं ते येत होते. हातात छानपैकी प्लॅस्टिकची पिशवी न् तांबड्या आवरणात प्रेझेंट्स्.

'का हो, कुठं निघालात?'

'गाडीकडे.'

'हे काय?'

'वा! सगळ्या लायन्सना प्रेमचंदजींनी दिलंय.' मी कुतूहलानं पाहिलं. 'कार स्वच्छ राहण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू' त्यात होत्या. स्पष्टीकरण कशाला? Mistairsprayer सहित. म्हणजे त्या प्लॅस्टिक बॅगच्या प्रेझेंटची किंमतच किमान ३० रुपये होती. १ हजार लायन्सला प्रत्येकी एक पिशवी.

...बापरे!! हिशेब जुळत नव्हता. मनातल्या मनात आकडा लाखावर गेला. चक्रावून गप्प. पुढाऱ्यांची टकळी चालू.

'का हो, तुमच्या त्या लालजी पाटलाने म्हणे झेड. पी.त दोन आदिवासी मेंबर फोडले, खरं का? मी ऐकलं, दोन-दोनशे दिलेत म्हणून.'

'मी बरेच दिवस बाहेर आहे, मला माहीत नाही.' मी.

'नाही, पण तुम्ही काही म्हणा, म्युनिसिपालिटी काय न् झेड. पी. काय, अगदी घाणेरडं राजकारण. काय ती माणसं, काय त्या निवडणुका, काय ते अविश्वासाचे ठराव न् मेंबरांची पळवापळवी. कुठून आणतात एवढे पैसे देव जाणे!' लायन ××× ◻

# महाडात अनेक वर्षांत असे विधायक कार्य झाले नव्हते

महाडच्या लायन्स क्लबने, मुंबईतल्या काही संस्थांच्या सहकार्याने दि. १ मार्च ते ८ मार्च या सप्ताहात महाडला नेत्रशिबिर आणि दंतयज्ञ आयोजित करायचे ठरविले. क्लब नवीन होता. फेब्रुवारीतच त्याला लायन्स इंटरनॅशनलकडून चार्टर मिळाला होता. त्यामुळे उत्साहाला उधाण आले होते. माझ्या घरासमोरच्या इंग्रजी शाळेतच शिबिर भरायचे होते. त्यांमुळे नेत्रशिबिर हा प्रकार जवळून पाहता येणार होता. शिबिरासाठी वीसेक हजार रुपये जमवायला हवे होते. जनतेकडून देणग्या मिळविण्यासाठी, गावातील प्रतिष्ठित डॉक्टर्स दारोदारी हजर होऊ लागले. जी मंडळी व्हिजिटशिवाय दुसऱ्या कुणाच्या दारी कधी गेलेली पाहिली नव्हती, ती मंडळी कमी अधिक देणगी मिळविण्यासाठी देणगीदारांशी हुज्जत घालीत होती.

१ मार्च रोजी शिबिराचे उद्घाटन झाले. नगराध्यक्ष आमदार श्री. नानासाहेब पुरोहित समारंभाचे अध्यक्ष होते तर खासदार श्री. शं. बा. सावंत प्रमुख अतिथी म्हणून समारंभाला आले होते. लायन्स क्लबच्या निमित्ताने गावातील दोन प्रबळ विरोधी राजकीय व्यक्ती एका व्यासपीठावर आल्या होत्या. पुष्पगुच्छांची अदलाबदल करून त्यांनी आपले सहकार्य शिबिरामागे उभे केले.

पहिल्या दिवशी रुग्णांची प्राथमिक तपासणी होती. त्यात मुंबईचे डॉ. वझे, डॉ. नरवणे, डॉ. सामंत, डॉ. नेने यांच्या नेतृत्वाखाली गावातील डॉ. नाईक, गोखले, देशमुख, गांधी, गाडगीळ, जोशी, सुर्वे आणि सरकारी डॉ. गरुड यांनी भाग घतला. शिबिराला नगरपरिषदेचे, पंचायत समितीचे, जिल्हा परिषदेचे चांगले सहकार्य लाभले होते. शनिवारच्या एका दिवसात ७०० रुग्णांची तपासणी आटोपून १७८ रुग्णांची मोतिबिंदूच्या ऑपरेशनसाठी निवड झाली. बाकीच्यांना औषधे देऊन निरोप देण्यात आला. या १७८ पैकी पॅथॉलॉजिकल टेस्टमध्ये आणखी दहा गळले. कुणाला मधुमेह होता म्हणून. कुणाचा रक्तदाब अधिक होता म्हणून. रविवारी १६८ रुग्णांची ऑपरेशन्स पार पडली. त्यांत ७० स्त्रिया आणि ९८ पुरुष होते. तीन रुग्णांना नेत्रारोपण शस्त्रक्रियेसाठी लायन्सच्या खर्चाने मुंबईला जे. जे. हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले.

रुग्णांची व प्रत्येकाबरोबरच्या अटेण्डण्टची राहण्याची व भोजनाची सोय क्लबने केली होती. गावातील प्रतिष्ठितांच्या बायका रुग्णांना वाढण्याची कामगिरी करीत होत्या. भोजनाचा दर्जा उत्तम होता, असे बोलले जात होते.

दि. २, ३, ४ मार्च या तीन दिवसांत नेत्रशिबिराच्या जागीच डॉ. लाभशंकर शुक्ल नामक जामनगरच्या आयुर्वेदिक कॉलेजातील एका प्राध्यापक महाशयांनी सहा-सातशे रुग्णांचे दुखरे दात विनाकष्ट काढण्याचा सपाटा लावला होता. या डॉक्टरांचे स्किल मोठे पाहण्यासारखे होते. बघता बघता ते दात उपटून काढीत आणि रुग्णाच्या हातावर ठेवीत. तीन दिवसांत जवळजवळ दोन हजार दात या गृहस्थाने काढले. नाव लाभशंकर असून रुग्णांकडून अगर लायन्स क्लबकडून कुठल्याही प्रकारच्या लाभाची अपेक्षा या गृहस्थाने धरली नाही.

पण या ऐकीव माहितीवर माझे समाधान होत नव्हते. मला नेत्रशिबिरात उपचार करून घेतलेल्या वृद्ध रुग्णांशी बोलायचे होते. तेही शिबिराची संचालक मंडळी सोबत नसतांना. पण रुग्णांच्या अशा मुलाखती वार्डावार्डांमध्ये फिरून घ्यायच्या तर त्याला शिबिर संचालकांची अनुज्ञा हवी. त्याकरता मी शिबिराच्या संयोजनकक्षेत गेलो.

'या या-' लायन प्रेसिडेंट श्री. चतुर्भुजशेठ मुंदडा यांनी स्वागत केले आणि लगेच एका गृहस्थांकडे वळून ते म्हणाले,

'प्रोफेसरसाहेब, यांची ओळख करून देतो. हे अशोकभाई मेहता. सायन लायन क्लबचे प्रेसिडेंट. आमच्या नेत्रशिबिराचे मार्गदर्शक हे. शुक्रवार (२८-२-७५) पासूनच गृहस्थ इथे येऊन राहिला आणि हरेक गोष्ट करायला पुढे धावतोय. त्यामुळे आमच्या लायन्सपुढे सेवेचा एक आदर्शच उभा राहिला आहे.'

'डोण्ट टेक हिम सीरिअस्ली. ही इज इन अ हॅबिट ऑफ हायटनिंग द पर्सन टु स्काईज.' अशोक मेहता म्हणाले आणि त्यांनी मोठ्या सौहार्दाने हस्तांदोलन केले.

शिबिराच्या आवारात सर्वत्र स्वच्छता होती. नगरपालिकेच्या फायरफायटरने सर्वत्र पाणी मारून गारेगार करून टाकले होते. 'रुग्णांनी आपला चहा घ्यावा' अशा सूचना ध्वनिक्षेपक देत होता. अशोकभाईंनी माझ्या खांद्यावर हात टाकला. म्हणाले,

'या प्रोफेसरसाहेब. रुग्णांची कशी व्यवस्था आम्ही ठेवली आहे ते पाहून घ्या.'

त्यांच्याबरोबर मी वार्डावार्डांतून फिरत होतो. डॉक्टर गोखले, डॉ. सुर्वे-नर्सेसचा ताफा बरोबर घेऊन रुग्णांची चौकशी करीत सकाळची राऊंड घेत होते. त्यांचे रुग्णांशी चाललेले संवाद मी ऐकत होतो. डॉ. गोखले मोठे विनोदी. त्यामुळे या संवादांना निराळी रंगत होती-

'काय, बेस हाय ना?'

'व्हय जी.'

'घरी जावंबिवं वाटतं का नाय?'

'ह्य बेस हाय. हतून कदी जावां लागंल डॉक्टर?'

'कां ? घरी परत सुनेच्या हाताखाली जायाचं म्हणून दुख होतंय?'

'नाय वा !'

'काय चंद्राबाई ? कारभारी नाय ना आला चौकशीला ?आंधळी बाईल नको म्हणतो ?'

'नाय वा. तसं कशापायी ?'

'करबेलकर–कसं ?'

'डोकं वाईच दुखतं ?'

'शांतपनी न्हायची त्याला सवय नाय करबेलकर.'

'मुक्ताबाई, नातवाचं बरं हाय ना ? सून कुठं गेली ?'

'नदीवर. पाच रुपये हरवले तिचे–धवायला गेलीती तवा.'

'येंधळीच हाय तुजी सून.'

'नाय. चांगली हाय. तान्या पोराला घीऊन माझ्यासंग हतं आलीया.'

डॉक्टरमंडळी इतक्या आत्मीयतेने चौकशी करीत होती, हे पाहून मला नवल वाटले. अशोकभाई मला कॅम्पची, रुग्णांची, त्यांच्या तक्रारींची, स्वयंसेवकांची सारी माहिती देत होते.

या उमद्या माणसाजवळ, 'तुम्ही कुणी सोबत नसताना मला या रुग्णांशी बोलाचंय' असे सांगून त्याच्यावरील अविश्वास दाखवावा असे वाटेना.

स्वच्छ चुडिदार सुरवार, वर नेहरू शर्ट, पायात कोल्हापुरी वहाणा अशा साध्या पोषाखातला, उंचनिंच गोरा, आणि स्मार्ट असलेला हा अशोकभाई. त्याची पर्सनॅलिटिच काही आगळी होती. रुंद कपाळ, उलटे मागे फिरवलेले लांब केस, भरदार मिशा यामुळे तो राजबिंडा वाटत होता. मी त्याला विचारले,

'तुम्ही काय करता ?'

उत्तरादाखल त्याने आपले कार्ड माझ्या हाती ठवले. त्यावर लिहिले होते, अशोक मेहता, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मॅनेजर, मुकुंद आयर्न ॲण्ड स्टील्स कं., मुंबई.

'अशोकभाई, एक विचारू ?'

'या रुग्णांच्या आम्ही कुणी बरोबर नसताना तुम्हाला मुलाखती घ्यायच्या आहेत !'

मी चाट पटलो. विचारले,

'तुम्हाला कसे कळले ?'

खिशातून 'प्रज्ञा' या जिल्हा साप्ताहिकाचा ताजा अंक काढून अशोकभाई म्हणाले,

'यातलं लेखन तुमचंच ना ? तुमच्या मनातले संदेह तुम्हीच रुग्णात फिरून घालवावेत असे मला वाटते. आपण केव्हाही वार्डा-वार्डातून फिरा. आमची हरकत नाही. किंबहुना लायन्सबद्दलचे गैर-समज दूर होण्याच्या दृष्टीने ते आवश्यक आहे.' अशोक मेहता खुषीत आले की, हिंदीत बोलत. गड्याची वाणी मिठ्ठास होती. वृत्ती दिलखुलास होती.

त्यांचे आभार मानून मी निघालो. दुसऱ्या दिवशी रुग्णांच्या मुलाखती घ्यायच्या असे मनाशी ठरवले होते.

दुसऱ्या दिवशी मी वही-पेन्सिल घेतली आणि सरळ नेत्र-शिबिराच्या एका वार्डात शिरलो. वार्डात दाटीवाटीने रुग्णांच्या पथाऱ्या पसरल्या होत्या. प्रत्येक रुग्णाला कॉट पुरवणे वा अधिक जागा देणे शाळा चालू असल्यामुळे, शक्य झाले नव्हते. शाळेने काही क्लास रूम्सच शिबिरासाठी दिल्या होत्या. प्रत्येक रुग्णाच्या डाव्या वा उजव्या डोळ्याला बँडेज बांधलेले होते. मी आत शिरताच एकजण म्हणाला,

'डॉक्टर, हे सैल झालंय हो.' दुसऱ्याने त्याला दटावले.

'गप रे. हे सायेब डॉक्टर नव्हंत.' मी एका गृहस्थाच्या बिछान्याशी बसलो. विचारले,

'नाव काय आपलं ?'

'माझं ? कृष्णाजीराव गंगाजीराव भोसले' मी काही लिहून घेतो आहेसे पाहून त्याने थांबत थांबत नाव सांगितले.

'राहणार ?'

'तिसंगी. खेड तालुका.'

'म्हणजे खोपीजवळची तिसंगी.'

'हां. तिसंगीजवळ खोपी आहे.'

'तुम्ही भोसले म्हणजे अमृतराव भोसल्यांपैकीच का ?'

'तो भावबंधच आमचं.'

'तुम्ही सध्या काय करता ?'

'मी मिल्ट्री पेन्शनर आहे. सॅपर्स-मायनर्समधी होतो. कोंडवीच्या कॅ. विक्रमराव दरेकरांनी मला लष्करात नेलं.' तो आणखी माहिती देण्याच्या मूडमध्ये येतोयसे पाहून मी विचारले,

'कुठल्या डोळ्याचे ऑपरेशन झाले ?'

'या उजव्या.'

'चांगले केले का ऑपरेशन ?'

'हे काय विचारवा राव ? ही सारी देवमाणसे बघा. ऑपरेशन छान केले. रोजी तीनदा विचारपूस करतात. दोन वेळा चहा, दोन वेळ जेवण – झाक व्यवस्था आहे.'

'तुम्ही ऑपरेशनला इथे का आलात ? मुंबई–पुण्याला जाऊन ऑपरेशन करणे शक्य होते तुम्हाला.'

'शक्य म्हणजे, आता दगडावर दगड घालून वयेलं असतं. पन् ते कठीणच. शिवाय मुंबईच्या इस्पितळाचा चांगला अनुभव नाही साहेब. इथल्या नर्सबाई किती प्रेमळ. पोरगी बापाचं नाही करायची इक्तं.'

'पडा-स्वस्थ तुम्ही.'

मग भेटले चांभारखिंडीचे तुकाराम लक्ष्मण पालकर. शेतकरी. दोन्ही डोळ्यांनी न दिसणारा. कल्याणला ऑपरेशनसाठी गेला होता. खर्च परवडणार नाही म्हणून परत आला. नशीबच आंधळं म्हणून गप्प बसला होता.

'तुम्हाला कुणी खबर दिली नेत्र–शिबिराची ?'

'आमच्या गुर्जींनी. देव त्यांचं भलं करील. ऑप्रेशन केल्यापासून गुर्जी रोजी दोनदा चौकशीबी करून जातो पघा.'

'सोबत कोण आणलंत ?'

'असंच ओळखीचं–दुसरं कोन येनार म्हाताऱ्यासंगं ?'

'इथली व्यवस्था ठीक आहे ?'

'सायेब, असला तांदूळ आम्ही कधी खात नाय. त्यामुळे घशाखाली उतरेना. सुख बी सोसाया ताकद लागते जनु !'

दुसऱ्या वार्डात जायला मी निघालो तो व्हरांडातल्या बाकड्यावर

एक जाडाजुडा मुसलमान बसला होता. डाव्या डोळ्यावर बँडेज पाहून तो रुग्ण होता हे मी ओळखलं. मी नाव विचारलं,

' उमर फकीर करनेलकर, राहणार वाके–सवाद. ' गृहस्थाने सफरी बोटीवर ४५ वर्षे नोकरी केली होती. जग पाहिले होते. रिटायर झाल्यावर घरी येऊन राहिला होता. पण जग पाहिलेली दृष्टीच मंदावू लागली. शिबिर निघाले म्हणून त्याला आशेचा किरण दिसला.

' ऑपरेशन बेस झालं ? '

' तुम्हा म्हाडकर मंडळींना मोठा सवाब लागंल बघा. '

' सवाब म्हणजे ? '

' सवाब म्हंजे पुन्य. कुरानात सांगितलंय बघा– तान्हेल्याला जो पानी देल, भुकेल्याला जो अन्न देल, आंधळ्याला जो दृष्टी देल, मशीद बांधण्याकरता जो पै–पैसा देल त्येला सवाब भेटेल. म्हाड-करांनी इक्ता मंडळींना दृष्टी देऊन सवाब जोडला हाय. '

मग भेटले महाडचेच मुकुंदराव बनारसे आणि बाळासाहेब देशमुख. मुकुंदरावाने अलिबागला जाऊन चार–पाच महिन्यांपूर्वी एका डोळ्याचे ऑपरेशन करून घेतले होते तिथल्या नेत्रशिबिरात. दुसऱ्याचे या शिबिरात झाले. त्यामुळे दोन्ही शिबिरांचे अनुभव त्यांच्या गाठी जमा होते. " अलीबागला आमची व्यवस्था उत्तम झालीच. पण इथली व्यवस्था अलिबागपेक्षाही उजवी, हे कुणालाही कबूल करावे लागेल. डॉक्टर, नर्सेस, तुमच्या कॉलेजचे स्वयंसेवक, लायन क्लबवाली मंडळी सारीच प्रेमळ आहेत हो. ' तेवढ्यात त्या वार्डात शिरलेले डॉ. गोखले म्हणाले,

' अलिबागला सात दिवसांत एकदाही ' चुटका ' मिळाला नाही. इथे काल मिळाला वाटते. नाहीतर मुकुंदराव, तुम्ही आमच्याविषयी एवढे चांगले कसे बोलताय् ?'

' काय डॉक्टर, एकदा एखाद्याचे नाव-कानफाटचा पडले की ते कायमच का ? विठोबा शप्पत जे खरे ते खरेच. '

बाळासाहेब देशमुख शिबिरातल्या भात–आमटीवर खूप होते. महादेव हनुमंत कदम–म्हणजे आमचे लॅब असिस्टंट दत्ता कदम यांचे वडील; घरच्यासारखी सोय झाली म्हणत होते. गजानन रघुनाथ रोडे, शिंपीकाम करणारे. ते म्हणाले, ' मुंबईतही अशी सोय झाली नसती. ' रोडयांच्या या विधानाला निजामपूरच्या नारायणराव समेळांनी पुष्टी दिली. म्हणाले, ' अहो, माझे भाऊ अन् चार मुलगे मुंबईत आहेत. तरी मी इथे आलो. '

' मुंबईत ऑपरेशनला जास्त खर्च आला असता, तो वाचावा म्हणून तर नाही ना महाड पसंत केले ?'

' हा खर्चाचा हिशेब नाही साहेब. माझ्यासारखे एक दोघे सोडले, तर या अख्ख्या शिबिरात मुंबई–पुण्याला जाऊन ऑपरेशन करून घ्यायची कुणाचीच परिस्थिती नाही. हे सारे मोफत असूनही इथे जी वागणूक आम्हाला मिळतेय्, तिला तर तोड नाही. मुंबईतल्या इस्पि-तळात, माझी इतकी माणसे मुंबईत असूनही, मी एकटा पडलो असतो ! इथे आमचे एक कुटुंबच बनले आहे. '

' पुढारी आहेत हं प्रोफेसरसाहेब. ' निजामपूरचा वाघ ' म्हणतात त्यांना. ' मुकुंदरावाने माहिती पुरवली.

तिसऱ्या वार्डात, रायगड खर्डीचे नारायणभाऊ महाडिक भेटले. आता डोंगरदऱ्यातली शेती करीत होते. उमेदीची वर्षे मराठा लाईट इन्फन्ट्रीत गेली होती.

' महाडिक म्हणजे राजे महाडिकांपैकीच का ?' माझा प्रश्न.

' शिवबाचे नातेवाईक ते. त्यांचेच आम्ही वंशज. पण आता काप जाऊ भोका उरली तिथे आम्ही त्यांचे नाव कसे सांगावे ?'

स्त्रियांच्या वार्डात कोंडवीजवळच्या फणसकोंडची चंद्राबाई काशिराव म्हसके भेटली. मुलाला अगर कारभाऱ्याला तिला शिबिरात घेऊन यायला वेळ नसल्यामुळे, शेजारच्या एका मुलाला हाताशी धरून ती शिबिरात आली. ऑपरेशन झाले. शेजाऱ्याचा पोरगा दुसऱ्या दिवशी पळून गेला. मुलगा किंवा कारभारी चौकशीस आले नाहीत म्हणून मनात खट्टू झालेली ती बाई. शेजारच्या रुग्णाइतांचे नातेवाईक तिला हवी ती मदत करीत होते.

अप्पर तुडीलच्या मरियाम बिबी मोहिनुद्दिनखान देशमुखबाईला तिच्या मुलीने शिबिरात आणले होते. आई पण म्हातारी–मुलगी पण म्हातारीच. घरची शेती थोडी. लायन डॉ. देशमुखांच्या भरंवशावर ती इथे आली होती. सोय छान झाली म्हणून डॉ. देशमुखांना आणि लायनवाल्यांना दुवा देत होती.

नानवऱ्याच्या मुक्ताबाई मोरे या स्त्रीबरोबर तिची सून आली होती–तान्ह्या मुलाला घेऊन. शिबिरात पोर तापाने फणफणले. मुक्ताबाईबरोबर लायन डॉक्टरांनी तिच्या नातवालाही उत्तम ट्रीटमेंट दिल्याने ती त्याचे गुण गात होती. पोरगेही गोठे गोड होते. वार्डातील साऱ्याच रुग्ण स्त्रियांची करमणूक ते करीत होते.

दासगावच्या भिकू धोंडी खैऱ्याच्या १० वर्षांच्या अरुणाला डॉक्टरांनी काचेचा डोळा बसवून दिला होता. भिकू माणगावच्या पंचायत समितीतला शिपाई. डॉक्टरांचे ऋण मान्य करताना त्याचेच डोळे डबडबले होते.

स्त्रियांच्या वार्डातील रुग्णांना धाकदपटशा दाखवणे, पैसे मागणे, मारायला धावणे असले उपद्व्याप कासिम अब्दुल रेहमान मुल्ला नामक एका पोराने केले असे कानावर आले. तो पोरगा आपल्या वडिलांचा अटेण्डण्ट म्हणून शिबिरात आला होता. म्हणून त्याच्या वडिलांना मी भेटलो. अब्दुल रेहमान इमाम मुल्ला म्हणाले, ' साहेब, माझे पाप या पोराच्या रूपाने जन्माला आले आहे. २० वर्षांचा झाला. आता मवालीच बनला आहे. मी मुल्ला–माझा पोरगा मौलवी व्हायच्या ऐवजी मवाली झाला याचे दुःख मोठे. त्याला तुम्ही पोलिसांच्या ताब्यात द्या. इतके चांगले काम इथे चालले असता हरामखोराने इथे असले गुण उधळावेत. '

त्याचा संताप पाहून मीच त्याचे सांत्वन केले. मी तिथून बाहेर पडणार तोच एक आवाज आला,

' सायेब–'

' आपण कोण ?'

' आम्ही साळुंके. भिकू लक्ष्मण साळुंके. '

' कुठले ?'

' पडवीचे. '

' खुद्द पडवीचे ! '

' न्हाई–पडवी पठारचे. '

' काय करता ?'

' शेती. '

' मुलंबाळे ?'

' दोन पोरींची लग्ने झाली. दोन पोरगं पलटणीत हायेत. मुना न् मी–नातवंडं घरी असतो. शेती बघतो. '

' हाक का मारलीत ?'

' जरा सांगायचे होते. '

पृष्ठ ३२ वर

# चितेपिंपळगावाने साजरी केलेली १४ एप्रिल

चितेपिंपळगाव औरंगाबादपासून पंधरा मैलां-वर वसलेले बीड-औरंगाबाद मार्गावरील टुमदार खेडे.

खरे पाहता ही दोन खेडी. चितेगाव व पिंपळगाव. एका छोटयाशा नदीने दुभंगलेली. चितेगावातून हाक घातली तर पिंपळगावचा माणूस ओ देईल.

१४ एप्रिलचा दिवस. दोन्ही गावांतील वातावरण उत्साहाने रसरसलेले होते. लहाना-पासून थोरापर्यंत सारेजण 'लगीन' घाईत दिसत होते. आज कोणता सण? आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती होती. 'भीम' भगवानाचा जन्मदिवस हा. खरो-खरच सण मानला पाहिजे. नव्हे मानला जात होता.

पण इतर ठिकाणांपेक्षा इथल्या वाता-वरणात वेगळीच अनुभूती येत होती. इतर ठिकाणी फक्त बौद्धवाडयातच सण साजरा केला जातो. इथे मात्र सारे गावच सणासाठी तयार झाले होते. सर्व जातीचे लोक खांद्यास खांदा भिडवून उत्साहात काम करीत होते. पिंपळगावची मंडळी मिरवणुकीच्या तयारीत धुंदपणे मग्न होती तर चितेगावची मंडळी सभेच्या व्यवस्थेसाठी धडपड होती.

ऊन कलू लागले तशी तशी शेजार-पाजारच्या खेडयांतील मंडळी जमू लागली. बघता बघता पाचपंचवीस खेडयांतील चार-पाच हजार लोक जमा झाले. सर्वश्री प्रल्हाद-सिंह ठाकूर, सोनाजीराव हिवाळे, रावसाहेब दांडगे, आसाराम बनकर, सुधाकरराव थोरात, आदी जनसंघाचे कार्यकर्ते डेरेदाखल झाले.

बरोबर साडेचार वाजता औरंगाबादहून भारतीय जनसंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. वसंतकुमार पंडित यांचे आगमन झाले. मराठवाडा रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष प्रा. एस. टी. प्रधान त्यांच्या बरोबरच होते. शिवाय औरंगाबाद जनसंघाचे नेते पं. ज्ञानेंद्रजी शर्मा, सौ. कुमुद रांगणेकर.

इकडे साडेचार वाजता पिंपळगावातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची मिरवणूक निघाली. शृंगारलेल्या बैलगाडीवर बाबासाहेबांची सुंदर प्रतिमा ठेवली होती. गुलालाची उधळण होत होती. धुंदपणे तरुण घोषणा देत होते–'भीम भगवान की जय.' शेकडोंचा समुदाय सामूहिकपणे आंबेडकरांचा जयजयकार करीत पुढे जात होता.

मिरवणूक चितेगावच्या वेशीत येताच डॉ. वसंतकुमार पंडित, प्रा. एस. टी. प्रधान इतर नेत्यांसमवेत मिरवणुकीला सामोरे गेले. बाबासाहेबांच्या प्रतिमेला वंदन करून सारे-जण मिरवणुकीत सामील झाले.

हळूहळू मिरवणूक मारुतीच्या मंदिराजवळ आली. मारुतीच्या पारावर सुंदर व्यासपीठ उभारलेले होते. मंदिराजवळ येताच मिरव-णुकीचे रूपांतर सभेत झाले. नेते व्यास-पीठावर दाखल झाले.

बौद्धवाडयातील नेहमीच्या ठिकाणाहून वेगळया ठिकाणी आंबेडकरांची जयंती साजरी होत होती. मारुतीच्या पारावर. आधुनिक संदर्भ द्यायचा झाल्यास साऱ्या समाजाच्या देवळात दलित देवाची जयंती सारा हिन्दू समाज साजरी करीत होता. डॉ. पंडितांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला गेला. नंतर प्रा. प्रधानांनीही पुष्पांजली वाहिली गावकऱ्यांतर्फे पाहुण्यांचे स्वागत केले गेले. प्रारंभी श्री. वाघ गुरुजी यांनी गेल्या चार वर्षांचा अहवाल सादर केला.

भारतीय जनसंघाचे महाराष्ट्र प्रदेश उपा-ध्यक्ष श्री. रामभाऊ गावंडे मूळ चितेपिंपळ-गावचेच. आंबेडकर जयंती उत्सवाला व्यापक व विस्तृत रूप देण्याची, उत्सव साऱ्या गावाचा म्हणून साजरा करण्याची कल्पना त्यांचीच. आपल्या स्वागतपर भाषणात ते म्हणाले, 'बाबासाहेबांना बौद्धवाडयाबाहेर काढायची बऱ्याच दिवसांपासून आमची इच्छा होती. ती आता साकार झाली आहे. मोठा माणूस एखाद्या जातीत जन्माला आला की आपण त्याचे कर्तृत्व, त्याचे जीवन फक्त त्याच्या जातीतच बंदिस्त करून टाकतो. खरे पाहता या महापुरुषांनी आपल्या जातीवरच उपकार केलेले नसतात तर साऱ्या समाजावर त्यांचे महान उपकार असतात. पण आपल्या-कडे पद्धतच पडली आहे. संत रोहिदासाची जयंती करायची ती चांभारांनीच. सावता माळयाचे पुण्यस्मरण करायचे ते माळयांनीच. तसेच बाबासाहेबांची जयंती साजरी करायची ती फक्त बौद्धांनीच आणि फक्त बौद्ध-वाडयातच. आम्ही जाणीवपूर्वक ही स्थिती बदलायची असे ठरविले आहे. बाबासाहेबांनी दलित वर्गावर तर अनंत उपकार केलेच, पण त्यापेक्षा जास्त उपकार साऱ्या समाजावर केले आहेत. पिढयान् पिढया त्यांचे ऋण फिटणार नाही. त्यामुळे त्यांचे पुण्यस्मरण साऱ्या समाजाने केले पाहिजे. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. पैठण तर इथून फार जवळ. एकनाथ महाराजांची वारी करणारे इथे शेकडो असतील. पण एकनाथ महाराजांना समजावून घेतलेले किती आहेत? पीडित दलिताचे मूल कडेवर घेणारे एकनाथ महा-राज किती जणांना कळले आहेत?

'महाराचे मूल कडेवर घेणाऱ्या एकनाथांचा विचार आपण आचरणात आणला पाहिजे, हेच या प्रसंगी वाटते.'

औरंगाबादच्या सौ कुमुद रांगणेकर या प्रसंगी बोलताना म्हणाल्या, 'बाबासाहेबांना आपल्या समाजाने सतत दूर लोटले, परंतु बाबासाहेबांनी कधी समाजाला दूर लोटले नाही. ते अधिकारी असताना एक ब्राह्मण परिचारक त्यांच्या हातात कागद न देता कागद 'फेकत' असे, कारण त्याला त्यांच्या स्पर्शाची भीती वाटत होती. पुढे बाबा-साहेबांना एकदा मिलिन्द महाविद्यालयामध्ये प्राध्यापक नेमायचा होता. एक ब्राह्मण तरुण त्यांच्या साऱ्या कसोटयांना उतरल्यावर त्यांनी चटकन त्याची नेमणूक करून टाकली. हा ब्राह्मण आहे, या ब्राह्मणांनी आपणास

फार त्रास दिला म्हणून त्याचा सूड उगवावा असा विचारही त्यांच्या मनाला स्पर्श करू शकला नाही. गुणांनी श्रेष्ठ असूनही समाजाने त्यांना सतत दूर ठेवले तरीही बाबासाहेबांनी मात्र सतत गुणांचीच पूजा केली. समाजाचा धर्म कधी बदलत नसतो, रूढी मात्र बदलत असते. १९२७ साली ज्या चवदार तळ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाठ्या–काठ्या झेलल्या त्याच चवदार तळ्यावर ४३ वर्षांनी त्यांच्या पुत्राचा देवदुर्लभ सत्कार करण्यात आला. उशीर का होईना, पण समाज–पुरुषाला त्याची चूक कळली. सर्व मानव इथून तिथून सारखा आहे, त्यात भेदाभेद नाही, हा विचार आचारात आणणे हीच खरी बाबासाहेबांना आदरांजली होईल.'

जनसंघाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीचे सदस्य आणि दलित कार्यकर्ते श्री. सोनाजीराव हिवाळे म्हणाले, 'अस्पृश्यतेचा कलंक पुसून टाकून साऱ्या दलित समाजाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी बाबासाहेब आयुष्यभर झगडले. त्यांचे ते अपुरे कार्य पूर्ण करणे हेच प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे. बाबासाहेबांनी म्हटले होते की, शिकाल तरच जगाल. नोकरी मिळते का नाही याची चिंता न करता आपण साऱ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे. देव, देश, धर्म सारा शिक्षणानेच कळतो. शिक्षणानेच कार्याची प्रेरणा मिळते. शिक्षण हेच नवजीवन आहे. दलित समाजाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्यानेच बाबासाहेबांची जयंती साजरी करणे सार्थकी लागेल असे मला वाटते.'

औरंगाबादचे पं. ज्ञानेंद्रजी शर्मा या प्रसंगी बोलताना म्हणाले, 'शेकडो वर्षांपासून रंजलेल्या गांजलेल्या दुबळ्या दलित वर्गाचे अश्रू पुसून त्याला अस्मितेने ताठ चालायला शिकविले, हे बाबासाहेबांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. बाबासाहेबांनी दलित समाजाला ताठ मानेने चालायला तर शिकविलेच, पण त्याचबरोबर हिंदू समाजालाही फार मोठा धक्का देऊन जागृत केले. हिंदूंना त्यांनी इशाराच दिला की, वेळ जाण्यापूर्वी सावध व्हा, अन्यथा अनर्थ ओढवेल. माणसाने माणसाला स्पर्श न करण्याचे तत्त्वज्ञान म्हणजे बुद्धीचे दिवाळे वाजल्याचे लक्षण आहे. दलितांना नोकऱ्या देऊन, घराची कवाडे उघडून, मंदिरांची दारे उघडून सामाजिक समता येणार नाही तर हिंदूंनी आपली मनाची दारे उघडून दलितांना सामावून घेतले पाहिजे. आज आपण तशी प्रतिज्ञा करू या.'

प्रा. एस. टी. प्रधान हे मराठवाडा रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष. औरंगाबाद येथील घाटी इस्पितळात अक्षरशः निजून होते. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दलची त्यांची असीम निष्ठा आणि श्री. रामभाऊ गावंडे यांचा अतूट स्नेह या दोहोंच्या ओढीने ते प्रकृतीची अजीबात तमा न बाळगता कार्यक्रमाला उपस्थित राहिले.

सुरुवातीलाच चितेपिंपळगावच्या गावकरी बंधूंचे आभार मानताना श्री. प्रधान म्हणाले, 'डॉ. आंबेडकरांची जयंती ही आज साऱ्या गावाची म्हणून साजरी होत आहे. सारे गावकरी यात एकदिलाने सहभागी झाले आहेत. याला साऱ्या महाराष्ट्रात तोड नाही. ज्या प्रकारच्या उत्सवाचे स्वप्न बाबासाहेबांच्या डोळ्यांसमोर होते, अगदी त्या प्रकारचा हा उत्सव आहे. सामाजिक समतेचा मंगल क्षण जवळ आला आहे असे वाटते. बाबासाहेबांनी या देशात अनेक प्रकारच्या चळवळी केल्या. परंतु त्या चळवळी करताना त्यांनी इथल्या मातीशी, इथल्या संस्कृतीशी इमान राखले. एकदा बाबासाहेब कोलंबिया विद्यापीठाच्या निमंत्रणावरून अमेरिकेला जाणार होते. दलितांना पीडल्याबद्दल देशबंधूंवर सतत कडवट टीका करणारा हा फटकळ पुढारी अमेरिकेत जाऊन आपल्या देशाविषयी काय बोलेल, याची उत्सुकता येथील साऱ्या मंडळींना होती. सांताक्रूझ विमानतळावरच एका पत्रकाराने त्यांना या बाबत छेडले असता डॉ. आंबेडकर तात्काळ म्हणाले, 'देशात असताना मी हिंदुसमाजावर आग पाखडतो यात शंका नाही. मी इथे वाटेल तेवढा भांडेन, पण देशाबाहेर गेल्यानंतर माझ्या देशाची बदनामी होईल, असे चुकूनही बोलणार नाही.' बाबासाहेबांची देशबांधवांसंबंधीची ही भूमिका लक्षात घेऊन आपण वागले पाहिजे.

'आपण साऱ्या समाजासह हिंदू धर्म सोडणार, अशी येवला येथे घोषणा करताच डॉ. आंबेडकरांनी मुसलमान किंवा शीख धर्म स्वीकारावा यासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात झाली. हैद्राबादच्या निझामाने तर तिजोरीच उघडी केली होती. परंतु बाबासाहेब बधले नाहीत. पैशासाठी धर्मांतर केले नाही. पवित्र भूमी (Holy Land) म्हणून त्यांनी भारताचीच भूमी मानली. याच पवित्र भारतीय भूमीत रुजलेल्या बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यामुळे बाबासाहेबांचे 'धर्मांतर' हे कधीही 'देशांतर' ठरले नाही. बाबासाहेब हे केवळ दलितांचे पुढारी नव्हते, साऱ्या समाजाचे नेते होते. सुरुवातीपासूनच त्यांच्या समवेत आचार्य दोंदे, कमलाकर चितळे, चिटणीस आदी ब्राह्मण मंडळीसुद्धा होती. बाबासाहेबांचे सामाजिक अभिसरणाचे स्वप्न साकार करण्याची सारी जबाबदारी आता आपल्यावर आहे. सध्याची राजसत्ता हुकूमशाहीकडे झुकते आहे, याचाही गंभीर विचार आपण आज केला पाहिजे. घटना सादर करताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते, घटनेच्या रूपाने मी राजकीय समता प्रस्थापित करीत आहे; परंतु आर्थिक व सामाजिक समता त्वरित प्रस्थापित होऊ शकली नाही तर लोकशाहीचा हा डोलारा कोसळल्याशिवाय राहणार नाही, अशी भीती मला वाटते. बाबासाहेबांची ही भीती खरी होईल, अशी स्थिती देशात निर्माण होत आहे. परंतु आपण साऱ्यांनी मिळून ही भीती निराधार ठरविली पाहिजे, तेव्हाच त्यांची जयंती साजरी करण्याचे सार्थक होईल.'

भारतीय जनसंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. वसंतकुमार पंडित आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'या कार्यक्रमासाठी मी मुद्दाम मुंबईहून आलो आहे. हे चित्र, हा जनसमूह, हा एकवटलेला समाज पाहून माझे मन भरून आले आहे. छोटीशी दोन गावे का असेनात, पण हे स्वप्न साकार करू शकतात, हे काही कमी महत्त्वाचे नाही.'

चितेपिंपळगावचे सरपंच श्री. गणपतराव गावंडे यांनी उपस्थितांचे यथोचित आभार मानल्यानंतर सामुदायिकरीत्या वंदेमातरमने सभेची सांगता झाली.

सभेनंतर साऱ्यांना अधिक जवळ आणणारा महत्त्वाचा कार्यक्रम होता सहभोजन. भल्याभल्यांची सत्त्वपरीक्षा पाहणारा कार्यक्रम.

पहिली पंगत मारुतीच्या देवळातच बसली. 'पुंडलिक वरदे'च्या गजराने भोजनास प्रारंभ झाला. एकामागून एक पंगती उठू लागल्या. शेकडो मंडळी जेवू लागली, पण कुठे 'सहभोजन' वाटतच नव्हते. माणसे अगदी सहजगत्या वाढीत होती. माणसे अगदी सहजगत्या जेवत होती. सारा समाज जणू एक कुटुंब भासत होता...

**–प्रमोद महाजन**

# सोलकढी

## □ सुमनताईंचे अभिअभिनंदन

आल्या मराठी रंगभूमीवर अमुकतमुक-फमुकढमुक गोष्ट प्रथम कोणी आणली, ते संशोधनपूर्वक आणि निर्णायक रीतीने पक्के करण्याबाबत आपण फार्फार जागरूक असतो. त्यामुळे आपण ज्याला काल पहिला मानत होतो तो आज दुसरातिसरापाचवादहावा होतो, किंवा आपण ज्याला काल दुसरा-तिसरापाचवादहावा मानत होतो तो आज एकदम पंपहिला होऊन जातो. मराठी रंग-भूमीवरचे पहिले स्वतंत्र मराठी नाटक कोणते ? (मग, स्वतंत्र गद्य मराठी नाटक कोणते, संगीत कोणते, भाषांतरित कोणते, स्वतंत्र आधारित कोणते, पाच अंकी कोणते, तीन अंकी कोणते, बिनअंकी कोणते, वयात आलेले कोणते, मिशा फुटलेले कोणते, म्हातारचळ लागलेले कोणते, इत्यादी बरे-बारीक पोटप्रश्न.) मराठी रंगभूमीवरचा पहिला पुरुष नाटककार कोण ? मराठी रंग-भूमीवर पुरुषाची भूमिका करणारी पहिली स्त्री कोण ? मराठी रंगभूमीवर वास्तववाद अथवा अवास्तववाद प्रथम कोणी आणला ? मराठी रंगभूमीवरचे पहिले खरेखुरे 'नवे' मराठी नाटक कोणते ? नव्या मराठी रंग-भूमीवरचे पहिले 'जुने' मराठी नाटक कोणते ? मराठी रंगभूमीवरची फायद्यात बंद झालेली पहिली नाटकमंडळी कोणती ? मराठी रंगभूमीला प्रथम धूप कोणी घातला? मराठी रंगभूमीचा पहिला बेजबाबदार समीक्षक कोण ?—अशा अनेक प्रश्नांची उत्तरे पक्की करायचा यत्न अभ्यासकांनी अविरत आणि निरलसपणे चालवलेला आहे. (खऱ्या व जातिवंत अभ्यासकाला यशापेक्षा यत्नाचे मोल अधिक वाटते !)

मराठी रंगभूमीवर एकपात्री प्रयोग कर-णारी पहिली व्यक्ती कोण ? हा असाच अभ्यासकांना आवडणारा आणखी एक प्रश्न होय. (येथे 'व्यक्ती' असा पारिभाषिक शब्द योजण्यातला आमचा कावा आणि बारकावा वाचक ध्यानी धरतील अशी आशा आहे.) नेहमीप्रमाणे या बाबतीतसुद्धा संशोधनाला भरपूर वाव आहे. बहुतेकांची अशी प्रामाणिक समजूत आहे की, 'बटाटयाची चाळ' हा मराठी रंगभूमीवरचा पहिला (सुविहित) एकपात्री प्रयोग होय; आणि तो सादर करणारे पु. ल. देशपांडे ही मराठी रंगभूमीवर एकपात्री प्रयोग करणारी पहिली व्यक्ती होय. (पु. ल. देशपांडयांना 'व्यक्ती' असे म्हणताना कसेकसेसेच होते आहे. पण त्याला मी तरी काय करू ? शास्त्रीय स्वरूपाच्या लेखनात कोणाच्याही 'कसेकसेसेच होण्या'ला स्थान असत नाही.) काहीजणांना (शास्त्रीय व तार्किक परिभाषेत 'काही'चा अर्थ कित्येक वेळा 'एक' असाच असतो.) मात्र प्रामाणिकपणे असे वाटते की, एकपात्री संगीत 'सौभद्र' सादर करणाऱ्या सुहासिनी मूळगावकर हीच खरी मराठी रंगभूमीवर पहिला (सुविहित) एकपात्री प्रयोग करणारी व्यक्ती होय. एकपात्री संगीत 'सौभद्र'चा जाहीर प्रयोग कदाचित 'बटाटयाच्या चाळी'नंतर झाला असेल; पण म्हणून काय झाले, चि. सुहास संगीत 'सौभद्र'चे खाजगी प्रयोग आप्तेष्टमित्र-मैत्रिणीहितचिंतकचाहत्यांसमोर किती तरी आधीपासून करतच होती की. खाजगी प्रयोगांचा आधार पु. ल. देशपांडयांनासुद्धा घेता येईल, असे पु. ल. पक्षपाती सांगतात. जाऊ द्या. खाजगी गोष्टीत आपण कशाला पडा; ते संशोधकांचे व अभ्यासकांचे आरक्षित क्षेत्र आहे.

स्वत: पु. ल. देशपांडे असे प्रामाणिकपणे मानतात की, बहुरूपी आणि बहुरूप्याची कला हे एकपात्री नाटयप्रयोगाविष्काराचे उगमस्थान आहे. म्हणून पु. ल. देशपांडे आपल्या एकपात्री प्रयोगांना 'बहुरूपी प्रयोग' म्हणतात. (त्याचा फायदा उठवत काही सुवर्णमध्यस्थसमतोल समीक्षक असा निर्णय देतात की, मराठी रंगभूमीवर बहुरूपी प्रयोग करणारी पहिली व्यक्ती पु. ल. देशपांडे तर एकपात्री प्रयोग करणारी पहिली व्यक्ती सुहासिनी मुळगावकर होय ! समीक्षकांपुढे मी जो नित्यनम्र असतो तो काय उगाच ?)

कोणतीही गोष्ट मध्येच सुरू होत नाही; ती नेहमी सुरुवातीलाच सुरू होत असते. एकपात्री अथवा बहुरूपी प्रयोगांचे असेच झाले. ते सुरू झाले आणि आत्तापर्यंत चालू राहिले. पु. ल. देशपांडे, सुहासिनी मुळगाव-कर, सदानंद जोशी, मुरलीधर राजूरकर, रंगनाथ कुलकर्णी वगैरेंची ही विशिष्ट सेवा रंगदेवतेच्या चरणी रुजू झाली. अगदी अली-कडे सुमन धर्माधिकारी यांनी 'घार हिंडते आकाशी' हा एकपात्री–बहुरूपी प्रयोग लोकप्रिय केला. त्याचे शंभर प्रयोग नुकतेच झाले. ते होणार असे भलेभाकित मी आधीच वर्तवलेले होते. योग्य आणि अचूक भाकित केल्याबद्दल स्वत:चे आणि शंभर प्रयोग केल्याबद्दल सुमनताईंचे अभिअभिनंदन करा-यच्या निमित्ताने तर मराठीतल्या एकपात्री नाटयप्रयत्नांचे हे अभिदर्शन आम्ही वाचकांना घडवले आहे. आता वाचकांना ते कदाचित विषयांतरासारखे वाटेल. परंतु येथे विषयां-तर हाच विषय आहे, हे त्यांनी नीट ध्यानी धरावे. आणखीसुद्धा एक गोष्ट त्यांनी ध्यानी धरावी : विषयांतराला विषय करायची माधव मनोहरांना कोणी मक्तेदारी दिलेली नाही; नाटकाबद्दल लिहिणाऱ्या-बोलणाऱ्या प्रत्येकाचा तो स्वराज्याइतकाच जन्मसिद्ध हक्क आहे.


— अनंतराव



# रौप्यमहोत्सव

## किशोरमामांच्या साखर-कामगारभेचा

प्रकाश जोशी



'कामगार वर्गाची ताकद संघटनेच्या मार्गाने वाढत आहे. या ताकदीचा उपयोग कसा करायचा ? कशासाठी करायचा याचे विचारमंथन होणे जरूर आहे. कामगार संघटनेने आपले प्रश्न सोडवायचे, त्यासाठी लढे पुकारायचे एवढ्यावरच गप्प बसायचे का ? कामगार संघटनेचे तेवढेच कार्य आहे का ? याचा कामगार संघटनांनीही विचार करावा. आपल्यावरील सामाजिक जबाबदारी ओळखावी. आपल्या समाजातील अन्यायाला वाचा फोडून त्यासाठी संघर्षाला कामगार संघटनांनी तयार राहिले पाहिजे.'

एस. एम. बोलत होते. कोपरगावच्या साखर कारखान्याचे आवार. कोपरगाव तालुका साखर कामगार सभेचा रौप्यमहोत्सव साजरा करणारी जाहीर सभा. आसपासच्या परिसरातून लोक जमताहेत. बायाबापड्या, मुलांबाळांसह कौतुकाने, उत्साहाने उपस्थित राहिल्या आहेत. व्यासपीठाजवळ लाल टोप्या आहेत. पण गर्दी पांढऱ्या टोपीधारकांचीच. कामगार सभेच्या कामाची एकप्रकारे पावतीच.

व्यासपीठ गजबजलेलं आहे. श्रोते ऐकायला उत्सुक आहेत.

एस. एम. परखडपणे बोलत होते. साखर कामगार सभेची अभेद्य संघटना, सुजाण नेतृत्व व विधायक कार्यक्रमाबद्दल प्रशंसा करूनच ते बोलत होते.

'कामगार हा क्रांतिकारक असतो असे आम्ही वाचतो. आपल्यावरील अन्यायासाठी तो झगडत असेल; पण समाजातील निरनिराळ्या घटकांतील अन्यायाविरुद्ध कामगारांतील क्रांतिकारकता दिसते का असा माझा प्रश्न आहे. समाजातील दलितपतितांचे प्रश्न आहेत. त्याबद्दल कामगार संघटना काय करतात ? व्हिएटनाममधील अमेरिकन सरंजामशाहीविरुद्ध कामगार संघटना निषेधाचे ठराव पास करतात. पण आमच्याच गावातील दलितांवरील अत्याचाराबाबत कामगार संघटना काहीतरी करतात काय, असा प्रश्न माझे दलित मित्र विचारतात. त्यांना मी काय उत्तर देणार ? कामगार संघटनांनी आपल्या प्रश्नाबरोबरच समाजातील इतर घटकांच्या प्रश्नाशी समरस होऊन क्रांतिकारक कार्य केले पाहिजे असे मला वाटते.'

आज आपल्यापुढे अतिशय मूलभूत प्रश्न उभा आहे. एस. एम. बोलत असतात. इथे भाषा नि विषय मांडण्याची पद्धत बदललेली आढळते. बेताच्या बुद्धीच्या विद्यार्थ्याला एखादे शिक्षक जसे समजावून-उमजावून सांगतात तसा अभिनिवेष आहे. साने गुरुजींची जवळीक सांगणारी भाषाशैली आहे. लोकशाही ही काही खरी नाही असे लोकांना वाटू लागले आहे. आपलं विकासाचं गाडं लोकशाहीने अडविले आहे अशी भावना पसरू लागली आहे. कम्युनिस्ट चीनचा विकास झाल्याची उदाहरणे लोक देऊ लागले आहेत. तिथे लोकशाहीचे खुळ नव्हते म्हणून चीनचा जलद विकास झाला, असे सांगू लागले आहेत. लोकांना माओ दिसतो. पण त्यालाही खूप वर्षे लढावे लागले, झुंज द्यावी लागली. जनतेला किंमत मोजावी लागली; तेव्हा विकास झाला. लोक म्हणतात भारताला डिक्टेटरची गरज आहे. प्रश्न विचार करण्यासारखा आहे. मी एकदा मत मागायला गेलो असता एक मॉडर्न तरुण भेटला—तो म्हणाला, मत वगैरे झूट आहे. आम्हाला डिक्टेटर हवाच ! मी त्याला विचारले, डिक्टेटर कोण होणार ? गोळवलकर हवेत की तुला स्वतःला डिक्टेटर व्हायचंय ? डिक्टेटर नेमत नसतात, तो तुमच्या-आमच्या नकळत येत असतो. हे सांगताच तो गडबडला. आपल्या देशात डिक्टेटरशिप अशक्य आहे. जो कोणी डिक्टेटर होण्याचा प्रयत्न करील तो देशाचे निश्चितपणे तुकडे पाडील. आणि मग अमेरिका भारतात प्रवेश करू शकेल. तो मोठा धोका आहे.

आताच मृणालताईंनी सांगितलं की नाही ? देशात सर्वत्र भ्रष्टाचार वाढलाय म्हणून. कोणी कोणावर विश्वास ठेवायचा ? मी काय करावं हे प्रत्येकाने स्वतः ठरविलं पाहिजे. सामान्य माणसासाठी काय करायचं याचा विचार केला पाहिजे. सामान्याला त्याच्या पायावर उभे करणे म्हणजेच राष्ट्र बळकट करणं आहे.

साखर कामगार संघाचे अध्यक्ष नानासाहेब गोरे देशापुढील संभाव्य धोक्यांची कल्पना लोकांपुढे मांडतात. आपल्या प्रश्नाबरोबरच आपल्याला ( कामगार संघाला ) समाजाच्या इतर प्रश्नांबाबत जागरूक असणे आवश्यक आहे असे स्पष्ट करतात. आपल्या अर्थ-

व्यवस्थेत सध्या गोंधळ माजला आहे. खाजगी उद्योगधंदे आहेत, सरकारी उद्योगधंदे आहेत, संमिश्र उद्योग आहेत. सरकारची धोरणं सतत बदलत आहेत. कम्युनिझममध्ये सहकाराला वाव नाही हे सुद्धा लक्षात ठेवायला पाहिजे. काहीतरी एक निश्चित मार्ग स्वीकारण्याची वेळ आली आहे.

महिलांच्या झुंझार नेत्या मृणाल गोरे उभ्या राहतात. त्या भ्रष्टाचारावरच जोरदार हल्ला करतात. ग्रामीण महिला कौतुकानं ऐकत असतात. 'गेली पंचवीस वर्षे आम्ही पाहतो आहोत. कोणत्याही एका मार्गानं आपला विकास होणार नाही. कोणतीही योजना घ्या, ती कागदोपत्री परिपूर्ण असते. पण प्रत्यक्षात उतरविताना तिचे काय होते ? महाराष्ट्रातही भ्रष्टाचाराचा बुजबुजाट वाढलेलाच आहे.

बिहारमध्ये व महाराष्ट्रात एका डिग्रीचाही फरक नाही. महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराची प्रकरणे आपण वाचताच. त्यात सर्वोच्च व्यक्तीही गुंतलेल्या असतात. अशा प्रकारे कोणतीच व्यवस्था टिकू शकत नाही. बिहारमध्ये गफूरमियाँ का गेले. कांग्रेसचे बहुमत होते. पण नुसते बहुमत पुरत नाही. जनतेचा विश्वास असावा लागतो.

साखर कामगार संघाने आपले लढे चांगले लढविले. आपला रौप्यमहोत्सव साजरा करून प्रौढावस्थेत शिरलेल्या या संस्थेकडून समाजाची अपेक्षा आता वाढली आहे. आपलंही एक सामाजिक कर्तव्य आहे असे जाणून तुम्ही आता भ्रष्टाचारविरोधी लढ्यात उतरलं पाहिजे.

शंकरराव कोल्हे उठतात. ते प्रथम टोपीचा कोन नीट करतात. कोणीतरी ओरडतं, 'कामगारयुतीचा विजय असो.' लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडू लागला आहे. तो टिकविण्यासाठी तुम्ही आम्हीच प्रयत्न केला पाहिजे. आपल्यापुढे अनेक प्रश्न आहेत. जिरायती का बागायती. संघटित मजूर की असंघटित मजूर. संघटित लोक आपले प्रश्न सोडवू शकतात. पण असंघटित लोकांचे काय ? ९० टक्के जनता असंघटित आहे, त्यांच्यासाठी आपण काय करतो याचा तुम्ही-आम्ही विचार करावा. संघटित मजुरांचा इंडेक्स आला, बोनस मिळाला, पण बाकीच्यांचे काय ? संघटित मजुराला १० रुपये रोज मिळतो तर १० फर्लांगावरील मजुराला २॥ रुपये रोज मिळतो. बागायती शेतकऱ्यास एकरी हजारो रुपये फायदा होतो तर दोन मैलांपलीकडे जिरायतीवाल्या शेतकऱ्यास एकरी पन्नास रुपये तोटा येतो त्याचे काय ?

असंघटित लोकांचा टाटा-बिर्ला उपयोग करतात. तसा आपणही करतो काय, याचा तुम्ही-आम्ही विचार केला पाहिजे. तरच लोकशाही वाचेल. नाहीतर या असंघटित लोकांमुळेच क्रांती होऊन अंदाधुंदी माजेल, अशी मला भीती वाटते.

विरोधकांचीही राज्ये आली. तेथेही भ्रष्टाचार झाला. जनतेचा विश्वास गमाविला की सरकार कोसळणारच, मग ते कोणाचेही असो. टिळक-आगरकर यांच्यात आगरकर जास्त बरोबर आहेत असे मला वाटते. प्रथम समाजकारण, नंतर राजकारण हवे. पण आज उलट आहे. समाज झोपी गेला आहे. तो उठेल असे वाटत नाही.

कामगार सभेची व आमची खूप भांडणं झाली. पण नानासाहेबांची मध्यस्थी व आमचा समंजसपणा यामुळे ती मिटली. पण ती अल्पकालीन होती. माणसंही शिकत जातात. आम्हीही शिकत गेलो. कामगारांना बोनस देऊ नये असं आम्हाला कधीच वाटलं नाही. किशोर पवारांनी पहिल्याच बैठकीत ४० टक्के बोनसची मागणी पदरात पाडून घेतली. ते हुशार आहेत.

ते सांगतात, कामगार कोण आहेत, आपलेच आहेत. पण त्याचं काय आहे, ते सगळे आमचे मामा-भाचे आहेत. पण ते कामगार संघात गेले की तुमचे होतात. (हशा)

किशोर पवार आता राज्यपातळीवर गेले आहेत. पण आपलेही सर्व प्रश्न सुटलेले नाहीत. त्यांनी येथेही लक्ष द्यावं असं मला वाटतं. ☐

साखर कामगार सभेचे नेते किशोर पवार सभेच्या कामकाजाचा आढावा घेतात. यश-अपयशाचे मूल्यमापन करतात. याच सभेत कामगार सभेच्या कार्याचे सिंहावलोकन होते. किती वाटचाल झाली ते सांगण्यात येते. या संघटनेकडून समाजाच्या अपेक्षा किती उंचावल्या आहेत तेही स्पष्ट होते. त्याचबरोबर कामगार संघटनेच्या सामाजिक चळवळीतील स्थानाबाबत ऊहापोह होतो.

साखर उद्योगधंदा आज विकसित अवस्थेत आहे. साखर कारखानदारीमुळे महाराष्ट्रातील ज्या काही भागांची स्थिती सुधारली, त्यात कोपरगाव तालुक्याचा प्रामुख्याने समावेश होतो. तेथे सहकारी




साखर कारखान्याबरोबरच खाजगी कारखानेही आहेत. अनेक प्रश्न होते. आजही आहेत. १९४१ पूर्वी रावसाहेब पटवर्धन, विनायकराव भुस्कुटे व गंगाधर ओगले यांनी कोपरगावात कामगार संघटना बांधली. ग्रामीण भागातून आलेले कामगार, त्यात कामाचे स्वरूप हंगामी, त्यात राजकीय वैमनस्य, वैयक्तिक ईर्षा या सर्वांना तोंड देत कामगार संघटना उभारणे एक दिव्यच. १९४२ मध्ये जेव्हा रावसाहेब पटवर्धनांना ब्रिटिशांनी तुरुंगात टाकले तेव्हा कम्युनिस्ट युनियन स्थापन झाली. काम करण्याचे मार्ग-उद्दिष्टे काही प्रमाणात बदलली.

रावसाहेबांची समाजवादी विचारसरणीची कामगार संघटना जरी मोडली असली तरी नव्या संघटनेतील व पूर्वीच्या कामगार संघटनेतील फरक जागरूक कामगारांना जाणवत होता. त्यातील एक कामगार पवार. कोणाचा पाठिंबा नसताना, मार्गदर्शन नसताना, अनुभवाची शिदोरी नसताना, सहकाऱ्यांच्या पाठिंब्यावरच किशोर पवारांनी साखर कामगार सभेची स्थापना केली. तसं पाहिलं तर संपूर्ण नगर जिल्ह्यावर कम्युनिस्टांचा प्रभाव. कॉंग्रेसचा बालेकिल्ला पण असंख्य अडचणी व विरोधाला तोंड देत ही कामगार सभा जगविण्याचा, बळकटपणे रुजविण्याचा प्रयत्न यशस्वी झाला.

इतक्या अडचणी, प्रचंड विरोध असतानाही कामगार सभा रुजली कशी ? इतर कामगार संघटनांत व या संघटनेत काही वेगळेपण आहे का, याचा कानोसा घेण्याचा प्रयत्न केला. कामगार संघटना म्हटल्या की पगारवाढ, बोनस, कामाच्या वेळा याबाबत लढे देणे, संप करणे, कामगारांचे जुजबी प्रश्न सोडविण्यात मदत करणे एवढेच कार्यक्षेत्र दिसते.


फुकट ! फुकट !! फुकट !!!

# पांढरे डाग

आमचे औषध घेतल्याने डागाचा रंग तीन दिवसात बदलतो. तसेच डाग लौकर नाहीसे होऊन त्वचेच्या नैसर्गिक रंगाशी मिळतो. प्रचारासाठी एक फायल औषध फुकट दिले जाते. लवकर मागणी करा.

पत्ता—

DEBTA BHAWAN ( R. L. M. )
P. O. KATRI SARAI ( GAYA)


परंतु कामगार सभेने यापुढे पाऊल टाकलेले आढळले. कामगारांच्या आर्थिक प्रश्नाबरोबरच त्यांचे सामाजिक व शैक्षणिक प्रश्नही महत्त्वाचे असतात. कामगाराला बोनस मिळवून दिला की कामगार संघटनेचे काम संपत नाही हे जाणून कामगार सभेने आपल्या कामगारांना त्या पैशाचा विनियोग योग्य प्रकारे करायला शिकविण्याचा प्रयत्न केला. कामगार सभेने सहकारी पतपेढ्या व सहकारी भांडारे स्थापन करून आपल्या कामगारांना अनेक प्रकारे शिक्षण दिले. नानासाहेब गोरे, एस. एम्. जोशी यांच्यासारखे अनुभवी मार्गदर्शक लाभल्याने कामगार सभेने जोरदार कार्य केले.

कामगार सभेसाठी रात्रंदिवस राबणाऱ्या 'किशोरमामांना' कामगारांनी काहीच कमी पडू दिले नाही. साखर कारखान्यातील आपली नोकरी सोडून ते जेव्हा कामगार सभेच्या कामाकरिता बाहेर पडले, तेव्हा त्यांची जेवणाखाण्याची जबाबदारीसुद्धा गावकऱ्यांनीच स्वीकारली. कामगार सभेने आता नगर जिल्ह्याच्या सीमा ओलांडल्या असून औरंगाबादेतील गंगापूर, पुण्यातील सोमेश्वर, नाशकातील निफाड या ठिकाणी आपल्या शाखा-उपशाखा वाढविण्यास सुरुवात केली आहे.

रौप्यमहोत्सवानिमित्त अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. ते फक्त कोपरगावला न ठेवता साखरवाडी, लक्ष्मीवाडी, चांगदेवनगर, गणेशनगर, सहजानंदनगर, गौतमनगर या सहा ठिकाणी ठेवण्यात आले. परिसंवाद, वादविवाद, निरनिराळ्या स्पर्धा, कुस्तीचे आखाडे आयोजित करण्यात आले.

सगळ्यात गाजला तो 'सहकारी साखर कारखाने: शाप का वरदान' या विषयावरील परिसंवाद. दोन्ही बाजूंनी अगदी टोकाची मते मांडली. काळे–कोल्हे यांनी सहकारी साखर कारखानदारीची बाजू मांडली तर या पद्धतीत कामगार व सभासद शेतकऱ्यांचेही भले नसल्याचे मत रोहमारे वगैरे मंडळींनी व्यक्त केले.

'महिलांपुढील आजच्या समस्या' या विषयावरील परिसंवादही रंगला. त्यात ग्रामीण महिलांनीही भाग घेतला. स्त्री–विमुक्तीसंबंधी मालतीबाई बेडेकरांनी मांडलेले विचार ग्रामीण महिलांना सर्वस्वी क्रांतिकारक वाटल्यास नवल नाही.

जाहीर सभा संपली. शिवदर्शनाचा कार्यक्रम त्यानंतर आयोजित करण्यात आला होता. लोकशिक्षणाचे ते एक साधनच.

त्यानंतर गप्पा रंगल्या.

'कालच्यापेक्षा आजची सभा मोठी होती हो.' एस. एम.

'नाही हो. काल जास्त लोक होते.' किशोर पवार.

दोन मिनिटे वाद.

'आपण असं करू, तुमचे अध्यक्ष नानासाहेबांना विचारू, मग तर झालं.' हशा.

'तुम्ही शहरी महिलांसाठी झगडता, पण ग्रामीण महिलांचे प्रश्न का हाती घेत नाही?' मृणालताईंना एक प्रश्न.

'अहो, आमचे सर्व प्रश्न सारखेच आहेत. आमच्यात शहरी–ग्रामीण असा वाद नाही, बरं का.'

दुसरा प्रश्न हजर होतो. 'तुम्ही म्हणता, धान्याच्या किमती कमी करा. आमची मागणी आहे, धान्याच्या किमती वाढवा. याचा मेळ बसायचा कसा?' विचारात टाकणारा प्रश्न. काय आहे, प्रश्नाला अनेक बाजू आहेत. त्यावर सखोल विचार व्हायला हवा.

चर्चा नाटक–सिनेमाकडे वळते.

'सामना बघितला का ?' एस. एम.

'नाही बुवा.' शंकरराव कोल्हे.

'अवश्य बघा. चांगला आहे.'

'असं. सहकारी साखर कारखानदारावर आहे म्हणे. खरं सांगू का ? सहकारी कारखानदारीबाबत गैरसमजच पसरलेत. फार वाईट इमेज झाली आहे.'

साखर कारखानदार, व्यवस्थापक व कामगारवर्गात खेळीमेळीचे वातावरण निर्माण करण्यात कामगार सभेचा वाटा.

'कामगार संघटना कोणासाठी ? कामगारांसाठी का नेत्यांसाठी, असा एक परिसंवाद ठेवावा व त्याला डाव्यांपासून सर्वांना बोलवावे, असे मला वाटते.' शंकरराव कोल्ह्यांची एक सूचना.

'बोलवा.' कोणीतरी अनुमती देते.

रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने साखर कामगार सभेत चैतन्य भरलं आहे. कामाचे सिंहावलोकनही झालंय. पुढची दिशा काहीशी निश्चित झालीय. त्या मार्गाने कितपत वाटचाल होते ते पाहायचे आहे. ☐

# खानापूरचे शिबिर

शरद गोरे, ग्रामायन

'सह्याद्री विकास मंडळ' या संस्थेने खानापूर (ता. हवेली, जि. पुणे) येथे त्याच परिसरातील ग्रामपंचायत सदस्यांसाठी एक शिबिर दि. ४ ते ६ एप्रिल हे तीन दिवस आयोजित केले होते. आमदार नामदेवराव मते व डॉ. गोपाळराव मोडक यांनी शिबिराचे संयोजन केले होते. सत्तेच्या विकेंद्रीकरणात सर्वात महत्त्वाचा भाग गावाचा असल्याने, गावाचा कारभार व व्यवहार गावातच अधिकाधिक समर्थपणे चालविणे हे महत्त्वाचे आहे. परंतु आज तरी ही जाणीव गावामध्ये निर्माण झालेली दिसून येत नाही. म्हणून ग्रामपंचायत-सदस्यांना काही नवे विचार देण्याच्या हेतूने हे शिबिर भरविण्यात आले होते.

दि. ४ रोजी शिबिराच्या उद्घाटनास ना. शंकरराव पाटील आले होते. उद्घाटनप्रसंगी प्रास्ताविक भाषणात शिबिराचे संयोजक डॉ. मोडक यांनी सह्याद्री विकास मंडळाने आजपर्यंत केलेल्या कार्याची माहिती दिली व मुळशी, वेल्हे आणि प. हवेली या एकाच पाणलोटात येणाऱ्या क्षेत्रातील डोंगराळ भागाच्या विकासासाठी समान भाग विकास योजना (Regional development plan) मांडली. तसेच या भागासाठी रोजगार हमी योजनेतर्फे कामांची निश्चिती व लिफ्ट इरिगेशन योजनांच्या मंजुरीबाबतचे आश्वासन ना. शंकरराव पाटील व आ. अण्णासाहेब मगर यांच्याकडून घेतले. याच दिवशी सकाळी खानापूरजवळच मांडवी खुर्द येथे एक उपसा जलसिंचन योजनेचा भूमिपूजन समारंभ झाला होता. त्या संदर्भात आणखी योजनांची मागणी पुढे ठेवण्यात आली.

सायंकाळी महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख डॉ. लिंगायत यांनी अधिक दूध देणाऱ्या गायींच्या संकरित पैदाशीची माहिती सांगून त्याबाबत चित्रपटही दाखविले. हा प्रश्न शेतकऱ्यांना अधिक जिव्हाळ्याचा वाटत असल्याने त्यास प्रतिसाद खूपच मिळाला.

शनिवारी सकाळी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे यांनी रोजगार हमी योजना सविस्तर समजावून सांगितली. तसेच या योजनेमध्ये या भागातील लोकांना याच भागात काम दिले जाते, हेही स्पष्ट केले. खा. विठ्ठलराव गाडगीळ यांनी सद्यःस्थितीतील सामाजिक व आर्थिक दुरवस्थेचे विवेचन केले व ही अवस्था नष्ट करण्यासाठी प्रत्येकानेच प्रयत्न करणे कसे आवश्यक आहे हे सांगितले.

दुपारी पुणे शेतकी कॉलेजचे विकास-विभाग प्रमुख डॉ. थोरात व त्यांचे सहकारी यांनी भातपिकावर अत्यंत महत्त्वाची माहिती दिली.

सायंकाळी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे प्रमुख डॉ. गुजर यांनी आपले अनुभव व कार्य सांगून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर श्री. शिरुभाऊ लिमये यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शनपर विचार सांगितले.

रात्री शेती विकास विभागातर्फे भात आणि ज्वारीच्या सुधारलेल्या जातींच्या लागवडीविषयी माहितीपूर्ण चित्रपट दाखविण्यात आले.

रविवार दि. ६ रोजी सकाळी गांधी स्मारक निधीच्या भंगीमुक्ती चळवळीचे कार्यकर्ते श्री. तोडणकरगुरुजी यांनी घरी गॅसप्लँट बसवून जळण व खत मिळवून शिवाय स्वच्छता व आरोग्य देखील कसे वाढविता येईल, यासंबंधी उद्बोधक व्याख्यान दिले. याशिवाय केवळ स्वच्छता म्हणून संडासाचे महत्त्व पटवून देऊन त्यांनी निरनिराळ्या प्रकारच्या संडासांची तपशीलवार माहिती दिली. त्यांच्या भाषणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या गॅसप्लँटमुळे जळण मिळाले तर आज मोठ्या प्रमाणावर होत असलेली जंगलतोड बऱ्याच अंशी कमी होईल. तसेच या प्लँटमधून मिळणाऱ्या खतामध्ये नत्रांचे प्रमाण अन्य खतांहून अधिक असते, हीही गोष्ट त्यांनी निदर्शनास आणून दिली.

रविवारी दुपारी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू श्री. दाभोळकर यांनी बाहेरून मिळणाऱ्या मदतीची अपेक्षा व साहाय्य घेण्याची वृत्ती सोडून स्वतः कार्यास प्रवृत्त व्हावे, हा विचार सांगितला. तसेच समाजसुधारणेसाठी रूढींचा अडथळा कसा होतो, हे सांगून ते पुढे म्हणाले की, म. फुले यांसारख्या समाजसुधारकांची आज आपण प्रशंसा करीत असलो तरी आपण स्वतः जर रूढी सोडण्यास तयार नसू, तर आपण ढोंगीच ठरतो. या संदर्भात त्यांनी पुणे विद्यापीठाच्या पदवीदान समारंभप्रसंगी केलेल्या भाषणातील एक मुद्दा उद्धृत केला. त्यांनी सांगितले की, जुने ते सोने हा विचार टाकून द्या, तसेच जुने ते सोने नव्हेच ही कल्पनाही सोडून द्या आणि जुने व नवे यांमधून उपयुक्त ते निवडण्याची तयारी ठेवा.

शिबिरास तीनही दिवस ५०–५५ शिबिरार्थी पूर्ण वेळ उपस्थित होते व काही कार्यक्रमांना उपस्थिती १०० च्या वरही जात होती. सुधारित व संकरित गायींची पैदास, भात व ज्वारीच्या सुधारित जातींची लागवड व भाताची दुबार पिके घेण्याची कल्पना यासारख्या व्यवहारी जीवनात उपयुक्त गोष्टींना शेतकऱ्यांनी चांगलाच प्रतिसाद दिला, त्याचबरोबर सामाजिक सुधारणांसाठी रूढींचे आवरणातून बाहेर पडण्याची आवश्यकता, याचकवृत्ती सोडून खंबीरपणे स्वकर्तृत्वावर स्वावलंबी होण्याचा निश्चय यांसारख्या वैचारिक पातळीवरील मुद्द्यांवरही शिबिरार्थींनी विचार केल्याचे आढळून आले. शिबिरास वर उल्लेखिलेल्या पाहुण्यांखेरीज आणखी काही मोठ्या पाहुण्यांनी भेट दिली व शिबिरार्थींना थोड्याबहुत प्रमाणात मार्गदर्शनही केले. तसेच वडगाव धायरी येथील तरुण कार्यकर्ते श्री. बाळासाहेब चव्हाण यांनी शेती हा व्यापारी दृष्टीने फायद्याचा व्यवसाय होणे आवश्यक आहे, हा मुद्दा मांडून कारखान्यातील किंवा कचेऱ्यातील नोकरवर्गाप्रमाणे शेतकरी काही काळ जरी संपावर गेले तरी देशाची स्थिती कशी होईल असा प्रश्न उपस्थित केला. अशा रीतीने शिबिरामध्ये सर्वांचे मत शेतकऱ्याने स्वेच्छेने व स्वावलंबनाने आपली आर्थिक उन्नती घडवून आणावी असे दिसले. कारण सामाजिक किंवा राजकीय उन्नती ही आर्थिक सुस्थिरतेखेरीज होऊ शकत नाही. □

# डयुबकेक

## मतभेद म्हणजे पक्षद्रोह नव्हे

वा. दा. रानडे

चेकोस्लोव्हाकियाचे नेते अलेक्झांडर डयुबकेक पदच्युत झाल्याला १४ एप्रिलला सहा वर्षे पुरी झाली. स्लोव्हाक वनखात्याच्या ब्राटिस्लाव्हा मशिनरी पार्कमध्ये इन्स्पेक्टर म्हणून ते सध्या काम करीत आहेत. त्यांच्याकडे अजूनही संशयाने पाहिले जाते, त्यांच्या प्रत्येक हालचालीवर पाळत ठेवली जाते. पण या छळामुळे ते आपल्या वैचारिक भूमिकेपासून ढळलेले नाहीत. त्यांच्या नेतृत्वाखाली चेकोस्लोव्हाकियात हाती घेतलेला समाजवादाचा नवा प्रयोग रशिया व पूर्वयुरोपच्या राष्ट्रांनी लष्करी आक्रमण करून मोडून काढला. पण त्या वेळी आपले काही चुकले असे डयुबकेक यांना अजूनही वाटत नाही. आपल्या भूमिकेवर ते ठामपणे उभे आहेत. ऑक्टोबर १९७४ मध्ये फेडरल असेंब्लीस पाठविलेल्या एका पत्रात त्यांनी आपली भूमिका विशद केली. पण असेंब्लीने त्याची दखलही घेतली नाही. प्रागच्या आजच्या सत्ताधाऱ्यांचे धोरण लक्षात घेता तशी अपेक्षा करणेही चुकीचे होते. चेकोस्लोव्हाकियातील डयुबकेकच्या बाजूच्या कार्यकर्त्यांनी आपली भूमिका पाश्चात्त्य देशातील कम्युनिस्टांना व पुरोगामी विचारवंतांना कळावी या उद्देशाने चोरून हे पत्र त्यांच्याकडे पाठविले. त्यातले काही उतारे 'ऑब्झर्व्हर'च्या १३ एप्रिल १९७५ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहेत.

आपल्या प्रत्येक हालचालीवर गुप्त पोलिसांची सतत पाळत कशी असते याची उदाहरणे डयुबकेक यांनी डिसेंबर १९७३ मध्ये टोपोल्कानी फॉरेस्ट्री वर्क्सला भेट दिली. फावल्या वेळात जवळच्या एका शेताची त्यांनी पाहणी केली. एका शेडमधून लोहाराच्या हातोडीचे आवाज त्यांना ऐकू आले. ते तेथे गेले तो एक लोहार एकटाच काम करीत होता. त्यांनी त्याच्या कामासंबंधी आस्थेने चौकशी केली. लोहाराने डयुबकेक यांना ओळखले. मला घोड्याची नाल बनविता येते काय पाहू या, असे म्हणून डयुबकेक यांनी एक नाल तयार केली. हा एक साधा प्रसंग. पण डयुबकेक कोठे कोठे गेले, काय बोलले याची कसून चौकशी सुरू झाली. 'डयुबकेक टोपोल्कानी येथे लोकप्रिय होण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनी घोड्याचे नाल तयार केले व प्रत्येकावर स्वतःची सही कोरून ते स्थानिक लोकांना दिले.' असा अहवाल चौकशी अधिकाऱ्यांनी वर पाठविला. वास्तविक डयुबकेक यांनी फक्त एक नाल तयार केली होती.

बागेत काम करताना, मावशीला वाढदिवशी भेटायला जाताना आपल्यावर गुप्त पोलीस कशी पाळत ठेवत होते, याचेही वर्णन या पत्रात डयुबकेक यांनी केले आहे. पण त्यांच्या पत्रातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे आपल्या वैचारिक भूमिकेचे त्यांनी केलेले समर्थन.

डयुबकेक लिहितात, 'गुप्त पोलीसयंत्रणेचा वापर वर उल्लेखलेल्या बेकायदा हालचालींसाठी केला जात आहे आणि या यंत्रणेत काम करणाऱ्या शक्ती राजकीय व सार्वजनिक जीवनाचे संपूर्ण नियंत्रण आपल्या हाती आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळेच पक्षातील 'शत्रू'विरुद्ध अशा हालचाली करण्याचा आदेश हे लष्करी सत्ताधारी देत आहेत. मी जेथे काम करतो तेथेच केवळ नव्हे तर सर्वत्र पाळत ठेवणारांचे व माहीतगारांचे जाळे विणण्यात आले आहे. त्यामुळे पक्षाच्या हालचालीत आणि राजकीय शिक्षणकार्यात अडथळे येत आहेत. पक्षाचे मुख्य कार्य त्यामुळे विफल होत असून त्या जागी सक्तीने गोष्टी केल्या जात आहेत. कारभार करण्याचा हा अधिक सोपा मार्ग असेल, पण केवळ चेकोस्लोव्हाकियातच नव्हे तर इतरत्रही समाजवादाला तो फार धोक्याचा आहे.

'खुल्या चर्चेची शक्यता जेथे नाकारली गेली आणि वरिष्ठ जागांवर नियमित व परिणामकारक नियंत्रण ठेवण्याची शक्यता राहिली नाही, त्या पक्षात भ्रष्टाचार पसरणे अटळ आहे. भीतीमुळे बहुसंख्य पक्ष सभासद आपल्याला पसंत नसलेल्या धोरणास मंजुरी देतात. दुटप्पी वर्तन सार्वत्रिक होते. सभेत लोक एका प्रकारे वागतात तर घरी, खाजगी संभाषणात, मित्रांशी बोलताना त्यांचे वर्तन निराळे असते. पक्षात, कामगार संघटनांत, युवक चळवळीत, महिलांच्या चळवळीत, तसेच इतर चळवळीत आणि वृत्तपत्रात लोक आपली भूमिका उघडपणे मांडीत नाहीत. संशय, भीती, ढोंगीपणाने वागणे, पोलिसांचा खबऱ्या होणे असे वातावरण तयार होते. अशा परिस्थितीत पक्षात 'लोकशाही बहुमत' मिळविणे अशक्य होते आणि विकासासाठी आवश्यक त्या क्रियाशीलतेचा अभाव आढळतो.

'विकासाच्या विशिष्ट अवस्थेत पक्षाचे धोरण कशा पद्धतीने अंमलात आणले पाहिजे आणि अडचणी व अडथळे कशा पद्धतीने सोडविले पाहिजेत याबाबत सध्याच्या पक्षनेतृत्वाशी आमचे मतभेद आहेत. पण तेवढ्यासाठी मला व माझ्यासारख्या इतरांना पक्षद्रोही मानले जावे हे मला सहन करणे कठीण आहे. कामगार वर्गाच्या चळवळीची आणि समाजवादी चळवळीची, आजची पातळी आणि समाजवादी सत्ता व समाजवादाचा विकास लक्षात घेता, पक्षधोरणांशी एकमत सक्तीचा, विशेषतः लष्करी बळाचा अवलंब करून मिळवता कामा नये.' वॉर्सा-करार राष्ट्रांच्या फौजांचे आक्रमणासंबंधी ते लिहितात, 'स्वतःला चेकोस्लोव्हाक प्रतिनिधी म्हणविणाऱ्या एका गटाने निमंत्रण दिल्याने वॉर्सा करार राष्ट्रांच्या फौजांनी आक्रमण केले असे सोव्हिएट वृत्तसंस्थेने जाहीर केले. तसे असल्यास अगदी सोप्या शब्दात सांगावयाचे तर ती एका गटाची हालचाल होती. सबंध चेकोस्लोव्हाक कम्युनिस्ट पक्ष आणि चेक व स्लोव्हाक राष्ट्रांचा तो नैतिक व वैचारिक उपमर्द आहे. चेकोस्लोव्हाक-रशिया संबंधांना या निर्णयाने जबर धक्का बसला. रशियन फौजांच्या खांद्याला खांदा लावून जे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढले अशा लाखो लोकांना 'रशिया-विरोधी' हे लेबल लावण्यात आले. 'रशिया विरोधक' असल्याच्या आरोपावरून पक्षातून हकालपट्टी झालेल्या कम्युनिस्टांची संख्या पाच लाखांवर आहे.

'समाजवादी राष्ट्र गटातून बाहेर पडून चेकोस्लोव्हाक समाजवादी प्रजासत्ताकास आपले धोरण आखता येईल असे त्यावेळीही मला वाटत नव्हते आणि आजही वाटत नाही. रशियाशी व इतर समाजवादी

पृष्ठ २६ वर

# पॅपिलॉन



मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

---

कोर्ट मार्शलचा दिवस उगवला. इतर गुन्हेगारांना कमी–जास्त वर्षं एकांतवासाची शिक्षा मिळाली. पॅपिलॉन आणि त्याच्या दोन मित्रांना निदान पाच वर्षं तरी मिळणार असा अंदाज होता. परंतु पॅपिलॉनच्या उत्कृष्ट बचावाच्या भाषणामुळे दोनच वर्षांवर निभावलं. दोन वर्षं एकांतवास. त्यातून सुखरूप बाहेर येणं इतकं सोपं नव्हतं. वेड लागणे किंवा आत्महत्या करणे या दोन शक्यता अधिक. दुसऱ्याच दिवशी ‘ सेंट जोसेफ ’ बेटाकडे ते रवाना झाले. मध्यंतरीच्या टप्प्यात ‘ रॉयेल ’ वर देगा, गाल्गानी आणि इतर जुने मित्र भेटले. सर्वांना अत्यानंद झाला. ‘ एकांतवासात आम्ही तुझी काळजी घेऊ ’ मित्रांनी आश्वासन दिलं . . . . .

---

## प्रकरण पंधरा : एकांतवास

एक होडी तयार होती. एकांतवासाची शिक्षा झालेल्या एकोणीस जणांपैकी दहा या होडीतून जाणार होते. माझं नाव पुकारलं गेलं. शांतपणे देगा म्हणाला, ‘ थांबा. हा माणूस नंतरच्या खेपेला जाईल. ’

इथे आल्यापासून बघत होतो, कोणीही कैदी पहारेकऱ्यांना काही किंमतच देत नव्हते. शिस्त नावालाही नव्हती. देगा माझ्या शेजारी उभा राहिला. आम्ही बोलू लागलो. त्याला माझ्या पलायनाचा सर्व इतिहास आधीच ठाऊक झाला होता. तो फक्त एवढंच म्हणू शकला–‘ पुढच्या वेळी तू नक्की यशस्वी होशील. ’ माझ्या आधीच्या अपयशामुळे त्याला खूपच दुःख झालं होतं.

‘ मी मुख्य हिशेबनीस आहे, त्यामुळे नेहमी गव्हर्नरजवळ असतो. कोठडीत काळजी घे. मी आत तंबाखू आणि पुरेसं अन्न पाठविण्याची व्यवस्था करीन. तुला काहीही कमी पडणार नाही. ’

‘ पॅपिलॉन, तयार राहा–! ’

माझी निघण्याची वेळ झाली होती. ‘ पुन्हा लवकरच भेटू. अच्छा. बाय् बाय् ! ’

आणि मी होडीत शिरलो. वीस मिनिटांच्या आत आम्ही सेंट जोसेफच्या किनाऱ्याला लागलो. पहाऱ्यामध्ये तुरुंगाच्या दिशेनं निघालो. वाटेत एकही कैदी दिसत नव्हता. लोखंडी गजांच्या मोठ्या दारातून सर्वांनी आत प्रवेश केला. चारी बाजूंना उंचच्या उंच भिंती होत्या. इमारती एकूण चार. एक कार्यालयाची, इतर तीन कोठड्या असलेल्या. पहिल्या इमारतीत आम्ही जाऊन ओळीत उभे राहिलो. एकोणीसजण. गव्हर्नरनं छापील ठशाचं भाषण दिलं. ‘ कैद्यांनो, तुम्हाला माहीतच असेल की आधीच जन्मठेप मिळालेल्या गुन्हेगारांनी केलेल्या अपराधाला शिक्षा म्हणून एकांतवास देण्यात येतो. येथे आम्ही कोणालाही शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत नाही. त्याचा काही एक उपयोग नसतो. परंतु तुम्हाला ताळ्यावर कसं आणायचं हे आम्हाला चांगलं ठाऊक आहे. इथे फक्त एकच नियम–तोंड बंद ठेवणे. संपूर्ण शांतता. संदेश देणं अंगलट येईल : उघडकीस आलं तर कडक शिक्षा देण्यात येते. खरोखर खूप आजारी पडाल तरच तसं जाहीर करा. एवढंच मला सांगायचं आहे. आणि हो, धूम्रपान एकदम वर्ज्य. सगळ्यांना नीट समजलं ? वॉर्डर्स, प्रत्येकाची कसून

झडती घ्या आणि एकेका कोठडीत बंद करा ! शॅरियर, जोन्स आणि मॅच्युरेट या तिघांना तीन निरनिराळ्या इमारतीमध्ये टाका ! सॅन्तोरी महाशय, हे तुम्ही जातीनं पाहा !'

दहा मिनिटांत मला 'ए' ब्लॉकमधील २३४ क्रमांकाच्या कोठडीत बंद करण्यात आलं. जोन्स आणि मॅच्युरेटला अनुक्रमे बी आणि सी ब्लॉकमध्ये. न बोलता एकमेकांकडे नुसता दृष्टिक्षेप टाकून आम्ही निरोप घेतला. त्या क्षणीच आम्ही मनाशी खूणगाठ बांधली की सुखरूप बाहेर पडायचं असेल तर तिथल्या अमानुष नियमांचं पालन केलंच पाहिजे. सुटकेच्या प्रयत्नात मला विनातक्रार साथ देणाऱ्या माझ्या दोन साथीदारांकडे मी डोळे भरून पाहून घेतलं. गेल्या चौदा महिन्यांत आमच्यामध्ये अतूट अशी मैत्री निर्माण झाली होती. मला हुंदकाच फुटला.

मी कोठडीचं काळजीपूर्वक निरीक्षण सुरू केलं. 'ब्यूलियू' तुरुंगातल्यासारखीच इथे परिस्थिती होती. फ्रान्ससारख्या सुसंस्कृत देशानं सेंट जोसेफवर अशा प्रकारचा तुरुंग उभारला असेल या गोष्टीवर माझा पूर्वी क्षणभरही विश्वास बसला नसता. एकाला एक लागून अशा दीडशे कोठड्या, लोखंडी दारांखेरीज नुसत्या जाडजूड चार भिंती–कल्पना करा. दारावर लिहिलं होतं–'वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आज्ञेशिवाय हे दार उघडण्यास मनाई आहे.' डावीकडे बिछाना आणि लाकडी उशी. ब्लँकेट. समोरच्या कोपऱ्यात बसण्यासाठी सिमेंटचा कट्टा. मग, ब्रश, लाकडी चमचा. लोखंडी थाळी. ती आतबाहेर करता येईल एवढी दारामध्ये फट. कोठडी दहा फूट उंच. बाहेर सतत गस्त.

एकूण वातावरण भयानक होतं. बाहेरच्या व्हरांड्यामध्येच सूर्यप्रकाश जेमतेम प्रवेश करी. त्यामुळे आत दिवस आहे का रात्र हे कळणंच मुष्किल होतं. सर्वत्र अंधःकार. मी एकदम चालायला सुरुवात केली. एकाग्र चित्तानं कानावर काही आवाज पडतो का ते ऐकू लागलो. पावलांचाही आवाज येऊ नये म्हणून वॉर्डर्स आणि कैद्यांना मऊ स्लिपर्स घालाव्या लागत. मी स्वतःशी म्हणालो, 'या इथे, कोठडी क्रमांक २३४ मध्ये, शॅरियर (टोपण नाव पॅपिलॉन) दोन वर्षांची शिक्षा यशस्वीपणे भोगण्याचा प्रयत्न करणार आहे म्हणजेच सातशे तीस दिवस, वेड न लागता. नरभक्षक हे तुरुंगाचं नाव खोटं पाडणं आता सर्वस्वी तुझ्यावर अवलंबून आहे.'

एक, दोन, तीन, चार, पाच; अबाउट टर्न. एक, दोन, तीन, चार,




पाच; अबाउट टर्न. लंबकाचं कार्य पुन्हा सुरू झालं. तुम्ही शांतपणे झोपा, हलकट पंचमंडळीहो, शांत झोपा. पहारेकऱ्यांची चाहूल. विचारप्रवाहाला थोपवणं अत्यंत कठीण काम होतं. जवळजवळ अशक्यच. मग निदान त्याला असं वळण द्यावं की कमीत कमी खिन्नता येईल. विचार संपूर्णपणे दाबण्यापेक्षा त्याची दिशा बदलणं बरं.

इतक्यात एक शिट्टी ऐकू आली. बिछाना भिंतीवरून खाली घेण्याची वेळ झाली होती. मागोमाग आवाजही आला. 'नवीन लोकांसाठी सूचना. तुम्ही बिछाना पसरून वाटलं तर त्यावर आडवं होऊ शकता.' मी आपलं चालणंच पसंत केलं. या वेळी काय झोप येणार ? कोठडीच्या छतावरही पहारेकऱ्यांना चालण्याची सोय होती. एक, दोन, तीन, चार, पाच : डोकं खाली, हात पाठीशी, पावलं समान लांबीची टाकणं–इकडून तिकडे, तिकडून इकडे. झोपेत चालल्याप्रमाणे क्रिया घडत होती. पाच पावलं झाल्यावर भिंत दिसतसुद्धा नव्हती, फक्त घासत होती. ज्याला कधी अंत नाही आणि वेळेची मर्यादा नाही अशी अखंड शर्यत सुरू झाली.

होय, पपी. यातून पार पडणं वाटतं तितकं सोपं नाही बरं ! त्या वेळी अत्यंत भयानक संवेदना निर्माण होत होत्या. त्या वातावरणाची सवय होईपर्यंत काही महिने लोटले होते.

वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस : म्हणजे दोन वर्षांचे सातशे तीस, अर्थात 'लीप इयर' आलं नाही तर. मला हसू आलं. सातशे तीस काय आणि एकतीस काय–एकूण एकच. छे ! एक दिवस म्हणजे चोवीस तास जास्त, थोडेथोडके नाहीत. असे सगळे मिळून तास किती होतील बरं ? आपल्याला तोंडी हिशेब करता येईल का ? सहज, पॅपिलॉन महाराज, तुम्हाला सतरा हजार पाचशे वीस तास या पिंजऱ्यात काढायचेत–हिशेब चुकला नसेल तर ! आता मात्र त्यांची मिनिटं करायला नकोत. तासांपर्यंत ठीक आहे. मिनिटंच जर मोजायची तर सेकंद का नको ? हा सगळा काळ मला एकट्याला काढायचाय् !

माझ्या डावीकडच्या आणि उजवीकडच्या कोठडीत कोण बरं असेल ? त्या आधीच भरल्या असतील तर त्यांनाही कुतूहल वाटत असेल–२३४ क्रमांकाच्या कोठडीत कोण नवीन आलं !

पाठीमागे जमिनीवर काही तरी पडल्याचा आवाज आला. काय असेल बरं ? एखादा संदेश ? मला एवढंच कळलं की काही तरी लांब आणि दोरीएवढा जाड पदार्थ होता.–दिसला म्हणण्यापेक्षा तो जाणवला. मी उचलणार एवढ्यात तो वळवळ करीत भिंतीकडे जाऊ लागला. मी एकदम दचकलो. भिंत गुळगुळीत असल्यामुळे तो प्राणी तीन-तीनदा खाली पडत होता. शेवटी मी त्याला पायानं चिरडलं. माझ्या स्लिपरखाली मऊमऊ लागलं. गुडघ्यावर बसून जितकं जवळून पाहता येईल तितकं पाहून घेतलं–ती एक मोठी गोम होती. चांगली नऊ इंच लांब, दोन बोटं जाड. मला इतकी शिसारी आली की मी तिला लाथेनं बिछान्याखाली ढकलून दिलं. उद्या दिवसा तिच्याकडे पाहावं झालं.

त्यानंतर छतावरून वारंवार ते प्राणी खाली पडत असल्याचं आढळलं. मला त्यांची सवयच झाली. झोपल्यावर माझ्या उघड्या शरीरावरून त्या फिरत. त्यांना न पकडता मी मुक्तपणे हिंडू देई. ती किळसवाणी गोम चावली तर अर्धा दिवस चांगला ताप चढे,

सहा तासांपर्यंत आग आग होई. तरीही ती एक करमणूकच झाली– निदान मन त्यात गुंतून राही. खाली पडल्याचा आवाज आला की, काही वेळ मी तिला ब्रशनं त्रास देई किंवा तिच्याशी खेळत बसे. इकडेतिकडे लपायची संधी देऊन थोड्या वेळानं तिला हुडकून काढीत असे.

एक, दोन, तीन, चार, पाच...स्मशानशांतता. रात्रीचं कोणीच घोरत नाही ? कोणाला साधा खोकलाही येत नाही ? पॅपिलॉन, तुला गोम नावाच्या प्राण्याबरोबर दोन वर्षे काढावी लागणार. सान्ता मार्ता तुरुंगाच्या अंधारकोठडीत रोज भरती येत असे, पण निदान लोकांचे आवाज, गाणी किंवा वेड्यांचे वेडेचार कानावर पडत. या इथल्या तुरुंगापेक्षा तो परवडला. पण छे ! तिथे सहा महिन्यांच्या वर कोणीही जगू शकत नाही. इथे चार–पाच वर्षही काढायची म्हटली तर शक्य आहे. वा ! हे नुसतं बोलणं सोपं आहे. उगीच नाही इथे कैदी आत्महत्या करीत. आत्महत्या ! कपड्यांपासून दोर बनवून, वरच्या गजाला टांगून घेऊन जीव देणं कठीण नाही. 'वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगी' शिवाय दार उघडता येत नसल्यामुळे मरायला भरपूर वेळ मिळेल–त्यांच्या अगदी लक्षात आलं तरी. छतावरच्या बारीक भोकातून पहारेकरी खाली पाहू शकतात.

मी हे सर्व लिहीत आहे ते चित्तथरारक नाही की गतिमान नाही. ज्यांना तशा गोष्टींची आवड आहे, त्यांनी बेलाशक ही पाने उलटावीत. पण माझ्या त्या पहिल्या प्रतिक्रिया नोंदणं मला तरी आवश्यक वाटतं. एकांतवासात पुरलो गेल्यावर मनात जे जे विचार आले ते प्रामाणिकपणे, तपशीलवार मांडणं माझं कर्तव्य आहे.

गेले कित्येक तास मी चालत होतो. पहारे बदलताना अंधारात हालचालींचे सूक्ष्म आवाज येत. दोघातला एकजण पाय खरडत चाले. तो पहिल्या वॉर्डरसारखा शांत नव्हता. आता किती वाजले आहेत ? उद्या वेळ मोजण्याची पद्धत शोधून काढावी. दरवाजामधील फट दिवसातून चार वेळा उघडायची, तेवढं तरी बरं. त्यामुळं वेळ अंदाजे कळणं शक्य होतं. शिवाय पहाऱ्याच्या पाळ्यांवरूनही तो अंदाज येत असे. निश्चित वेळ समजणं तितकं कठीण नव्हतं.

यांत्रिक वाटचाल सुरूच. बघता बघता मी भूतकाळात मिसळून जात असे. लाली होडीतून शिंपले आणायला गेली आहे. किनाऱ्यावरची मऊ वाळू सुखकर वाटते आहे. झोरायमानं एक मोठा मासा तळून मला आणून दिला आहे. ती माझ्यासमोर पाय पसरून बसली आहे. रुचकर माशामुळे मी तिच्यावर खूष झाल्यामुळे तीही आनंदात आहे.

मी मुळी कोठडीत वावरतच नव्हतो. सेंट जोसेफ मला ठाऊकच नसल्याप्रमाणे मी किनाऱ्यावर पहुडलो होतो. नंतर हात वाळूनं घासून समुद्रावर चूळ भरायला गेलो. तोंडावरही पाण्याचे हबके मारून घेतले. एकदम हुशारी वाटली. माझे केस किती वाढले होते. ती सर्व रात्र मी टोळीबरोबरच काढली. दोघींशी रममाण झालो. त्यांची उत्तम साथ मिळाली. मला क्षणभरही झोप आली नाही. बिछान्यावर आडवासुद्धा झालो नाही तर. न जाणो, पापण्या मिटल्या की सगळी दृश्यं नाहीशी व्हायची. सहा महिन्यांपूर्वीचे प्रसंग माझ्यासमोर तितक्याच जिवंतपणे घडत होते.

सकाळ झाली असावी. बिछाने भिंतीवर टांगण्याची शिट्टी झाली. माझ्या उजव्या बाजूच्या शेजाऱ्यानं त्याचा बिछाना उचलल्याचा लहानसा आवाजही आला. तो हळूच खोकलासुद्धा. तोंडावर पाणी मारल्याचा आवाज. इथे आंघोळ कशी करायची ?

'का हो, इथे स्नान कसं करता ?'

'बाबा रे, तुला ते ठाऊक नाही म्हणून मी क्षमा करतो. पण कामावरच्या वॉर्डरशी बोललं तर गंभीर शिक्षा मिळते. आंघोळ करण्यासाठी कोपऱ्यातल्या बादलीमध्ये उभा राहा. एका हातानं डोक्यावर तपेलीतून पाणी ओत आणि दुसऱ्यानं अंग चोळ. तुझं ब्लँकेट तू अजून उलगडलं नाहीस ?'

'नाही.'

'त्याच्या आत तुला कॅनव्हसचा टॉवेल मिळेल.'

काय ? तुम्ही अशी कल्पना करू शकता ? वॉर्डरशी काहीही बोलायला परवानगी नाही. अगदी कोणत्याही कारणासाठी. मग एखाद्या आजारामुळे खूप दुखत असेल तर ? तुम्ही मृत्युपंथाला लागला असाल तर ? हृदयविकार, दमा, अल्सर असले रोग उद्भवले तर ? नाही. तरीही गप्प बसायचं. छे ! निदान एवढे शब्द तरी कानावर पडू दे : 'आजारी असाल तर मरा, पण तोंड बंद ठेवा.'

असह्य शांतता.

सर्व काळोख.

क्लॅक्, क्लॅक्, क्लॅक्. दारांवरच्या झडपा उघडल्या गेल्या. मी त्यातून बाहेर डोकावण्याचा धोका पत्करला. डोकं संपूर्ण दाराबाहेर घालून आजूबाजूला पाहिलं. डोकीच डोकी. प्रत्येकानं माझ्यासारखंच केलं होतं. उजवीकडच्या माणसानं चेहऱ्यावर कोणताही भाव न दर्शवता माझ्याकडे पाहिलं. त्याचा मेंदू अती हस्तमैथुनामुळे बथ्थड झाला होता. शंकाच नव्हती. बिचाऱ्याची मला कीव आली. डाव्या बाजूचा मला झट्कन् म्हणाला, 'किती वर्षं ?'

'दोन.'


'मला चार वर्षं मिळालीत. एक संपलं. तुझं नाव काय ?'

'पॅपिलॉन.'

'मी जॉर्जस. तुला कुठे पकडलं ?'

'पॅरिसला. आणि तुझं काय ?'

त्याला उत्तर द्यायला अवसर मिळाला नाही. कॉफी आणि ब्रेड हे पदार्थ दोन कोठड्यांपलीकडे येऊन पोचले होते. त्यानं डोकं आत घेतलं. मीही तेच केलं. माझा मग बाहेर धरला. तो कॉफीनं भरला. मागोमाग ब्रेड आत आला. पंधरा मिनिटांत पुन्हा सामसूम. दुपारी मासाच्या छोट्या तुकड्यांसह सूप मिळे. संध्याकाळी वाटाण्याची

नॅशनल
ब्लॅक टूथ पावडर
काजळ, नेत्रांजन, बाळगोळी

उत्पादक
काकडे अँड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०

उसळ. त्या दोन वर्षांमध्ये यात कधीही बदल झाला नाही. दुपारी तर नाहीच. क्वचित रात्री भात, उकडलेलं मास किंवा एखादी भाजी मिळे.

दर पंधरा दिवसांनी डोकं दाराबाहेर काढायचं. एक कैदी येऊन तुळतुळीत दाढी करून जायचा.

इथे येऊन तीन दिवस झाले होते. मला एका गोष्टीची आशा होती. 'रॉयेल'वर मित्रांनी आश्वासन दिलं होतं की, खाण्या-पिण्याची चोख व्यवस्था होईल. धूम्रपानही. अद्याप तसं काहीच घडलं नव्हतं. मला तर ते अशक्य कोटीतलंच वाटत होतं. म्हणूनच काही न मिळाल्याचं तेवढं आश्चर्य वाटत नव्हतं. इच्छा तर नक्कीच होती. सिगारेट म्हणजे चैनच–शिवाय धोकादायक. अन्नपदार्थ? चालतील, त्याला प्राधान्य. कारण दुपारचं सूप म्हणजे नुसतं उकळतं पाणी असायचं. त्यात तीन–चार औंसाचे तुकडे. रात्रीची तीच तऱ्हा होती. आम्हाला नियमानुसार देणं आवश्यक होतं इतकं अन्नही ते देत नसणार. माझी तशी खात्रीच होती. वाढतानाही नीट ढवळून वाढत नसत, मग नुसतं पाणी नाही मिळणार तर काय? ही उपासमार अत्यंत वाईट. इच्छाशक्ती टिकण्यासाठी शारीरिक बळही आवश्यक असतं.

बाहेर व्हरांड्यात झाडण्याचं काम चालू होतं. माझ्या दारासमोर झाडूवाला जास्त वेळ काय करतोय्? दरवाजावर खराटा घासल्याचा आवाज. मी सावध झालो. जवळ जाऊन नीट पाहिलं. दाराखालून पांढरा कागद डोकावताना दिसला. तो आत नीट सरकत नव्हता. मी तो ओढून घ्यावा म्हणून बाहेरचा इसम थांबला असावा. त्याला त्याशिवाय पुढे जाता येईना. मी कागद ताब्यात घेऊन उलगडला. त्यावर अंधारात चमकणाऱ्या शाईनं लिहिलं होतं. 'पपी, उद्यापासून तुझ्या भांड्यात पाच सिगारेट्स आणि वाळलेल्या नारळाची वाटी रोज पाठवू. तब्येतीच्या दृष्टीनं खोबरं नीट चावून चावून खात जा, नंतर चोथा गिळणे. सकाळी बादली रिकामी करताना सिगारेट ओढत जा. सकाळच्या कॉफीनंतर अजीबात नको. दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणानतर. सोबत पेन्सिलचा तुकडा आहे. तो भिंतीखालच्या एखाद्या फटीत लपवून ठेव. कशाचीही गरज लागली तर राहिलेल्या कागदाचे बारीक तुकडे करून त्यावर लिहून कळव. झाडूवाला विश्वासू आहे. त्यानं दारावर खराटा घासल्यावरच चिठ्ठी बाहेर सार, अन्यथा नको. कागदाची गुंडाळी कानात घालून ठेव, म्हणजे चार्जर आत-बाहेर करायला नको. बेस्ट लक. सप्रेम निरोप– गालगानी, देगा.'

या चिठ्ठीमुळे मला किती धीर आला असेल याची कल्पनाच करा. सच्चे दोस्त. आता माझ्या चालण्यात जोर आला. त्या थडग्यातून जिवंत बाहेर पडण्याविषयी विश्वास निर्माण झाला. चालता चालता मी विचार करू लागलो, 'त्या दोघांचं हृदय किती थोर आहे. ते खरोखर गंभीर धोका पत्करताहेत. पोस्टमन आणि कारकुनाची नोकरी सुटायचीही शक्यता. त्यांची धन्य आहे. माझ्या कोठडीपर्यंत हात पोचण्यासाठी त्यांना मधले किती लोक विकत घ्यावे लागले असतील–रॉयेल ते कोठडी.'

सुक्या खोबऱ्यात भरपूर तेल असतं. आमच्या अन्नात त्याचीच कमतरता होती. ते पूरक अन्नच होतं. एकांतवासात टिकाव लागण्यासाठी त्याचा खूप उपयोग होणार होता. आरोग्यरक्षणाची काळजीच नाहीशी झाली. आता गेले दोन महिने मला न चुकता सिगारेट्स आणि खोबरं मिळत होतं. धूम्रपान करताना दीर्घ झुरका घ्यायचा आणि धूर बाहेर थोडा थोडा सोडून हातानं पसरवून टाकायचा.

काल तर एक विचित्रच प्रकार घडला. छतावरच्या बारीक फटी-तून वॉर्डरनं पेटती सिगारेट खाली टाकली. काहीही विचार न करता मी ती पायाखाली विझवून टाकली. वरच्या वॉर्डरच्या ते लक्षात आलं. त्याला माझी कीव आली होती का? स्वतःच्या नोकरीची त्याला लाज वाटत असेल का? का तो एक सापळा होता. कळायला काहीच मार्ग नव्हता. तो सरळ निघून गेला. मी मात्र स्वतःवर नाराज झालो. वाईट काळ आला की माणूस जास्त हळुवार बनतो. छोटीशी गोष्टही मनाला फार लागते. वॉर्डरला निष्कारण दुखवलं असं मला वाटलं.

दोन महिने होऊन गेले असावेत. माणसाशी संपर्क पूर्णपणे तुटला होता. मी माझ्या स्वप्नांमध्ये केव्हाही दंग होत असे. विनासायास. चालून थकल्यावर थोडी विश्रांती घेताना तर जिवंत दृश्यं समोर उभी राहत. जागा आणि वेळ यावर स्वार होऊन मी आईजवळ जात असे. तिला वर जाऊन सतरा वर्षे लोटली होती. माझे कुरळे केस ती एखाद्या मुलीप्रमाणे वाढवत असे. तेव्हा मी पाच वर्षांचा असेन. मी तिच्या कपड्याशी चाळा करायचा आणि ती माझे केस कुरवाळत बसे. आम्ही खूप हसायचो. झऱ्याजवळून चालताना मी पाण्यात सूर मारल्याचा अभिनय केला की ती म्हणे, 'रिरी, बेटा, मोठेपणी चांगला हो, म्हणजे सगळेच तुझ्यावर प्रेम करतील. तू जेव्हा मोठा होशील ना तेव्हा आणखी उंचावरून तुला नदीत उडी टाकता येईल. सध्या तू लहान आहेस, पण लवकरच मोठा होशील बरं!' मग हातात हात घालून झऱ्याच्या काठानं आम्ही चालत जायचो. मी त्या दृश्यांशी इतका एकरूप झालो की हातानं आईचे डोळे झाकले.

असे अनेक चित्रपट किंबहुना बोलपट सदैव चालत.

मी चंद्रताऱ्यांच्या दुनियेत वावरत असे. जगातली कोणतीही दुष्ट शक्ती मला त्यापासून वंचित करू शकत नसे.

ढोबळमानानं तासात वेळ मोजणं मला जमायचं. पण मिनिटंही मोजता यायला पाहिजेत. त्यात काहीच कठीण नव्हतं. लंबकाच्या गतीमध्ये मी साधारण एका सेकंदात एक पाऊल टाकत असे. म्हणजे सहा पूर्ण फेऱ्या झाल्या की एक मिनिट समाप्त.

भांड्यातून खोबरं आणि सिगारेट्स येईपर्यंत मी बेचैन असे. म्हणजे ते पदार्थ लवकर मिळावेत म्हणून नव्हे तर माझ्यासाठी मधल्या कोणाला त्रास होऊ नये या इच्छेनं. कारण अनेकजण धोका पत्करत असणार. एकदा का ते दृष्टीस पडले की जीव भांड्यात पडे– 'ते सर्व सुटले.' मी मनाशी म्हणायचा.

अत्यंत सावकाशपणे तास, दिवस, आठवडे आणि महिने गेले. जवळजवळ एक वर्ष पूर्ण होत आलं. नक्की सांगायचं तर अकरा महिने आणि वीस दिवस. या काळात मी कोणाशीही बोललो नव्हतो. अपवाद म्हणजे शेजाऱ्याशी कुजबुजत्या शब्दात जास्तीत जास्त चाळीस सेकंद बोलणे. तेही जलद. नाही म्हणायला एकदा मोठ्यानं बोललो होतो खरा. त्या वेळी मला प्रचंड खोकला झाला होता. दिवसरात्र खोकून खोकून बेजार झालो. शेवटी मनाचा हिय्या करून

आजारी असल्याचं जाहीर केलं.

काही वेळानं डॉक्टर हजर झाला. आश्चर्याचा धक्काच तो. दारावरची फट उघडली गेली. त्यातून एक डोकं अवतीर्ण झालं. 'तुझी काय तक्रार आहे ? पाठ कर पाहू ! खोकला ?'

खोटं सांगत नाही. ती तपासणी म्हणजे विनोदच होता. पण अगदी शंभर टक्के सत्य. फटीसमोर डॉक्टर उभा होता आणि तीन फुटांवरून तो मला तपासत होता. त्याला जणू काही छातीचे ठोके ऐकू येत असावेत. 'हात वर कर पाहू.' मी ते वर करायच्या बेतात होतोच; तेवढ्यात माझा स्वाभिमान जागृत झाला. ही काय थट्टा चाललीय् ? मी त्याला म्हणालो, 'राहू दे डॉक्टर. मला काही फारसा त्रास होत नाही.' माझ्यात निदान तेवढं सांगण्याइतकं मनोधैर्य शिल्लक होतं.


तो निर्लज्जच होता. 'जशी तुझी इच्छा,' असं म्हणून तो निघून गेला. ते एका दृष्टीनं ठीकच झालं, कारण संतापाच्या भरात मी भलतंच काही तरी केलं असतं.

एक, दोन, तीन, चार, पाच... न थकता, न थांबता प्रवास चालूच. आज मात्र एखाद्या हिंस्त्र श्वापदासारखा मी चालत होतो. पाय कुरकुरत होते, नेहमी ते चांगली साथ देत. पायाखाली कोणाचातरी चेंदामेंदा करावा असं वाटू लागलं. पण कशाचा करणार ? डॉक्टरच्या भेटीमुळे फारच अस्वस्थता आली. नेहमीच्या लयीत चालता येईना. बेभान झालो.

काही वेळानंतर आपोआप शांत होऊ लागलो. अजून दहा दिवस गेले की शिक्षेचा निम्मा काळ संपला. खरोखर वार्षिक उत्सवच साजरा करायला हवा. कारण सबंध वर्षात खोकल्याखेरीज कुठलंही दुखणं आलं नव्हतं. मी अगदी ठणठणीत होतो. वेड लागलं नव्हतं किंवा त्या मार्गावरही नव्हतो. अजून वर्षानं मी जिवंतपणे आणि सुस्थितीत बाहेर पडणार. नक्की, अगदी निश्चित.

पहारेकऱ्यांच्या कुजबुजीमुळे एकदम जाग आली. मी लक्ष देऊन ऐकू लागलो. माझ्या डावीकडील कैद्यानं आत्महत्या केली होती. स्वतःला वरच्या गजाला टांगून घेऊन. हे त्यांच्या लक्षात येईपर्यंत प्रेताचा ताठ ओंडका बनला होता. इतकं माझ्या लक्षात आलं. त्याला तिथून नेल्यावर दरवाजा बंद केल्याचा आवाज आला. नियमानुसार वरिष्ठ अधिकाऱ्याच्या उपस्थितीत दार उघडलं गेलं होतं. त्याचा आवाज आता परिचयाचा झाला होता. कारण गेल्या दहा आठवड्यांतील ही पाचवी आत्महत्या होती.

वार्षिक महोत्सवाचा दिवस उगवला. आज माझ्या भांड्यात दुधाचा डबा आला. माझ्या मित्रांनी कमालच केली होती. मुळात तो डबा पैदा करणं आणि माझ्यापर्यंत पोचवण्याचा धोका. मी शत्रूविरुद्ध पहिला विजय मिळवला होता. अजूनही परिस्थिती पालटली आणि उद्या सुटलो तर पळून जाण्याएवढी ताकद आणि मनोधैर्य माझ्यात नक्कीच आहे. मग आत्महत्येचा विचार तर सोडाच; याचा मला खूप अभिमान वाटला.

त्या दिवशी नेहमीपेक्षा वेगळं घडलं. दुपारच्या झाडूवाल्यानं मला मित्रांची चिठ्ठी आणून दिली. म्हणजे दाराखालच्या फटीतून सरकवली. 'मजेत राहा. धीर सोडू नकोस. आता फक्त एकच वर्ष बाकी. तुझी तब्बेत उत्तम दिसल्याचं कळलं. अभिनंदन. आम्हीही ठीक आहोत. बाय्. बाय्. देगा, गाल्गानी. जमलं तर त्याच माणसाबरोबर खुशालीची ओळ पाठव.'

या चिठ्ठीसोबत आलेल्या कोऱ्या तुकड्यावर मी लिहिलं, 'सगळ्यांना धन्यवाद. मी धडधाकट आहे आणि पुढचं वर्षही तसाच राहीन अशी आशा वाटते. मला काही बातमी पाठवाल का जोन्स, मॅच्युरेट ?' झाडूवाल्यानं दारावर खूण केली. मी कागद बाहेर सरकवला. तो क्षणार्धात अदृश्य झाला. त्या दिवशी माझ्या पायात वेगळीच शक्ती निर्माण झाली. संपूर्ण दिवस आणि रात्रीचा काही वेळ मी कृतनिश्चयानं येरझारा घालत होतो. एक वर्षानं मला कुठल्या तरी बेटावर पाठवतील. तेव्हा मी खूप बडबडेन, भरपूर धूम्रपान करीन आणि सुटकेच्या अनेक नव्या योजना तयार करीन.

दुसरा दिवस. नव्या तीनशे पासष्ट दिवसांची सुरुवात. आता मला भवितव्याबद्दल चिंता नव्हती, धीर अजीबात खचला नव्हता.

असेच पुढील आठ महिने सुरळीतपणे पार पडले.

एक सकाळ. काही तरी घोटाळा झाला असावा. भांडी रिकामी करून आत खोबरं आणि सिगारेट्स पाठवताना बिचारा झाडूवाला पकडला गेला. अर्थात पुराव्यानिशी. हा प्रसंग इतका गंभीर होता की काही मिनिटं तरी शांततेचा नियम मोडला गेला. त्या दुर्दैवी प्राण्याला झोडपून काढल्याचा आवाज किती तरी वेळ येत होता. त्याच्या किंचाळ्यांमुळे अंगावर शहारे येत होते.

माझ्या दारावरची फट उघडून डोळे गरागरा फिरवत वॉर्डर म्हणाला, 'थोडा वेळ थांब बेटचा, तुझी आता शंभरी भरली.'

'अरे जा लठ्ठचा. माझी त्याला केव्हाच तयारी आहे !' मी सुद्धा ओरडलो. माझा संताप अनावर झाला होता.

हा प्रकार सात वाजता घडला आणि अकरा वाजता साहाय्यक गव्हर्नरच्या उपस्थितीत माझं दार उघडलं. गेल्या वीस महिन्यांनंतर प्रथमच ते उघडलं गेलं होतं. कारण काही का असेना. मी कोठडीच्या आतल्या बाजूला तयारीनिशी उभा होतो. जवळ कोणी आलं की हल्ला करायचा. याला कारणं दोन होती. एक म्हणजे एकदम सगळ्या वॉर्डर्सनी माझ्यावर तुटून पडू नये आणि दुसरं, एकदोन फटक्यांमध्ये त्यांनी मला बेशुद्ध करावं म्हणून; पण त्यातलं काहीच घडलं नाही. 'मुकाट्यानं बाहेर ये.'

'मी मार खाण्यासाठी बाहेर येणार नाही. तसं झालं तर मला प्रतिकार करावा लागेल. सगळ्या बाजूनं माझ्यावर हल्ला व्हावा असं मला वाटत नाही. त्यापेक्षा आहे इथूनच निदान एकाला तरी मी आडवा पाडीन!'

'तुला कोणीही मारणार नाही, शॅरियर.'

'हे कोण म्हणालं ?'

'साहाय्यक गव्हर्नर.'

'तुमच्यावर विश्वास ठेवायचा ?'

'आता जास्त उद्धटपणा करू नकोस. त्यामुळे उलट तुला त्रास होईल.' तुला कोणीही हात लावणार नाही, माझा शब्द. आता मुकाट्यानं बाहेर ये!' मी मग हातात घेऊन निघालो. 'त्याची गरज नाही, ठेवून दे !

'ठीक आहे.' मी बाहेर आलो. सहाजणांच्या पहाऱ्यात व्हरांड्यातून चालू लागलो. उघड्यावर येताच डोकं जोरात भणभणू लागलं आणि मी डोळे गच्च मिटून घेतले. उजेड मला सहन होईना. शेवटी सुरुवातीला ज्या इमारतीमध्ये आम्ही आलो होतो तिथे दाखल झालो. न ढकलता मला ते मुख्य कार्यालयात घेऊन गेले. रक्तानं माखलेला एक माणूस तिथे जमिनीवर कण्हत पडला होता. समोरच्या घड्याळात अकरा वाजले होते. मी मनात म्हणालो, 'म्हणजे याला ते चार तास छळताहेत.' गव्हर्नर डेस्कमागे बसला होता.

'शॅरियर, तुला अशा पद्धतीनं किती दिवस अन्न आणि सिगारेट्स मिळत आहेत ?'

'त्यानं तुम्हाला सांगितलंच असेल की.'

'पण मी तुला विचारतोय् ना ?'

'माझं विस्मरण हल्ली फार वाढलंय. अगदी काल काय झालं तेही मला अजीबात आठवत नाही.'

'तुला गंभीरपणे उत्तरं द्यायची नाहीत का ?'

'म्हणजे माझ्या फाईलमध्ये त्याचा उल्लेख नाही तर. कमालच आहे. डोक्यावर फटका बसल्यामुळे माझं स्मरण नष्ट झालं आहे.'

या उत्तरामुळे गव्हर्नर चकितच झाला आणि म्हणाला, 'रॉयेलला फोन करून विचारा की, याचं म्हणणं खरं आहे का! तुझं नाव शॅरियर आहे, एवढं तरी तुला ठाऊक आहे ?'

'हो तर,' आणि त्याला आणखी गोंधळात टाकण्यासाठी मी जलद यांत्रिकपणे म्हणालो, 'माझं नाव शॅरियर. १९०६ साली जन्म. जन्मगाव आर्डिक. पॅरिसला पकडलं. जन्मठेपेची शिक्षा झाली. सीन तुरुंग.' त्यानं डोळे विस्फारले. मी त्याला चांगलंच हादरवलं होतं.

तोपर्यंत फोन लावण्याचं काम सुरू झालं होतं.

'तुला आज सकाळी ब्रेड आणि कॉफी मिळाली ?'


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : **छत्तीस रुपये**
सहामाही : **वीस रुपये**
परदेश : (जलमार्गे)
**पंचावन रुपये**

'होय.'

'काल रात्री कुठली भाजी खाल्लीस?'

'आठवत नाही.'

'म्हणजे तुझ्या म्हणण्यानुसार तुला अजीबात स्मरण नाही तर?'

'नाही. घडलेल्या गोष्टी तरी आठवत नाहीत. चेहरे म्हणाल तर आठवतात. उदाहरणार्थ तुम्हीच मला इथे ताब्यात घेतलंत हे स्मरतं. पण केव्हा विचाराल तर नाही सांगता येणार.'

'मग तुझी शिक्षा अजून किती शिल्लक आहे, हे तुला ठाऊक नसेलच.'

'जन्मठेपेपैकी? का? मला वाटतं मरेपर्यंत.'

'ती नाही. एकांतवासापैकी.'

'त्यांनी मला एकांतवास दिला? का म्हणून?'

'आता पुरे झालं. ढोंगालाही काही मर्यादा असते. ईश्वर साक्ष आहे. मला उगीच भडकायला लावू नकोस. सुटकेच्या प्रयत्नाबद्दल तुला दोन वर्षं एकांतवास मिळाला आहे, हे मी सांगण्याची जरूरी नाही. का तेही सांगायला पाहिजे?'

मी त्याला अखेरचा टोला लगावला. 'काय? सुटका? गव्हर्नर, मी अगदी साधासुधा माणूस आहे आणि मी ते सिद्ध करू शकेन. माझ्याबरोबर चला आणि कोठडीत पाहा. म्हणजे तुम्हाला कळेल की, मी तिथेच आहे का पळून गेलोय.'

याचवेळी एक वॉर्डर म्हणाला, 'रॉयेलला फोन लागला, सर.'

त्यानं फोन घेतला. 'नाही? कमाल आहे. तो म्हणतो, त्याचं स्मरण नाहीसं झालय्. त्याला फटका बसला होता?.. ठीक, समजलं. मी ते शोधून काढतो...तुम्हाला निष्कारण त्रास दिला, गव्हर्नर. गुडबाय्. तर ठीक आहे. चार्ली चॅप्लिन, तुझं डोकं पाहू. खरंच, जखमेची मोठी खूण आहे. पण काय रे, त्यांनी तुला फटका मारल्यापासूनच तुझी स्मरणशक्ती नाहीशी झाली, हे तरी तुला कसं आठवतं? आँ? याचं उत्तर दे ना?'

'ते मला सांगता येणार नाही. मला फक्त एवढंच आठवत की, मला फटका बसला, माझं नाव शॅरियर आणि काही इतर गोष्टी.'

'म्हणजे तुला शेवटी सांगायचं तरी काय आहे?'

'तोच तर प्रश्न आहे. तुम्ही मला विचारलंत की, अन्न आणि सिगारेट्स किती दिवस मिळताहेत. आणि माझं म्हणणं आहे की, ही पहिलीच वेळ का हजारावी ते सांगता येणार नाही. आठवतच नाही त्याला मी काय करणार? बस्स् इतकंच. तुम्हाला जे काय करायचं असेल ते करा.'

'तसं काही विशेष करणार नाही. तू खूप दिवस भरपूर खाल्लंस. आता शिक्षा संपेपर्यंत चार महिने तुझं रात्रीचं जेवण बंद. त्यामुळे थोडं वजन उतरेल एवढंच.'

त्या दिवशी दुपारी मला पुन्हा एक चिठ्ठी मिळाली. 'झाडूवाल्यानं तोंड बंद ठेवलं. त्यानं सांगितलं आहे की, फक्त दुसऱ्यांदा तुला अन्न दिलं. त्याचं त्याला वाटलं म्हणूनच दिलं. कारण तू फ्रान्सचा आहेस, हे त्याला ठाऊक होतं. रॉयेलवरच्या कोणालाही त्रास होणार नाही. धीर सोडू नकोस.'

अशा रीतीनं माझं अन्न आणि सिगारेट्स बंद झाल्या. मित्रांकडून निरोप येण्याची आशाही मिटली. त्यात भर म्हणून माझं रात्रीचं जेवणही तोडलं गेलं. आता आपल्याला भूकच लागत नाही, अशी धारणा निर्माण करायला पाहिजे. धूम्रपानाचा आस्वादही यापुढे घेता येणार नाही.

मी फक्त माझाच विचार करीत नव्हतो. माझ्यामुळे ज्याला खूप मार खावा लागला, त्याचीही काळजी वाटत होती. 'बिचाऱ्याला फार कडक शिक्षा होऊ नये' अशी मी प्रार्थना केली.

[क्रमशः]

---

दोन वर्षांचा एकांतवास भोगून बाहेर पडताना शारीरिक त्राण नष्ट झालं असलं तरी माझं मनोधैर्य टिकून होतं. जोन्स आणि मॅच्युरेटची अवस्था काय झाली असेल? जोन्स दुरून दिसला. त्यानं मला हात केला.

'मित्रा, ठीक आहेस ना?' मी विचारलं.

त्याचे डोळे चमकत होते.

'पॅपिलॉन, माझे दिवस संपले आहेत.'

'काही तरीच बोलू नकोस. तुला मरायला काय झालं?'

'मी खरंच सांगतोय्.'

माझ्या पोटात कालवाकालव झाली. जोन्सला स्ट्रेचरवरून सरळ रुग्णालयात नेण्यात आलं.

## 'रॉयेल' बेटावर पदार्पण

पुढील अंकी

---

पुस्तके

## तरुणांना आवाहन

कुश

शहादा भागात आदिवासी समाजात अतिशय जिद्दीने काही तरुण कार्यकर्ते कार्य करीत आहेत. त्यांपैकी श्री. कुमार शिराळकर यांनी तरुणांना उद्देशून, 'ऊठ वेडया, तोड वेडया !' हे पुस्तक लिहिले आहे. भारतातील विद्यार्थी आज भांबावलेल्या अवस्थेत आहे. निकृष्ट शिक्षण व त्यानंतरची बेकारी,समाजातील दारिद्रय व भ्रष्टाचार या सर्वांवर तोडगा सापडणार का ? हा प्रश्न त्याला सतत पडतो. या प्रश्नावर उदासीनता, इतिहासाची नशा, किंवा वैयक्तिक पलायनवाद ही उत्तरे नाहीत. हे प्रश्न तरुणांनीच पुढे होऊन सोडविले पाहिजेत. त्यासाठी समाजरचनेचा अभ्यास केला पाहिजे, व गरिबांत मिसळून त्यांचे प्रश्न सोडविण्याची तसेच त्यांना अन्यायाविरुद्ध संघटित करण्याची जिद्द धरली पाहिजे, असे लेखकाने सांगितले आहे.

राजकारणी लोकांच्या भ्रष्टाचारामुळे तरुण राजकारणाकडे पाठ फिरवीत आहे. हा भ्रष्टाचार नष्ट करण्याचा तोडगा नाही. राजकारणात सक्रिय भाग घेऊनच हा भ्रष्टाचार थांबविता येईल,हे लेखकाचे म्हणणे संपूर्ण सत्य आहे. समाजातील घटनांचा अभ्यास करून जग बदलायला सिद्ध होणे म्हणजे राजकारण. ते टाळणारे, समाज आहे तसाच राहण्यास मदत करतात. तरुणांच्या राजकारणाविषयीच्या उदासीनतेमुळे ढोंगी पुढाऱ्यांचे फावते. तरुणांनी ही उदासीनता टाकून दिली पाहिजे.

भारतीय जनता जातिव्यवस्थेने दुभंगली आहे. बहुसंख्य लोक गरिबीमुळे जवळजवळ जनावरांचे जिणे जगतात. ही परिस्थिती या गरिबांना संघटित करूनच बदलता येईल, असे आवाहन शिराळकरांसारखा समाजातील अतिशय दलित समाजात कार्य करणारा तरुण करतो. त्यावेळी त्याच्या लिखाणाला एक वेगळीच धार चढते. त्यामुळे हे सर्वच पुस्तक अतिशय वाचनीय झाले आहे.

लेखकाने समाजरचनेची मूलभूत तत्त्वे थोडक्यात व अतिशय सोप्या शब्दात स्पष्ट केली आहेत. समाजापासून व्यक्तीचा अलगपणे विचार करण्याची मध्यमवर्गीय सवय सोडून तरुणांनी सर्व समाजरचना बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे झाल्यासच समाजातील भयाण दारिद्रय दूर होईल. तरुणांना काळाचे हे आवाहन आहे आणि त्यांनी ते स्वीकारले पाहिजे, असे लेखकाने आग्रहाने मांडले आहे.

या पुस्तिकेचे वाचन तरुण मोठ्या प्रमाणावर करतील अशी आशा आहे. ◻

**'ऊठ वेडया, तोड वेडया'**
कुमार शिराळकर,
'मागोवा' प्रकाशन, पुणे ४.

## डुचुबकेक : पृष्ठ १८ वरून

राष्ट्रांशी सहकार्य आम्हाला हवे आहे आणि तोच चेकोस्लोव्हाकियाच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य आधार राहील.

'पक्षनेतृत्वाच्या मतापेक्षा निराळे मत व्यक्त केले म्हणून बऱ्याच लोकांना औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्रातून सक्तीने बडतर्फ करण्याने फार मोठी हानी होत आहे. क्रियाशील बुद्धिमंतांना त्याची सर्वांत जास्त झळ लागली आहे. सृजनशीलांचे हात बांधले गेले आहेत. सार्वजनिक कामे आणि सरकारी कारभारात कामगारांचा सहभाग सध्या अस्तित्वात असलाच तर तो अगदी कमीत कमी आहे.

'माझ्या दृष्टीने सध्याच्या धोरणाचा सर्वांत गंभीर परिणाम म्हणजे पक्षाच्या धोरणाची निर्भयपणे आणि मोकळेपणाने चर्चा करून निर्णय घेण्याची संधी लोकांना नाकारली गेली आहे. सामाजिक मूल्ये यशस्वीपणे नष्ट करण्याच्या अर्थाने सध्याचे पक्ष धोरण यशस्वी झाले आहे. पण ज्या संघर्षातून पक्षात व समाजात पेचप्रसंग निर्माण झाला होता, त्यापैकी एकही संघर्ष मिटलेला नाही.

'एका व्यक्तीच्या हाती सत्ता केंद्रित करण्याची पद्धती मार्क्सवाद-लेनिनवादाशी सुसंगत नाही. अशा प्रकारे कारभार करण्याची कल्पना वैचारिक दृष्टया नष्ट करणे महत्त्वाचे आहे.

'समाजवादास घातक असलेल्या या पद्धतीचे स्वरूप उघड केले नाही तर मतभेद असताही सत्तारूढ नेत्यांच्या मतापुढे मान तुकविण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये, विशेषतः तरुण पिढीत बळावेल. स्वार्थासाठी अन्याय सहन करण्याकडे कल होईल. समाजवादातही मानवी हक्क आणि त्यांचा बचाव पूर्णपण समर्थनीय आहे. पक्षाने व त्याच्या नेतृत्वाने हे हक्क उचलून धरले पाहिजेत.

'आपल्या देशातील सबंध जीवन जाळ्यांनी विणले गेले आहे. हा सत्तेचा दुरुपयोग आहे. समाजवादी तत्त्वांचे व पक्षतत्त्वांचे उल्लंघन आहे. मानवी हक्कांचे हे उल्लंघन आहे.'

कम्युनिस्ट चळवळीस लोकशाही वळण मिळायला हवे असेल तर डुचुबकेक यांची ही भूमिका आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीच्या नेत्यांना मान्य करावीच लागेल. पण हा बदल होण्याची शक्यता आज तरी दिसत नाही. पण निराश न होता आपल्या भूमिकेसाठी लढा चालू ठेवण्याची डुबुकेक यांची भूमिका आहे. ◻

मध्यंतर

वसंत कानेटकरांचे नवे नाटक :

# नलदमयंती

पुष्पा भावे

'कलावैभव' या संस्थेच्या वतीने विजया मेहता यांनी दिग्दर्शित केलेले वसंत कानेटकर यांचे नवे नाटक 'नलदमयंती' या महिन्याच्या प्रारंभी रंगमंचावर आले. [ या नाटकाचे लेखन मात्र काही वर्षांपूर्वी झालेले असावे, कारण 'औषध नलगे मजला' या शीर्षकाने कानेटकरांच्या नाटकाची जाहिरात अनेक दिवस येत होती. ]

नलदमयंतीची कथा ही भारतीय माणसाला सुपरिचित अशी आहे. या पुराणकथेकडे कानेटकरांसारखा आजचा नाटककार वळतो त्यावेळी त्याच्या मनात काही अन्य हेतू असावा, अशी साहजिक अपेक्षा असते. विशेषत: नलदमयंतीच्या कथेतील देव आणि मानव यातील संघर्ष, कली मानवी शरीरात शिरण्याची कल्पना यातून गहन नाटक निर्माण होण्याची शक्यता होती. अथवा सरळ साधे संगीत पौराणिक नाटक वा opera त्यातून निर्माण होऊ शकला असता. मध्यंतरी कानेटकरांच्या जाहीर वक्तव्यात राजहंस-नारद यांना एकरूप मानण्याची कल्पना व्यक्त झाली. त्यामुळे 'नलदमयंती'च्या प्रयोगाला काही निश्चित अपेक्षा न बाळगता प्रेक्षक आले होते.

'नलदमयंती'चा पहिला प्रवेश हा काहीसा फार्सिकल सुरात सुरू झाला. किंबहुना तो प्रवेश पाहत असताना मला थेट रत्नाकर मतकरींच्या 'इंद्राचे आसन-नारदाची शेंडी' या बालनाटयाचे स्मरण झाले. नारदाने राजहंसाचे रूप घेणे—राजहंसाने माणसासारखे घोरणे या तपशीलाने नाटककार व दिग्दर्शिका या दोघांनीही नलदमयंतीच्या कथेशी सहचरित असणारे काव्यात्म वातावरण हेतुत: पुसून टाकले. पुढील सर्व नाटकाचा रोख मानवी यत्नाने हास्यास्पद ठरणारे लोकपाल हा होता—या देवांची तुम्ही पूजा करता याच सुरावर नाटक संपते. परंतु या स्वरूपाचा आशय तमाशा पद्धतीत नेमका व्यक्त होऊ शकला असता. त्यासाठी इतक्या दिमाखाने उभे केलेले नाटक कशासाठी खर्ची घातले कोण जाणे. तमाशाशैलीच्या गृहित कृत्यानेच आपण कृष्णाची वा राजाची चेष्टा मान्य करतो. नाटक स्वरूपात एखादी कृती उभी राहिली की संघर्षाचे स्वरूप एका बाजूला जड असून चालत नाही. प्रस्तुत कानेटकरी नाटकात नेमकी हीच गल्लत झालेली आहे. एकदा पहिल्याच प्रवेशात देव चेष्टनीय केल्यानंतर पुढे दमयंतीचे चातुर्य वा नलाचे नैतिक बळ परिणामकारकरीत्या मांडणे अशक्य होते. मग नाटक हा आकार अप्रस्तुत वाटू लागतो. धर्माज्ञापालन केल्यामुळे प्राप्त होणारे दु:ख या संघर्षाला नाटककाराने ओझरता स्पर्श केला आहे. वस्तुत: ते सूत्र घेऊन देवांविरुद्ध उभा राहिलेल्या दोन मानवी जीवांचे भीषण नाटय निर्माण होऊ शकले असते. वा आजच्या व्यवहारातील धर्माज्ञा व श्रेय यातील संघर्ष तमाशात काळाला प्रस्तुत अशा स्वरूपात व्यक्त होऊ शकला असता. तर असो.

आहे या स्वरूपात विजया मेहता यांनी त्यांच्या नेहमीच्या कौशल्याने हे नाटक बसविले आहे. किंबहुना फिरत्या रंगमंचाचे अवडंबर वापरणाऱ्या निर्मात्यांनी व दिग्दर्शकांनी हा नाटयप्रयोग वस्तुपाठ म्हणून पाहायला हरकत नाही. नाटकाचे नेपथ्य हे बाबूराव सडवेलकरांसारख्या चित्रकाराच्या हातचे असल्यामुळे त्याला नेमक्या रेषांचे सौंदर्य प्राप्त झाले आहे. यक्षकिन्नरांना प्रवेशबदलासाठी वापरले आहे. अर्थात नाटकाचे प्रवेश इतके नियमितपणे दरबार—स्वर्ग यात फिरत असतात की पुढे पुढे ते कंटाळवाणे होते. खूप मोठे समुदाय नेमक्या विरचनांमध्ये आयोजित करण्याचे विजयाबाईंचे कौशल्य आपल्याला इतके परिचित आहे की त्याविषयी वेगळे काय लिहायचे ? चंदू उगवेकर यांनी नारदाची भूमिका अत्यंत स्वाभाविकतेने केली. आशा काळे यांच्या अभिनयाचा नेहमीचा तीव्र नाटकी सूर विजयाबाईंच्या दिग्दर्शनाखाली सौम्य झाला आहे. नलाच्या भूमिकेत अभय पटवर्धन या नव्या नटाचे व्यावसायिक रंगमंचावर पदार्पण झाले आहे. या नाटकात अभिनयगुणांना फारसा वावच नसल्यामुळे पटवर्धन नल म्हणून कार्यक्षम नट वाटले, यापलीकडे काही विधान करणे अवघड आहे. इंद्राणीची भूमिका करणाऱ्या संजीवनी बिडकर यांना आदळआपट करण्याविना काही कामच नाही. इंद्राची भूमिका रमेश पवार यांनी केली आहे. 'हंगर स्ट्राइक' मधील त्यांच्या भूमिकेपासून मला असे वाटत आले आहे की, या नटाच्या अभिनयाची जातकुळी तमाशा वा फार्सला जवळची आहे. इंद्राची भूमिका पाहात असताना हा समज पक्का झाला. या नाटकातील इंद्र हा चेष्टेचा विषय असल्यामुळे विडंबित अभिनयशैली येथे उपकारक ठरली.

या नाटयप्रयोगात निराशा केली भास्कर चंदावरकरांच्या संगीताने ! 'घाशीराम कोतवाल'चे संगीतदिग्दर्शक म्हणून आपण चंदावरकरांना ओळखतो; पण या नाटयप्रयोगातील संगीताला स्वत:चा स्वभाव नाही. किंबहुना जागोजाग जुन्या मराठी चित्रपटांच्या पार्श्वसंगीताचे स्मरण करून देणारे संगीतही इथे आहे. पौराणिक नाटकातील वेशभूषा कुरूप न दिसता सादर करणे जरा अवघडच असते. विजया सडवेलकरांनी निर्माण केलेल्या वेशभूषा नवीन नसल्या तरी रंगसंगतीमुळे प्रसन्न वाटणाऱ्या आहेत.

'नलदमयंती'चा प्रयोग पाहताना मूळ शंका मनात येते ती अशी की हे सारे दिशाहीन—निरर्थक प्रयत्न कशासाठी ? विजयाबाईंच्या कुवतीची दिग्दर्शिका केवळ सुबक प्रयोग करण्यासाठी स्वत:ला खर्ची का घालते? व्यावसायिकदृष्टयाही 'नलदमयंती' यशस्वी ठरेल असे दिसत नाही. मग एवढा प्रचंड खर्च, एवढी मानवी ऊर्जा एखाद्या आकांक्षी नाटयप्रयोगासाठी कारणी तरी लागली असती असे वाटते. 'माता द्रौपदी'च्या अपयशालाही जो अर्थ होता तो 'नलदमयंती'च्या यशालाही ( समजा ठरले तर ) प्राप्त होणे शक्य नाही.

□



नजर । ह. शि. खरात

# दी पार्टी

## पीटर सेलरची धमाल

पाश्चात्य चित्रसृष्टीतील विनोदी नटात पीटर सेलर हा एक अवलिया आहे. पीटर सेलरचा विनोद वा विनोदी अभिनय हा उच्च दर्जाचा असतो, ह्यात वाद नाही. परंतु पीटर सेलरचं वैशिष्टय असं की, कोणतीही भूमिका तो अशा काही जाणकारीने करतो की प्रत्येक भूमिकेत आपल्याला एक वेगळाच पीटर सेलर आढळतो. पीटर सेलरचं मोठेपण आहे ते ह्या वेगळेपणात. हा वेगळेपणा पीटरच्या सध्या गाजत असलेल्या 'दी पार्टी ह्या चित्रपटात दिसल्यावाचून रहात नाही. अमेरिकन चित्रपटांतून एक्स्ट्रॉ म्हणून हलकी-फुलकी कामे करणाऱ्या एका भारतीय सामान्य नटावर चुकून एका पार्टीमध्ये भाग घेण्याचा प्रसंग येतो. आता पार्टीत भाग घ्यायचा म्हणजे अमेरिकन 'एटिकेटस्' आणि 'मॅनर्स' हे पाळले पाहिजेत, ह्या भावड्या समजूतीखाली दबलेला आणि थोडासा बावळट असणारा हा 'बाकर्सी' (वक्षी) पार्टीमध्ये जो अभूतपूर्व गोंधळ घालतो त्याचं धमाल चित्रण आपल्याला दी पार्टीमध्ये आढळते. पीटर सेलर ह्या अवलिया नटाने ह्या भारतीय तरुणाची भूमिका ज्या अफलातून पद्धतीने केली आहे त्याबद्दल पीटरला आपण मानले पाहिजे. भारतीय तरुणाचे बोलणे, चालणे, त्याचे चेहऱ्यावरील दीनवाणे भाव, त्याचे इंग्लिश उच्चार आणि इंग्लिश बोलताना त्याची होणारी तारांबळ इतकी वास्तवपूर्ण व्यक्त झाली आहे की, इतर चित्रपटांतून काम करणारा हा पीटर सेलर नसून हा अस्सल भारतीय एक्स्ट्रॉ नट वाटतो. आपल्या भूमिकेशी इतके तादात्म्य पावून पीटर सेलरने पार्टीमध्ये अशी धमाल केली आहे की ऐशी मौज न मिळणे पाहण्या पुन्हा नरा !

तर बक्षी हा अमेरिकन चित्रपटांतून हलकी-फुलकी कामे करीत असतो. एका युद्धचित्रपटाचं शूटिंग चालू असते. आमच्या बक्षीला शत्रू सैन्याची चाहूल लागताच ब्युगुल वाजवायचे काम. हा उंच डोंगरावर जाऊन शत्रू दिसताच ब्युगुल सुरू करतो. परंतु थांबायचे कोठे माहीत नाही. निम्मी लढाई संपत आली तरी ह्याचे आपले ब्युगुल फुंकणे चालूच, त्यामुळे शत्रूसैन्यच काय पण त्याचंच सैन्य त्याच्यावर उलटते आणि बंद कर तो ब्युगुल म्हणून त्याच्यावर चिडून गोळ्या झाडते. परंतु गोळ्या लागल्या तरी अचके देत तो ब्युगुल काही थांबवत नाही. शेवटी मशिनगनचा मारा करावा लागतो. तरी विझताना ज्योत मोठी होऊन विझते तसा मोठ्या आचक्यांबरोबर ब्युगुलही मोठा वाजवून स्वारी जुलुमाने खाली कोसळते. परंतु खऱ्या अर्थाने डायरेक्टरच इकडे कोसळलेला असतो. अशाच एका जुन्या ऐतिहासिक चित्रात तो मॉडर्न घड्याळ घालून शूटिंग बिघडवतो तर बूटाची लेस बांधण्याचे निमित्त म्हणून सुरुंगाच्या चापावर पाय देऊन शूटिंगच्या आधीच संपूर्ण किल्ला स्फोटात उडवून लावतो. केवळ सुरुवातीचे हे काही प्रसंग. परंतु हास्यस्फोटाला खरी सुरुवात इथूनच होते. आणि पुढे हा माणूस काय धमाल करणार आहे त्याची चुणूक कळते.


इकडे डायरेक्टर बक्षीला खाऊ की गिळू करतो. वैतागून निर्मात्याला झाला प्रकार कळवतो. ह्याच वेळी निर्माता पार्टीसाठी 'लिस्ट' तयार करीत असतो. फोनवरून बक्षीचं नाव कळताच रागाच्या भरात चुकून ते नाव पार्टीच्या यादीत पडते आणि आमचे धमाल वीर बक्षी पार्टीत सामील होतात. बंगल्यात शिरतानाच त्यांचा पाय चिखलात पडून बूट चिखलात भरतो. स्वागत करणारी बाई जरा चमकतेच. बंगल्यात पाटासारखं पाणी. एक तलावही असतो. स्वारी त्या पाटात बूट धण्यासाठी जाते तो बूटच चक्क सटकून प्रवाहाबरोबर वाहून जातो. तो बूट मिळविण्यासाठी नाना तऱ्हा करतो. शेवटी झाडाच्या फांदीने बूट उचलताना तो बूट जो फेकला जातो तो नेमका वेटरच्या ट्रेमध्ये. वेटरही खाली न बघता ट्रे फिरवतो. प्रत्येकजण न बघताच ट्रेमधले पदार्थ नाकारतो. आणि परब्रह्म भेटावं त्याप्रमाणे बक्षीला तो बूट परत भेटतो. बक्षी उगीचच पाहुण्यात मिसळण्याचा केविलवाणा प्रयत्न आपल्या केविलवाण्या इंग्रजी भाषेत करीत असतो. यजमानाने पाळलेल्या पाखराशीही तो तसाच वागतो. काऊबॉय चित्रपटातील हिरोला पाहून त्याला अभिमान वाटतो आणि अशा ग्रेट हिरोने 'शेकहँड' केलं म्हणून हात दुखावला तरी आपलं परमभाग्य मानतो. मध्येच वीज-बटन दाबून गोंधळ उडवतो. आणि तो उडवल्याबद्दल यजमानीण आणि यजमान ह्यांच्यापुढे नको त्या वेळी 'अपोलाजाई' असं करील की त्यामुळे वैताग यावा. प्रत्येक वेळी दारू नाकारून ती 'वेटरला' 'चढ'वीत असतो. जेवणाच्या वेळी कोंबडी खाताना काट्या-चमच्याने ती अशी दाबतो की ती कोंबडी सटकन समोरच्या बाईच्या डोक्यावर मुगुटाप्रमाणे बसते. जाम प्यालेल्या वेटरला तो ती आणायला सांगतो. वेटर ती त्या बाईच्या टोपासकट उचलून आणतो.बाईसुद्धा काहीच झालं नाही अस केवळ 'मॅनर्स'साठी दाखविते. अशा धांदलीत जेवण झाल्यावर बिचाऱ्याला लघवीस लागते. एकास जागा विचारतो ती नेमकी लेडिज् टॉयलेटरूम निघते. अशा वेळी तिथे आलेल्या बाईला चक्क तो 'इट इज एंगेज्ड' म्हणून सांगतो. खरा प्रकार कळून मग सटकतो. बटलरला विचारतो. परन्तु जागा सापडत नाहीं. गार्डनमध्ये बघतो. परन्तु जातानाच पाण्याची कळ दाबली जाऊन पुरा भिजतो. अशा स्थितीत पार्टीत भेटलेल्या एका फुलासारख्या छान पोरीचं सुंदर गाणं चाललेलं असतं तेथे येतो. लघवी अनावर होऊन तो असे काही अंगविक्षेप करतो की इतरांना वाटते की, गाण्याच्या परिणामामुळे तो असा करतोय. शेवटी स्वारी वरच्या मजल्यावर जाते. तेथे मनसोक्त करून घेतो. परन्तु बाथरूमचा असा गोंधळ करतो की, पाण्याची टाकी फुटून पाणी घरभर होते. तिथून सटकताना स्वारी चक्क छपरावरून तलावात कोसळते. तो बुडताना पाहून घाबरलेली ती छान छोकरी त्याला वाचवायला उडी ठोकते. दोघेही जाम भिजतात. सर्दी होऊ नये

म्हणून ह्याला बळेवळे पेग पाजतात. त्यामुळ बक्षीचं अक्षरशः माकड होतं. चुकून तो ह्या भिजलेल्या छान पोरीच्या खोलीत येतो. ती बिचारी रडत असते. तिला तो आपलं भारतीय तत्त्वज्ञान सांगतो आणि बराच जवळ जातो. एवढ्यात त्या पोरीसाठी धडपडणारा इसम येतो. त्याचा गैरसमज होऊन तो चिडून जातो. मग ही छान पोरगी आणि बक्षी खूप नाचतात. तिलाही आनंदच वाटतो. तेवढ्यात यजमानाची लेक पार्टीत एक छोटंसं हत्तीचं पिल्लू घेऊन येते. आणि गोंधळात भरच पडते. हत्तीला साबणाने धुताना एवढा फेस होतो की, सारेच जण त्यात बुडतात. यजामानीण तर दरवेळी किंचाळून तलावात पडते. अशी धमाल चालू असतानाच वैतागलेला दिग्दर्शक हाच तो बक्षी म्हणून निर्मात्याला सांगतो आणि आतापर्यंत संयम पाळलेल्या यजमानाचा क्रोध उफाळून वर येतो आणि तो त्याचा गळा दाबायला निघतो. परन्तु बक्षी तेथून सटकतो व आपल्या मोटारीत तो त्या छान पोरीला घेऊन घरी परततो. मध्येच ती छान पोरगी त्याचा निरोप घेते. तेव्हा पुन्हा कानावर पडते तिनं गायलेलं गाणं– ' नथिंग टू लूज इफ् इट इज फन् '–आणि खरोखरच हा सगळा प्रकार इतका फनिएस्ट असतो की ' वुई गेन समथिंग '–आणि तो म्हणजे निर्भेळ करमणुकीचा आनंद.

मात्र पीटर सेलरच्या ह्या धमालीचा अर्धा वाटा दिग्दर्शक ह्याच्याकडे जातो. त्याने एकेक हास्यस्फोटक प्रसंग चढत्या क्रमाने आणि वेगाने असे काही घेतलेत की, सबंध चित्रपट फार्सचा उत्कृष्ट नमुना झाला आहे. पीटर सेलरबरोबर दारू पिणाऱ्या वेटरनेही चांगले काम केले आहे. त्याचा ' चढत्या 'चा अभिनय खरोखरच बघण्यासारखा आहे. त्याने वरचेवर पेग रिचवणे, धुंदीत वाढताना गोंधळ करणे–मध्येच कोंबडी प्रकरण, त्यामुळे हेडवेटरने त्याचा दरवेळी गळा दाबणे–तसेच धुंदीत वेटरने एका पाहुणीचे चुंबन घेणे–हा सारा प्रकार केवळ मॅनर्स म्हणून साऱ्यांनी न घडल्यासारखाच घणे, ह्या गोष्टीमुळे ह्या चित्रपट–फार्सला आगळीच धमाल आली आहे. पीटरचे भारतीय पद्धतीचे इंग्रजी बोलणे, चेहऱ्यावरील लाचार बावळटपणा व बावळट हसण्याचा प्रकार, प्रत्येक वेळी ' गुड्गुड् ' म्हणणे, तसेच, एकाने वैतागून ' व्हॉट यू थिंक ऑफ युवर सेल्फ ' म्हटल्यावर ताबडतोब ' वुई इंडियन डोन्ट थिंक, वुई नो व्हॉट वुई आर ' हे दिलेलं मार्मिक उत्तर भारतीय बावळट तरुणाचे उत्कृष्ट चित्र उभे करते. पीटरशिवाय ही भूमिका दुसऱ्या एखाद्या पाश्चात्य नटाला जमली नसती. ह्या चित्रपटातील त्या छान पोरीनं म्हटलेलं ' नथिंग टू लूज इफ् इट इज फन् ' हे गाणं अतिशय गोड असून. शेवटी गाण्याचा सुंदर उपयोग करून घेतल्याने ह्या फार्सवजा चित्रपटाला एकप्रकारे अर्थपूर्णता आली आहे. त्यामुळे चित्रपटाचा शेवट थोडासा हुरहुर लावणारा वाटतो. तसेच बक्षीच्या घरात बक्षीचे सतार–वादन आणि यजमानाच्या बंगल्यात पाय ठेवल्याबरोबर पाश्चात्य सुरावटीचा वापर संगीत-दिग्दर्शकाने मोठ्या सूचकतेने केला आहे.

शेवटी महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी हा चित्रपट आला होता, परन्तु राजकीय पक्षाच्या मोर्चामुळे आठवड्याच्या आत त्याला स्टर्लिंगमधून पळ काढावा लागला. कारण त्यात म्हणे भारतीयांचा अपमान केलेला होता. परन्तु ' दी पार्टी ' बंद पाडण्याचं खरं कारण राजकीय ' पार्टी ' हे होते. कारण हा चित्रपट ज्या ठिकाणी लागला होता ते थिएटर टाटाच्या मालकीचं आहे. आणि त्या वेळी टाटा निवडणुकीस उभे राहिले होते. सुज्ञांना आणखी स्पष्टीकरण न लगे ! □


सॅपोटेक्स
१००% विशुद्ध
सोप
पावडर




आतां ३ नवीन
सुबक आकारांत
उपलब्ध
२½ कि.ग्रॅ. १ कि.ग्रॅ. ½ कि.ग्रॅ.

आपल्या कपड्यांची धुलाई अत्यंत स्वच्छ आणि सफेद होण्यासाठी
सॅपोटेक्स वापरा. त्यात सफेदीसाठी ऑप्टिकल व्हाइटनर मिसळलेले असते.
सॅपोटेक्सने धुलाई केल्याने नाजूक कपडे सुद्धा सुरक्षित राहतात.

**सॅपोटेक्स-भारतातील सर्वांत अधिक खपाची सोप पावडर**

स्वस्तिक हाऊसहोल्ड अँण्ड इंडस्ट्रिअल प्रॉडक्ट्स लि.

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ३–५–७५ ते ९–५–७५

**मेष : नव्या नव्या समस्या**

बाराव्या गुरूबरोबर आता मंगळ देखील बारावा झाला आहे. मंगळासारखा तामसी वृत्तीचा ग्रह ज्यावेळी व्ययस्थानी येतो त्यावेळी डोके विचाराने उठून जाते. स्वभाव अतिशय तापट बनतो. पण हे करून उपयोग नसतो. कारण त्यामुळे नुकसानीखेरीज प्रत्यक्षात पदरात काहीच पडत नाही. डोके शांत ठेवणे व निरनिराळ्या प्रश्नाबद्दलची समस्या भोगत राहणे याखेरीज काही उपयोग नाही. या आठवड्यात जरा सावधगिरीने वागा. प्रामुख्याने सोमवार, मंगळवार व गुरुवार विशेष काळजी घ्या. नोकरीत स्वतःच्या कामाबद्दल दक्ष राहावे लागेल. अगदी विश्वासू मित्राकडे देखील वरिष्ठाबद्दल चुकून देखील कटू शब्द बोलू नका. नव्या नोकरीच्या बाबतीत आशादायक वातावरण राहील. पण प्रत्यक्ष फायदा मात्र लांबणीवर पडेल. महिलांनी भांडणाची भूमिका सोडून मिळते-जुळते घेण्याची भूमिका ठेवावी, फायद्याचे होईल. शुभांक १२–२–४.

**वृषभ : संपत्तीत भर पडेल**

मंगळ व गुरू या दोन ग्रहांनी आता तुमची सांपत्तिक बाजू सुधारायचे ठरवले आहे. गुरू हा तसा पैसा मिळवून देणारा ग्रह नाही. पण मंगळाला त्याने साथ द्यायचे ठरवले असल्यामुळे या वेळी जे मनात आणाल ते होईल. उद्ध्वस्त आणि आशेवर विरजण पडत असलेली अनेक दुःखे यावेळी इतिहासजमा होतील. नव्या युगाचा नवा अध्याय लिहिला जाईल. लॉटरीत मिळणारा पैसा काहीच नाही. रेसमध्ये तुम्हाला भरपूर पैसा मिळेल. जन्माची ददात मिटेल. अर्थात स्वतःच्या जन्मकुंडलीत तसेच उच्चीचे ग्रह असायला हवेत. ते नसले तरी देखील तुमच्या परिस्थितीत अनुकूल बदल होईल. व्यापाऱ्यांच्या पडून राहिलेल्या मालाला एकदम मागणी येईल. शेअरचे भाव तराहून नफा होईल. मध्यम वर्गाच्या पाठीमागे लागलेली भणभण कमी होईल. रविवार ते बुधवार आरोग्य सुधारेल. मनाला प्रसन्नतेचा वारा लागेल. महिलांना माहेरची प्रॉपर्टी अगर स्थावर इस्टेट मिळू शकेल. शुभांक ३–५–६.

**मिथुन : प्रगतीचा नवा टप्पा**

खरे म्हणजे तुमच्याइतका भाग्यवान पुरुष सध्या तरी दुसरा कुणी नाही. पहिला शनी साडेसातीत देखील तुमचे वजन वाढवीत आहे. गुरू, मंगळ तुमच्या भल्यासाठी वचनबद्ध आहेत. आता सर्वच क्षेत्रात तुमच्या प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिपथात येतील. निराशेचे ढग दूर पळतील. अडचणीचे डोंगर बर्फाप्रमाणे वितळून जातील. तुमचे नैतिक व भौतिक सामर्थ्य वाढेल. नोकरीव्यवसायात प्रगतीचे नवे युग सुरू होईल. वाणिज्य व कायद्याचे पदवीधर नव्या नोकरीत आपला परिणामकारक प्रभाव पाडतील. व्यक्तिमत्त्व विकसित होईल. चालू नोकरीत बढतीवर तुमची बदली होऊ शकेल. प्रयत्न अवश्य करावेत. इतरांची अडचण तुमच्या फायद्याची बाब ठरेल. एखाद्या भांडवलदाराचा कृपाप्रसाद लाभून नव्या उद्योगात भागीदारी मिळेल. महिलांना चालू उद्योगात मोठा वाटा मिळेल. चार पैसे हाती खुळखुळतील. शुभांक २–५–६.

**कर्क : यश गवसणार आहे**

तुम्ही आता बाराव्या शनीची अजीबात पर्वा करू नका. कारण रवी, मंगळ व गुरू यासारखे अंतरिक्षातील तेजस्वी ग्रह तुमच्या पाठीशी कोट करून उभे आहेत आता तुमच्या प्रगतीचा व यशाचा मार्ग कोणीही रोखू शकणार नाही. नवी स्वप्ने व नवे मनोरथ यांच्यावर झेप घेण्याएवढे तुमचे मन बळकट बनेल. नोकरीचा विचार तसा तुमच्याबाबतीत गौण मानला पाहिजे. कारण तुमचा नोकरीचा खरा पिंड नाही. तरीही बेकारांना नोकरीचे आश्वासन मिळेल व चालू नोकरीत, विशेष करून कामात बदल होईल. पैसा मिळवण्याच्या दृष्टीने हा काळ तसा अनुकूल नाही. पण खर्चावर मात्र योग्य नियंत्रण ठेवल्यास गरजेच्या वेळी कुणाकडे पैसा मागावा लागणार नाही. या आठवड्यात विवाहाचे वारे तुमच्या अंगाला सहजपणे स्पर्श करून जातील. महिलांचे नोकरीचे प्रयत्न यशस्वी होतील. शुभांक ७–४–११.

**सिंह : अचानक द्रव्यलाभ**

मंगळाचे तुम्हाला एवढे वरदान आहे की, तुमच्या आर्थिक स्थितीत नवा अध्याय सुरू झाला असे तुम्ही समजायला हरकत नाही. प्रामुख्याने रेस, लॉटरी, शुभांक यापासून तुमचे नशीब एकदम उंचावेलच. परंतु स्थावर व बक्षीसरूपाने देखील काही तरी पदरात पडून तुमची जन्माची ददात मिटणार आहे. रविवार, सोमवार व गुरुवार या दिवसाची मुद्दाम नोंद घ्या. यावेळी येणे वसूल होईल. बँकेत चार पैसे ठेवण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. मेष राशीचा उच्चीचा रवी राजकारणात तुमची प्रतिष्ठा वाढवणार आहे. आजवर तुम्ही राजकारणात प्रवेश केला नसेल तर तो यावेळी होईल. सत्तेत मोठे उच्चपद तुमच्या वाट्याला येणार आहे. हवाई मार्गाने यावेळी तुम्हाला परदेश-प्रवास घडला तर आश्चर्य मानू नका. विवाहेच्छू स्त्री–पुरुषांनी विवाहाचा विचार सध्या करू नये. महिलांना माहेरची प्रॉपर्टी वारसा हक्क मिळेल. नोकरीत प्रमोशन. शुभांक ४–७–१२.

**कन्या : तब्येतीला जपा.**

आठवा रवी व सातवा मंगळ हे विशेष परिणाम करणार आहेत तो तब्येतीवर होय. तुमची तब्येत जर उष्ण व पित्तकारक असेल तर उष्णतेचे विकार उद्भवतील. पित्ताचा त्रास होईल. पण गुरूची कृपा असल्यामुळे यातून देखील तुम्ही सुटू सकाल. थोडा त्रास झाला तरी तो सहन करण्याखेरीज गत्यंतर नाही. यावेळी तुम्हाला सक्तीची विश्रांती घ्यावी लागणार नाही. सोमवार ते बुधवार काही चांगल्या घटना घडतील. पैशाच्या मागणीची तोंडे वाढतील. पण कशी तरी सोय होईल. नोकरीधंद्याची परिस्थिती साधारणतः सुधारेल. कामात बदल होऊ शकेल. वरिष्ठांचे गैरसमज दूर होऊ शकतील. तुमच्या गुणांबद्दल त्यांची खात्री पटेल. सासुरवाडी व तुम्ही याचे बिघडलेले संबंध सुधारण्याची चिन्हे दिसू लागतील. विवाहेच्छूंचे विवाह सहज जमतील महिलांना नोकरीत शुभवार्ता. उद्योगात प्रगती. शुभांक ७–८–१२.

**तूळ : कौटुंबिक अडचण**

या आठवड्यापुरता तरी कौटुंबिक त्रास सहन करावा लागणार आहे. पुढे तुम्हाला

चांगले दिवस येणार असल्यामुळे हा त्रास तुम्ही आनंदाने सहन करावा असे मला वाटते. मंगळाचे बस्तान अजून तरी शत्रुस्थानी आहे. त्यामुळे तुमच्याविरुद्ध कुणाचे काही चालणार नाही. मात्र तब्येतीला जपणे आवश्यक आहे. शनिवार, सोमवार व बुधवार नोकरीत विशेष घटना घडतील. वडच्या व्यक्तींबरोबर बातचित करण्याची सुवर्णसंधी मिळेल. अधिकारपदावरील अत्युच्च व्यक्तीचा पाहुणचार घडेल. नोकरीच्या बाबतीत लिहावयाचे तर चालू नोकरीत थोडा त्रास पडेल. कामाचा ताण वाढेल. पण तुम्हाला नवे काही दाखवायला संधी मिळेल. नवी नोकरी मिळवण्याच्या बाबतीत सध्या तरी अडचणी आहेत. बेकारांना हा आठवडा फारसा आशादायी नाही. तंत्रज्ञ, कलावंत, गायक यांच्या गुणांना प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत गुणांना यश व पैसा मिळेल. शुभांक ५–८–१०.

**वृश्चिक : प्रगतीची वाटचाल**

बारावा हर्शल तुमची कसोटीच पाहात आहे. अनपेक्षित खर्चाची नवी नवी प्रकरणे उद्भवून जीव मेटाकुटीस येईल. पण एवढा त्रास इतर अनुकूल ग्रहांच्या तुलनेने सहन करा. शिवाय हा त्रास आता फार दिवस राहाणार नाही. अंतरिक्षातील रवी, मंगळ आणि गुरू यासारखे निरनिराळ्या गुणांचे ग्रह या आठवड्यात तुमच्यावर फिदा आहेत. त्यांनी अनेक बाबतीत तुमची प्रगती घडवून आणायचे ठरवले आहे. त्यामुळे तुम्ही निराश होण्याचे काहीच कारण नाही. राशीस्वामी मंगळ एवढा सामर्थ्यवान झाला आहे की प्रतिष्ठा, सत्ता, अधिकार यांचे वरदानच तुम्हाला लाभणार आहे. नोकरी असो की सार्वजनिक कार्य असो, व्यवसाय असो की राजकारण असो, त्या त्या क्षेत्रात तुम्ही अधिकाराचा दुरुपयोग कराल की काय अशी इतरांना भीती वाटेल. कुटिल कारस्थाने करण्याकडे बुद्धीचा कल झुकेल. शेती व खत या नव्या उद्योगात कल्पकता खर्च करा. ते अंतिम हिताचे ठरणार आहे. विवाहाचा योग आहे. महिलांनी भांडखोर स्वभावाला आवर घालावा. नोकरीत प्रगती. शुभांक ३–७–११.

**धनू : नोकरीत नवे घडेल**

राहूसारखा अत्यंत वाईट ग्रह व्ययस्थान अडवून बसला आहे. तो तेथे असेपर्यंत त्रासिकपणा, अडचणी, नादुरुस्त तब्येत, नोकरीत दगदग, मदतीसाठी हाकाटी, कुटुंबातील माणसांची गैरमर्जी, मतभेद इत्यादी परिस्थितीतून गेल्याशिवाय तुम्हाला गत्यंतर नाही. तुमचा मार्ग सरळ, सुखमय नाही तर तो कंटकमय आहे. या सगळ्या आपत्तींशी, प्रसंगी झगडून तर प्रसंगी संघर्ष करूनच तुम्हाला जावे लागेल. आशा आणि निराशा, यश आणि अपयश या द्वैतातूनच मार्ग काढावा लागणार आहे. पण आनंदाची गोष्ट म्हणजे तुमच्या जीवनाची नौका या वादळातून देखील तुम्हाला अलगद सुखाच्या तीरावर नेणार आहे, यात शंका बाळगू नका. ईश्वरावर श्रद्धा ठेवा आणि आलेल्या परिस्थितीला सामोरे जा. धंद्याची परिस्थिती बिघडणार नाही. नोकरवर्ग संप वगैरे करणार नाहीत. पण नव्या योजना प्रत्यक्षात आणणे कठीण होईल. नोकरीत बदललेल्या कामाचे तुम्हाला श्रेय मिळेल. त्याचबरोबर अपमानाचा निरास करणारी घटनाही घडू शकेल. वरिष्ठांचा राग कमी होईल. महिलांना नोकरीत महत्त्वाचे स्थान मिळेल. शुभांक ६–८–९.

**मकर : मनाला समाधान कमी**

रवी फारसे मनःस्वास्थ्य तुम्हाला लाभू देणार नाही. तो तुमचे सुख सतत कुरतडत राहाणार आहे. कुठे घरातच आजार तर कुठे स्थावरात अडचणी असे काहीतरी घडत राहील. पण तुमच्या भवितव्याची सारी मदार गुरुवर आहे. तुमचा मित्रपरिवार वाढेल. निरनिराळ्या क्षेत्रातील मित्र भेटतील. नातेवाइकांच्या सहवासात आठवडा सुखात जाईल. नात्यांपैकी ज्यांच्यावरोबर तुमचे संबंध बिघडले आहेत त्यात संबंध सुधारण्याच्या दृष्टीने बदल दिसू लागेल. शनिवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी नोकरीच्या दृष्टीने व संसारात आनंद देणाऱ्या घटना घडतील. घरापासून दूर असलेली मुले भेटतील. चार पैसे आनंदाने त्यांच्यासाठी तुम्ही खर्च करू शकाल. बेकारांच्या मागची वणवण संपणार आहे. इंजिनीयरांना चांगले काम मिळेल. तब्येत मात्र नादुरुस्त-दुरुस्त अशी राहील. महिलांच्या घरगुती उद्योगात भलतीच प्रगती होईल. नोकरी नसल्यास ती मिळेल. शुभांक ६–७–१०.

**कुंभ : राजकारणात बढती**

मंगळ पैसा मिळवून देईल व तसाच तो चैनीसाठी खर्च होऊन जाईल. मुलांच्या परीक्षा आटोपून ती खुषीत असतील व त्यांचे एकेक हट्ट पुरवताना तुम्हाला नाकीनऊ येतील. कदाचित कर्ज देखील काढावे लागेल. पण तरी देखील तुम्हाला हा जादा खर्च फारसा त्रास देणार नाही. प्रतिष्ठा व सत्ता या दोन्ही क्षेत्रांत तुम्ही गाजणार आहात. तुम्हाला निंदा व विरोधकांचा त्रास सहन करावा लागणार आहे, पण त्यावर देखील तुम्ही मात करणार आहात. आपण उगाच निंदा केली असा पश्चात्ताप या विरोधकांना होईल. राजकारणातील तुमची अवदसा संपली आहे याचा प्रत्यय येईल. सोमवार, गुरुवार उपासनेचा प्रत्यय येईल. विज्ञान पदवीधर व संशोधक यांचा सरकार-दरबारी दबदबा निर्माण होईल. विवाहाचा प्रश्न लांबणीवर पडेल. महिलांच्या सार्वजनिक सेवेचा योग्य गौरव होईल. मोठेपणा मिळेल. शुभांक ४–६–७.

**मीन : आत्मिक आनंद मिळेल**

तुम्हाला इतर कोणतेही ग्रह अनुकूल वा प्रतिकूल असोत, राशीत असलेला एकटा गुरू तुम्हाला सर्व अरिष्टांतून सोडवून तुमचे यश द्विगुणित करील. आधीच तुमच्या उपासना व पूजाअर्चा याकडे ओढा आहे. या आठवड्यात या उपासनेचे साक्षात्काराच्या रूपाने योग्य फळ तुमच्या पदरात पडणार आहे. साक्षात्कारामुळे तुम्हाला अत्यानंद मिळेल. एक प्रकारे निराळ्या आगळ्या धुंदीत तुमचे मन रमून जाईल. नोकरीच्या दृष्टीने विचार करता यावेळी बदली-बढतीचे जमावे. त्रासदायक कामावरून चांगल्या जागी बढती होईल. शिक्षक, प्रोफेसर, वकील, इंजिनीयर्स व शेतीपदवीधर यांना नोकरीच्या बाबतीत समाधान देणारी वार्ता समजेल. पगारवाढ मिळेल. आरोग्याची मात्र काळजी घ्या. उन्हे अंगावर घेऊ नका. अनेक दिवस रेंगाळत असलेले विवाह यावेळी जुळून दिमाखात पार पडतील. महिलांना मैत्रिणींसमवेत तीर्थयात्रा घडेल. मनासारखा दागिना मिळेल. शुभांक ७–८–१०.

□ □

**लायन्स — पृष्ठ १० वरून**

'बोला.'

'जवळ बसा. मला उजव्या डोळयानं दिसू लागलंय्. या मंडळींच्या पायी आपल्या चामडयाचे जोडे करून घालावेसं वाटतंय. आजकाल पैशावाचून पान हलत न्हाई. तिथे केवढी मोठमोठी मानसे आमची सेवा करत्यात. लाज वाटते बघा. तुम्ही लिऊन घ्या आणि छाप्यात छापा हे!'

गोरेगावचे मणिकचंद नथुराम शेठ, खरवली फाटयावरचे शिवराम बाळाजी दळवी, निजामपूरचे सुलेमान इब्राहिम लोखंडे, होडगावची राणी बाळू खाडे, किती तरी रुग्ण त्यांच्याशी गप्पा मारताना, प्रत्येकाचा ऊर जणू या लायन्सबद्दल कृतज्ञतेने भरून आला होता. म्हाताऱ्या आणि म्हातारे–इथून निघून परत घरी जावे लागणार म्हणून नाराज होते! पुन्हा सुनांच्या हाताखाली! आता तर दिसते! मग कामाचा रगाडा मागे लागणार!

शिबिराच्या समारोपादिवशी अशोकभाई मला जेव्हा म्हणाले, एक त्रयस्थ म्हणून तुम्ही तुमचे मत या समारंभात सांगा. तेव्हा मी नाही म्हणालो नाही.

समारोपाआधी सर्व रुग्णांची तपासणी, बँडेज–बांधणी झाली. प्रत्येक रुग्णाला एकेक घोंगडी, एकेक चष्मा, एकेक उत्तम गॉगल, ताट, वाटी, पेला, महिनाभर पुरतील एवढी औषधे एवढ्या वस्तू (जरूर त्यांना एस्. टी. चे भाडेही) भेट म्हणून देण्यात आल्या. समारंभासाठी अलिबाग, पनवेल, मुंबई येथून लायन्स आले होते. मुख्य पाहुणे म्हणून मुकुंद आयर्न अँण्ड स्टील्स्चे चेअरमन श्री. बीरनभाई शहा सपत्नीक आले होते. आपल्या भाषणात श्री. शहा म्हणाले,

'हा नेत्रयज्ञ आणि दंतयज्ञ करणाऱ्यांना रुग्णांनी आणि इतरांनी धन्यवाद दिलेले ऐकले. बरे वाटले. पूर्वकाळी भारतात यज्ञ होत. पण त्यांत देवांना संतुष्ट करण्याचे कार्य होई, इथे दरिद्रीनारायणाला–सामान्य दरिद्री माणसांना संतुष्ट करण्याचे, दृष्टी देऊन प्रकाश दाखविण्याचे कार्य झाले. समाजातील सबल घटकांनी दुर्बलांकरता आपली संपत्ती वेचली पाहिजे, त्यांचे दुःख दूर करण्याकरता कर्तव्य म्हणून पुढे झाले पाहिजे. इतरत्र सामान्यतः संतप्त वागणारे विद्यार्थी इथे प्रेमाने श्रमले, स्वयंसेवक झाले हे पाहून विद्यार्थिजगताबद्दलची मनातली भीती पार संपली.'

समारंभात डॉ. नाईक बोलले. अॅडव्होकेट सुधाकर सावंत बोलले; कलेक्टर श्री. सुरेशकुमारही बोलले. नगराध्यक्ष श्री. नानासाहेब पुरोहित बोलायला उभे राहाणार तोच सभागाराच्या मागच्या भागातून एक आरोळी घुमली.

'देव माणसानू, मला बोलायचं हाय. मला बोलाया द्या.' साऱ्या माना मागे वळल्या. भिकाऱ्यासारख्या दिसणारा एक म्हतारा उभा राहून ओरडत होता. तांबडे मुंडासे डोक्यावर कसे तरी ठेवले होते. मळके धोतर, फाटका सदरा. जुना लांब पार्शी टाईप कोट. डावा डोळा बँडेजमध्ये होता त्यावरून तो रुग्ण होता. मघा ३–४ रुग्ण, संयोजकांना धन्यवाद देऊन गेले. त्यात तो उठला नव्हता. त्याने आधी नाव दिले नसावे. स्वयंसेवक त्याच्याकडे धावले. त्यांनी म्हाताऱ्याला धरून व्यासपीठाशी आणले. 'बोला बावा' म्हणताच तो ८४ वर्षांचा म्हातारा खडया आवाजात बोलू लागला. समोर माईक आहे याची दखलच त्याने घेतली नाही. 'धन्यानू, मी साधू चिलामण गधाई–म्हानार लिवूत कांबळयाचे, जिल्हा बारामती. माझा धंदा होता फिरस्ता जोशाचा. हात पाहून, कुंडली मांडून ज्योतिष सांगण्याचा. पण गेली धा वर्षे मला दिसत नाहीसे झाले. ज्योतिषाचा धंदा दृष्टीविगर कसा चालणार? जवळचे कुणी नाही. खायला अन्न नाही. मग भिक मागायचा झंदा करून पोट जाळीत होतो. इथे असाच फिरत आलो. डोळयाचे आप्रेशन करून इथे दृष्टी परत मिळेल असे कुणी सांगितले. सात दिवस भीकवी मागायला नको. म्हणून इथे आलो. मी गावोगाव डॉक्टरांच्या पाया पडलो. पण बरिबाला कुणी दृष्टी दिली नाही. इथे या देव डॉक्टरांनी आप्रेशन केलं. पदरचे अन्न घालून दृष्टी दिली. मोठे काम. मंडळी, चांगलपणाचं स्वांग कुणाला आणता यायचं नाही. नम्रतं मोठेपण घ्याया निघेल तो म्येलाच बघा.' गडी खुशीत आला होता. त्याची रसवंती थांबायला तयार नव्हती. उदाहरणादाखल तो गोष्ट सांगू लागला.

एका रानात एक वाघ होता. मोठा चट्टेरापट्टेरा. उग्र आणि भेसूर. त्याचा जंगलावर दरारा. रानात एक कोल्ह्याचं बी टोळकं होते. पण कोल्हे ते कोल्हे अन् वाघ तो वाघ. कोल्ह्यांना एकदा वाटलं आपुन वाघाचा नक्शा उतरवावा. त्येनी आपल्यापैकी एकाला वाघ करायचं ठरवलं. होता चांगला जाडजूड गलेलठ्ठ! पन् अंगावर पट्टे नाहीत तर वाघ कोन म्हननार? कोल्ह्यांनी लोहाराची सांडस चोरली. जंगलात आगटी पेटवली. त्यात सांडस चांगली लाल केली. आणि त्या कोल्ह्याच्या पाठीवर पट्टे ओढायला सुरुवात केली. दोन चार पट्टे ओढले तशी वाघ होनारा कोल्हा गपगार! भलत्याला वाघपण न्हायतर सिंहपण नाही मिलनार! हे डाक्टर सिंह आहेत. त्यांचं देव भलं करो.

म्हातारा पाल्हाळिक बोलला. पण त्याला थांबवावेसे अध्यक्षांनाही वाटले नाही. लायन्स क्लबचे योग्य शब्दात त्याने गुणवर्णन केले होते.

नानासाहेब पुरोहितांनी लायन्स क्लबला नेत्र-दंत-शिबिराबद्दल धन्यवाद देताना म्हटले, 'श्री. बिरेन शहासारख्या उद्योगपतींनी या मागासलेल्या भागाला उद्योगाची दृष्टी देण्याच्या दृष्टीनेही प्रयत्नशील राहावे. आम्ही त्यांना संपूर्ण सहकार्य देऊ! या महाडात अनेक वर्षांत असे विधायक कार्य झाले नव्हते. सर्वपक्षीय मंडळी एकदिलाने या कार्यात सहभागी झाली. गावात सामंजस्य निर्माण करायला याची फार मदत होईल–त्याबद्दलही लायन्स क्लबला धन्यवाद!

प्रा. जे. व्ही. चौधरींनी आभार मानल्यावर समारंभ संपला. रुग्णांची घरी जायची घाईगर्दी उसळली. पाहुणेही पांगले. मी विचार करू लागलो. अशोक भाई, चतुर्भुजशेठ, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. भन्साळी, प्रा, चौधरी, जॉन, नलावडे, जाधव, निगडे, राऊत ही सारी लायन मंडळी ८।१५ दिवस या कार्यासाठी राबत होती. का? त्यांनी काय मिळवले? १६८ ऑपरेशन्स् मुंबई–पुण्याकडे करायची झाली असती तर प्रत्येकी एक हजार रुपये खर्चले गेले असते. २ हजार दांत काढायला १० हजार रुपये खपले असते. सात-आठ दिवसात केवळ ४० हजार रुपये नक्त खर्चून (यांत भेटवस्तूही आल्या.) पावणेदोन लाख रुपयांचे काम त्यांनी दरिद्रीनारायणाची सेवा म्हणून केले होते! हा हिशेब क्षुल्लक खास नाही.

आता कुणी म्हणेल, 'म्हाताऱ्यांना दृष्टी देण्यावर एवढे पैसे खर्च करणे हा अनुत्पादक खर्च आहे!' हा युक्तिवाद मान्य करावा इतका काही मी बुद्धिवादी नाही हे कबूल केले पाहिजे.

—प्रा. रा. म. बिवलकर

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

# शशी कपूर

**कपूर घराण्याचा हा वारस ना धड स्टार ना धड ॲक्टर अशा उंबरठ्यावर आज उभा आहे....**

मार्लन ब्रँडोला कुणीतरी एकदा विचारलं होतं : 'तुझ्या यशाचं रहस्य काय ?' 'योग्य लोक मला योग्य वेळी, योग्य ठिकाणी भेटत गेले.'–ब्रँडोनं सांगितलं. आपल्या शशी कपूरचा याच संदर्भात विचार केला तर प्रश्न पडतो : त्याचं घोडं अजून कुठं पेंड खातंय ? रजतपटावर पहिलं पाऊल त्यानं टाकलं कृष्ण चोप्रासारख्या दूरदृष्टीच्या नि विख्यात दिग्दर्शकाच्या हाताला धरून. 'चार दिवारी 'पासून झालेल्या ही शुभलाभाची परंपरा बिमल रॉय यांच्या 'प्रेमपत्र 'नं आणि बी. आर. चोप्रांच्या 'धर्मपुत्र 'नं चालू ठेवली. शशी कपूरला पहिल्यापासूनच योग्य लोक, योग्य वेळी योग्य स्थळी भेटत गेले. आणि तरीही पंधरा वर्षांच्या कारकीर्दीत त्याच्या एकाही चित्रपटानं झगझगीत यश पाहिलं नाही की त्याची एकही भूमिका अविस्मरणीय ठरलेली नाही.

कबूल, गेल्या वर्षाच्या उत्तरार्धापासून शशी कपूरला बरकत आली आहे. शशीची सही घेऊन आठवड्याला किमान तीन–चार चित्रपटांच्या घोषणा होत आहेत. पण त्या चित्रपटांच्या निर्मात्यांची नावं पाहिली तर शशीची ही बरकत संख्यात्मक आहे, गुणात्मक नाही असंच दिसून येतं. स्टार शशी कपूरच्या वलयात त्यानं या बरकतीनं डोळ्यात भरण्याजोगी भर घातली आहे; पण अभिनेता शशी कपूर ! त्याचं काय ? आणखी एक गोष्ट कबूल करायला हरकत नाही. शशी कपूरनं अगदी टाकाऊ काम कधीही केलेलं नाही. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची देवदत्त देणगी त्याला आहे आणि तिच्या बळावर शशी कोणत्याही सिनेमात पाहावासा वाटतो. पण पुष्कळदा त्याचं ते देखणेपण त्याच्या अभिनयातल्या त्रुटी झाकायला तर कामी येत नाही ना ?–असंच वाटत राहतं. भारावून टाकणारा, वर्षानुवर्षं मनात राहणारा अभिनय शशीनं केल्याचं कधी आठवतंय तुम्हाला ?

पंधरा–सोळा वर्षांपूर्वी धर्मेंद्र आणि मनोज यांच्याबरोबर शशी अभिनयाच्या मैदानात उतरला. शशीच्या भाग्याची तुलना करता, धर्मेन्द्र आणि मनोज यांची अक्षरश: वणवण झाली असंच म्हटलं पाहिजे. धर्मेंद्रला 'दिल भी तेरा हम भी तेरे ' मध्ये पहिली संधी देणारे आजचे 'कहानी किस्मत की ' कार अर्जुन हिंगोरानी काय, किंवा मनोजच्या पहिल्या चित्रपटाचे ( चाँद ) लेखराज भाकरी काय, कृष्ण चोप्रा आणि बी. आर. चोप्रा यांच्यापुढे हे दोघे शामभटच ठरतील. पण किरकोळ चित्रपटानं सुरुवात करणारा धर्मेन्द्र आज बॉक्स ऑफिसच्या दृष्टीनं हिंदी रजतपटाचा पहिल्या क्रमांकाचा 'स्टार ' आहे. नगण्य भूमिकेनं प्रारंभ करणारा मनोज आज वादग्रस्त का होईना, पण निर्माता–दिग्दर्शक म्हणून तरी तुफान यश आणि पैसा कमावून आहे. तोच अभिनयाचा संस्था म्हणून गौरवल्या जाणाऱ्या कपूर घराण्याचा हा वारस ना धड स्टार ना धड ॲक्टर अशा उंबरठ्यावर उभा आहे.

संजीवकुमार, राजेश खन्ना आणि अमिताभ बच्चन शशी कपूरच्या मागून आले, आणि आज 'बॉक्स ऑफिस स्टार ' आणि अभिनेता या दोन्ही तुलनांनी शशी कपूरच्या पुढे गेले आहेत. संजीवकुमारची वाटचाल तर 'एक्स्ट्रा 'च्या निबिड अरण्यापासून आजच्या 'भरत ' पारितोषिकापर्यंत झाली आहे. राजेश खन्नावर एक काळ दैव दोन्ही हातांनी सोनंचांदी उधळत होतं, पण त्याची करीअरही सुरू झाली ती 'राज 'सारख्या दुय्यम श्रेणींच्या भूमिकांनी. 'कुठे काही कमी नाही हो ! पण योग जुळून यावा लागतो ना ! ' या थाटात शशी कपूरच्या ज्या कमनशिबाबद्दल हळहळ व्यक्त केली जाते, त्याच्या कोपाचा जबर तडाखा राजेश आणि अमिताभ यांनी उत्कृष्ट यशानंतर घेतला, आणि त्यातून सावरून ते आज पुन्हा मानकऱ्यांच्या पहिल्या रांगेत येऊन बसले आहेत.

मुद्यावर येऊन बोलायचं तर, ज्या कमनशिबाचा शशी कपूरबाबत उदोउदो केला जातो, ते कितपत बरोबर आहे ? ज्याच्या कारकीर्दीचा श्रीगणेशाच फक्त मोठ्या दिग्दर्शकांकडून आणि त्यांच्या चित्रसंस्थांकडून होत नाही, तर सात समुद्र


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. • लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

पार करून भारतात येणारे विदेशी चित्रनिर्मातेसुद्धा ज्याला आपल्याकडे संधी देतात, त्याचं नशीब वाईट कसं काय असू शकतं ?

आता विदेशी चित्रनिर्माते ज्याला एक नव्हे, दोन नव्हे तर अर्धा डझन चित्रपटांमध्ये काम देतात, त्याच्याजवळ गुणच नाहीत असं म्हणणं धाडसाचं ठरेल. ते धाडस करणं हा या लेखाचा हेतू नव्हेच. गुणी कलाकार संधी मिळूनही तिचा फायदा घेण्यात अपयशी ठरतात का; लोकांची सहानुभूतीच कधी कधी कलाकारांच्या वाढीला मारक ठरते की काय, हे शशी कपूरच्या निमित्तानं एकदा विचारात घेणं, हा या लेखाचा हेतू.


अर्थात योग्य संधी म्हणताना शशी कपूरचे आंग्लभाषीय चित्रपट माझ्या मुळीच नजरेपुढे नाहीत. एकटचा 'हाऊसहोल्डर'चा काहीसा अपवाद वगळता, त्याच्या इंग्रजी चित्रपटांचा दर्जा त्यांच्या देशी भाईबंदांहून काय फारसा वेगळा आहे ? ' अ मॅटर ऑफ इनोसन्स ' ( पूर्वाश्रमीचं शीर्षक–'प्रीटी पॉली ' ) हा गाजावाजा करून काढलेला चित्रपटच घ्या. नोएल कॉवर्डनं स्वतःच्या कथेवरून काढलेल्या या चित्रपटात लक्षात राहावं असं काय होतं ? स्वतःच्या रूपाबद्दल गंड असलेल्या एका तरुणीला एक भारतीय तरुण स्वतःच्या प्रेमाच्या बळावर आत्मविश्वास देतो, हे त्याचं कथासार. पण हृदयाला स्पर्शून जावा असा एकही क्षण या प्रेमकथेत नव्हता. 'द हाऊसहोल्डर' काढणाऱ्या इस्माइल मर्चंट आणि जेम्स आयव्हरींनीच ' शेक्सपीअरवाला ' काढला. आंग्लभाषीय चित्रपटांच्या नकाशात भारत आपलं छोटंसं का होईना, पण स्थान जमवणार, ह्या ' हाऊसहोल्डर ' मुळे झालेल्या भ्रमाचा निरास व्हायला ' शेक्सपीअर ' पासून सुरुवात झाली, असं खेदानं म्हणावं लागेल. ' बॉम्बे टॉकी ' मारे भारतीय नटाच्या जीवनाचं चित्रण करायला गेली, आणि पुरेशा नाट्याअभावी रिकामी प्रेक्षागृहं पाहून परत गेला. आणि आता ' सिद्धार्थ ! ' हॉलिवूडच्या रत्नजडित गुहेची दारं शशी कपूरसाठी उघडण्यासाठी ' सिद्धार्थ ' उपयुक्त ठरू शकणार नाही.

' सिद्धार्थ ' च्या व्यावसायिक यशापेक्षाही पुन्हा एकदा अभिनेता शशी कपूरला अपयश यावं याचं वाईट वाटतं. कलकत्त्याच्या एका ज्येष्ठ समीक्षकानं तर शशीवर, हिंदी सिनेमांच्या घाईगर्दीतून वेळ काढून ' सिद्धार्थ ' साठी तारखा देण्याचा आणि ' कॅज्युअली ' काम करण्याचा स्पष्ट आरोप केला आहे.

विदेशी चित्रपटातल्या कामांनी शशी कपूरला वर चढवणं राहोच, हिंदी सिनेमातल्या त्याच्या स्थानावरूनही खाली आणलं. त्यातच, विदेशी भूमिका हाती घेण्याआधी शशीनं नकळत एक मोठी चूक करून ठेवली. उत्साहाच्या पहिल्या भरात त्यानं ज्या मुलाखती दिल्या, त्यात सरसकट हिंदी सिनेमांवर आणि त्याच्या जन्मदात्यांवर तो टीका करीत असे, त्यांच्या दर्जाबद्दल हसतखेळत पण घरचे अहेर बहाल करीत असे. राज कपूरच्या भावाबद्दल उघड विरोध करणं चित्रसृष्टीत त्या वेळी कुणाला शक्य नव्हतं. निर्मात्यांनी आपली नाराजी दुसऱ्या तऱ्हेनं व्यक्त केली–ते शशी कपूर–पासून फटकून राहू लागले. वास्तविक त्यानं केलेली टीका रास्त नव्हतीच असं नव्हे. पण हा म्हणजे पाण्यात राहून माशाशी वैर करण्याचा प्रकार ठरला.

शशी कपूर आणि राजेश खन्ना यांची चित्रवर्तुळात नेहमीच तुलना होते. 'अभिनय-गुण आणि रूप–दोन्ही दृष्टचा दोघे बरोबरीचे आहेत. मग शशी उणा कुठे पडतो ? तर सुदैवाच्या बाजूने 'असा युक्तिवाद तिथे नेहमी ऐकू येतो. दैवाचा भाग कुणाच्याच बाबतीत नाकारता येत नाही. राजेशचं ग्रहमान असेलही शशीपेक्षा उजवं. पण राजेश आणखी एका बाबतीत शशीहून उजवा आहे. आपल्या करीअरला योग्य आकार देणारी दृष्टी आणि योजना त्याच्याजवळ आहे. केवळ तत्त्व म्हणून आपली किंमत कमी करायची नाही, या दृष्टीनं शशीनं ' आनंद ' आणि ' सफर ' या सिनेमांच्या ऑफर्स नाकारल्या म्हणे. आणि त्याच म्हणे राजेशनं आपण होऊन, किंमत नगण्यतेला आणून स्वीकारल्या; त्यासाठी तो स्वतः दिग्दर्शकांना जाऊन भेटला. कोणत्या वेळेला कोणती भूमिका स्वीकारायची याचे राजेशचे अंदाज अचूक ठरतात. म्हणून तर ' हाथी मेरे साथी ' सारखा फालतू चित्रपटामध्येही तो यश पदरी बांधतो. दर पाचसहा साचेबंद भूमिकांमागे एक उत्तम भूमिका हृषिकेश मुखर्जीकडे नाहीतर बासू भट्टाचार्यकडे घ्यायची, हे त्याचं धूर्त गणित दर वर्षी त्याच्या पदरात पारितोषिकांची शिगोशिग मापं घालून जातं.

स्वजनांचं कौतुक वाढीला कशा मर्यादा घालतं, याचा चटका देणारा अनुभव शशीनं ' द हाऊसहोल्डर ' च्या वेळी घेतला. शशी कपूरचं चंदेरी दुनियेतलं प्रवेशाचं स्वागत थाटाचं झालं. पृथ्वीराज कपूरच्या या उमद्या शेंडेफळाला, राज आणि शम्मी कपूर यांच्या या देखण्या धाकट्या भावाला कुठे ठेवू नि कुठे नाही, या भावनेनं चित्रव्यवसायातली काही माणसं भारून गेली. ' शशी जातिवंत नट आहे ' अशी जाहिरातवजा तारीफ ( किंवा उलट समजा हवं तर ) त्यांनी सुरू केली.



त्याचा परिणाम चांगला झाला नाही, असं स्वत: शशी कपूरच सांगतो. येत आहे त्याहून अधिक काही शिकण्याची आपल्याला गरज आहे, ही भावना त्यामुळे नकळत नष्ट झाली. ' हाऊसहोल्डर ' च्या रशेस्‌नी ही गोष्ट शशीच्या वेळीच नजरेला आणून दिली, नाहीतर......

' हाऊसहोल्डर ' लेखिका रुथ झाबवाला यांना शशी कपूर आपल्या कथेचा नायक म्हणून पहिल्यापासूनच नापसंत होता. ' पहिल्या दिवशी सेटवर मी उत्साह ओसंडून जाणाऱ्या चेहेऱ्याचा, कपाळावर बटा रुळवणारा, हसमुख शशी कपूर पाहिला, आणि कपाळावर हातच मारून घेतला !'–श्रीमती झाबवाला सांगतात, ' माझ्या कथेचा नायक प्रेम हा एक साधासुधा शिक्षक आहे, अत्यंत भिडस्त आणि संकोची, मुखदुर्बळ. चेहेऱ्यावरून घरची सधनता स्पष्ट दिसणारा हा शशी कपूर कसला माझ्या नायकाला न्याय देणार !'

साधासुधा शिक्षक दिसण्यासाठी शशीनं आपले आधुनिक वळण दिलेले केस कापून घेतले. ( ' शर्मिली 'मध्ये कॅप्टनची भूमिका करताना किंवा अलीकडे ' प्रेम कहानी 'मध्ये १९४२ सालचा पोलीस इन्स्पेक्टर उभा करताना मात्र शशीला एवढेही श्रम घ्यावेसे वाटले नाहीत ! ) मग दुसऱ्या दिवसापासून अगदी साधा भांग पाडून, कुडता-पायजमा हा पोशाख चढवून शशीची स्वारी प्रेमला साकार करण्यासाठी कॅमेऱ्यासमोर उभी राहू लागली.

सिनेमाच्या काही दिवसांच्या चित्रणानंतर मंडळी रशेस् पाहायला जमली–आणि शशीसकट सर्वांना एक धक्का बसला. शशी कपूरनं प्रेमचा पोशाख चढवल्याचं पडद्यावर स्पष्ट दिसत होतं; पण प्रेमचा पोशाख चढवून शशी कपूरच पडद्यावर वावरतोय हे ढळढळीत दिसत होतं.

घोटाळा काय झालाय, शशीच्या लक्षात आला. कॅमेऱ्यासमोर उभं राहाण्यापूर्वी तो इतरांबरोबर गप्पा करण्यात, थट्टामस्करी करण्यात वेळ घालवीत असे. कॅमेऱ्याचं काम सुरू होई; पण शशी प्रेम बनू शकत नसे. तो शशीच राही. शशीप्रमाणेच वागे, बोले, चाले. यामुळे प्रेमची आहुती पडत होती ! झाला प्रकार शशीला फार झोंबला. दुसऱ्या दिवसापासून सेटवरची ही मौजमजा त्यानं सोडून दिली. कॅमेऱ्यासमोर जाण्यापूर्वीचा सगळा वेळ प्रेमच्या व्यक्तिमत्त्वात उतरवण्यात घालवायचा नेम त्यानं सुरू केला.

' हाऊस होल्डर ' पूर्ण झाला तेव्हा शशीचं सुरेख अभिनयाबद्दल अभिनंदन करणाऱ्यात रुथ झाबवाला अग्रभागी होत्या !

' हाऊसहोल्डर 'नंतर मात्र शशीनं हे आव्हान कोणत्याही भूमिकेत स्वीकारलेलं दिसत नाही. स्टेजवर कामं केलेल्या शशीला कामातली सफाई ही नवी गोष्ट नव्हती. पण स्टेजवर कामं करून येणारी अंतर्मुख सखोलता त्याच्या नंतरच्या कुठल्याही कामात दिसून आली नाही. तो फार लवकर स्वत:बाबत संतुष्ट झाला आहे असं आताशा वाटतं. त्यामुळे हल्ली कोणत्याही भूमिकेत तो शशी कपूरच असतो. चेहेऱ्यावरून, नजरेतून भावना व्यक्त करणं तो सहज साधू शकतो; त्या मानानं तोंड उघडलं की त्याची शान जाते, असं हल्ली वाटतं. त्याला कारण म्हणजे पु. लं. च्या भाषेत सांगायचं तर, ओठाला ओठ न लावता बोलण्याची त्याची पद्धत. शब्दांचे उच्चारही तो नेहेमी नको तितके दीर्घ करतो. ' रोटी कपडा और मकान 'मध्ये तो ' ओ:, टी. व्ही. ?' हा साधा संवाद शशी ' ओ ऽऽऽ, टी ऽऽ–व्ही ऽऽ ?' असा उच्चारून जंगी हशा–टाळ्या वसूल करतो. त्याची अभिनयाची प्रकृती सौम्य वर्गात मोडणारी आहे. ' प्रेम कहानी 'मध्ये तो जेव्हा जेव्हा शेरखानला ( विनोद खन्ना ) भेटायला येतो, तेव्हा तेव्हाचे संवाद त्यानं अतिशय खालच्या आवाजात बोलून परिणामकारक केले आहेत. ' दीवार 'मध्ये याच सौम्यतेच्या बळावर अमिताभच्या आतषबाजीपुढे ताठ मानेनं उभा राहिला आहे. ( लेखकाचं सगळं बळ ज्या भूमिकेत एकवटलं आहे, त्या भूमिकेविरुद्धची भूमिका घेऊन ती नीटसपणे पार पाडल्याबद्दल शशीचं खास कौतुक करायला हवं. ) हाच शशी कपूर ' प्रेम कहानी 'च्या अगदी शेवटच्या भागात, आपली वंचना झाल्याबद्दलचा शोक कशा आक्रस्ताळ्या पद्धतीनं मांडतो पाहावं. हिंदी सिनेमांना भडकपणाबद्दल नावं ठेवणारा शशी तिथं अगदी अव्वल हिंदी सिनेमाच्या नायकाला साजून जावा असाच करतो.

' चार दिवारी 'मध्ये आणि ' वक्त 'मधल्या तर अगदी छोट्या–गरजेपायी ड्रायव्हरची नोकरी करणाऱ्या पदवीधराच्या भूमिकेमध्ये शशी आपल्याबद्दल विशिष्ट अपेक्षा निर्माण करून गेला. आपल्या लोकप्रिय भावांकडून वा अन्य कुण्या ख्यातनाम नटाकडून कसलीही उसनवार न करता, स्वाभाविकपणे गंभीर भूमिका करणारा एक चांगला नट सापडला आहे असं लोकांना वाटू लागलं. आणि या भूमिकांची छाप पक्की होण्यापूर्वीच शशीनं ' हॉलिडे इन बॉम्बे ', ' ये दिल किसको दूं ' आणि ' बिरादरी ' या सिनेमांमधल्या खेळकर भूमिकाही चांगल्या वठवून दाखवल्या. ' प्यार किये जा 'मधली त्याची तरुण प्रेमवीराची भूमिका धमालच होती. खुसखुशीत संवाद, चतुर पटकथा आणि दिग्दर्शन यांची साथ लाभल्यामुळे शशी कपूर ' प्यार किये जा 'मध्ये नजरेत भरला. फार्सिकल अभिनयाची उत्तम चुणुक त्यानं इथे दाखवली. साहजिकच खेळकर भूमिकांसाठी शशीला विशेष मागणी येऊ लागली. ' जब जब फूल खिले 'मधला त्याचा साधाभोळा काश्मिरी नावाही प्रेक्षकांना




पुणे शहर व परिसरात
विक्रेते नेमणे आहेत.

एकदम पसंत पडला. पाठोपाठ आलेल्या 'हसिना मान जाएगी 'नं शशीला प्रथमच दुहेरी भूमिकेची संधी दिली. खुशालचेंडू, संधिसाधू असा एक भाऊ, आणि लढाईवरून परत आल्यावर नाजुक मनःस्थिती झालेला दुसरा भाऊ ( की मित्र, ते आता आठवत नाही ), या दोन्ही व्यक्तिरेखा शशी कपूरनं मनापासून रंगवल्या.

यानंतर मात्र शशीची घसरण सुरू झाली. बॉक्स ऑफिसच्या दृष्टीनं आणि अभिनय-दृष्टचाही खेळकर भूमिका करताकरता शशी सर्रास शम्मी कपूरची गादी चालवू लागला होता. तशीच संगीत छेडछाड, तशीच अंगघुसळणीसह बागडाबागडी आणि तोच हल्लागुल्ला ! 'राजासाब', 'नींद हमारी—खाब तुम्हारे', 'रुठा ना करो', 'माय लव्ह', 'जहाँ प्यार मिले' आणि 'मिस्टर रोमिओ' ही ह्या अपयश—मालिकेतली शेवटची काडी ! या चारपाच वर्षांच्या काळात त्याच्या फक्त दोनच सिनेमांनी उत्तम यश पाहिलं— 'अभिनेत्री' आणि 'शरमिली.' पण या दोन्हींचं श्रेय शशीला मिळालं नाही, ते गेलं नायिकांना, कारण दोन्हींची कथानके नायिकाप्रधान होती, आणि त्यांच्यापाठोपाठ श्रेयावर हक्क सांगितला संगीतकारांनी.

हे दोन अपवाद सोडता चारपाच वर्षांत शशी कपूरनं अपयशाखेरीज कुणाचं तोंड पाहिलं नाही ! ज्यांची तोंड पाहायला त्याला आवडलं असतं अशा जुन्या निर्मात्यांनी आणि वितरकांनी साफ तोंड फिरवली होती. बरं, सिनेमे पडेल ठरले तर ठरले; पण निदान शशीचा या काळातला अभिनय निर्दोष होता म्हणता काय ? छे: ! नावच नको.

या काळात त्याच्या कामी आली त्याची जनमानसातली आणि पत्रकारमानसातलीही उजळ प्रतिमा. अन्य कपूर लोकांना थोडे वेगळे वाटतात; प्रेम करावेसे वाटतात, पण त्यांच्या झगझगीत व्यक्तिमत्त्वामुळे थोडे दूरचे वाटतात. शशी त्यांच्या मनानं आपल्यातला वाटतो. काळ्या बाजारातून काहीही खरेदी न करणारा म्हणून ख्याती असलेला, इन्कमटॅक्सचा कलंक नसलेला, तुमच्या—आमच्याप्रमाणे बाजारातून रेशनचं धान्य घेणारा आणि रविवारी मुलाबाळांना फिरायला घेऊन जाणारा—ही शशीची जनमानसातली प्रतिमा आहे. प्रसिद्धीसाठी कोणत्याही वाममार्गाचा उपयोग करण्याची हौस नसलेला, स्वतःबद्दल कमी बोलणारा, मुलाखत देण्यासाठी खळखळ न करणारा आणि सौजन्यानं वागणारा हसमुख नट म्हणून शशी पत्रकारांमध्ये स्वतःविषयी आपुलकी मिळवून आहे. या अपेश—अध्यायात शशी प्रसिद्धीच्या झोतातून अजीबात बाजूला पडला नाही याचं श्रेय शशीच्या भल्या वागणुकीकडे जाईल. तशी शशीची शिस्तशीर वागणूक हा सिनेसृष्टीत थट्टेचा विषय आहे. याच्या येण्याजाण्याच्या वेळेवर घड्याळ लावून घ्यावा इतका हा वक्तशीर. ठरलेल्या वेळेवर सेटवर चिटपाखरूही येणार नाही, किंवा आलंच तर फक्त चिटपाखरूच येईल, हे माहीत असूनही शशी शूटिंग असो की मुहूर्त असो, बिनचूक वेळेवर पोचणार, आणि 'अनुभवापासून हा भला माणूस काही शिकत नाही' अशी थट्टा ऐकून घेणार. सगळेच थट्टा करीत नाहीत. काहींना राग देखील येतो. कारण शशी जसा वेळेवर येतो, तसेच वेळ संपली की निघून जातो. यापेक्षा सगळ्यांच्या सोयीनं उशीरा येऊन, सगळ्यांबरोबर उशिरापर्यंत थांबायला तयार असणारे नट त्यांना बरे वाटतात. शिवाय वेळेवर हजर राहातो तो कसला सुपर स्टार ! या हिशेबाने शशी कधीच सुपरस्टार ठरणार नाही.

अडतीस वर्षांच्या शशी कपूरवर दैव नव्यानं अनुरक्त झालेलं दिसतं. नवनवे करार हस्तगत करण्याबाबत आपल्या दोन पुतण्यांशीच शशी सध्या स्पर्धा करतो आहे. प्रकृतीचा विचार केला तर शशी कदाचित डब्बूचा लहान भाऊ वाटेल. ही प्रकृती, हा अद्याप तरुण दिसणारा चेहेरा हा अडतिसाव्या वर्षी स्पर्धेच्या रिंगणात टिकायला शशीला साहाय्यकारी ठरणार आहे. आता 'क्रेझ' निर्माण करणारी लोकप्रियता त्याच्या वाट्याला येणं शक्य नाही. तसाच काही चमत्कार घडला तर गोष्ट वेगळी. कोणे एके काळी हिंदी सिनेमात नट साठ वर्षं पूर्ण होईपर्यंतसुद्धा नायक म्हणून मिरवायचे. आताच्या नटांना कुठले हे भाग्य लाभायला ? तेव्हा पुढची काही वर्षे शशीच्या दृष्टीनं समृद्धीची आणि कसोटीचीही ठरणार आहेत.

आतापर्यंत 'रोमॅंटिक' नायक हीच त्याची प्रतिमा अलीकडे रूढ होऊ पाहात होती. पण 'जीवनसंग्राम'च्या प्रकाशनानंतर तडफदार नायक म्हणूनही शशीला मान्यता मिळेलसं दिसते. ( याही भूमिकेसाठी शशी कपूरनं केशसंभार कमी करण्याची काळजी घेऊ नये ना ? ) शशी या सिनेमात क्रांतिकारक म्हणून चेहेऱ्यानं रंगेल वा तडफदार वाटत नाही. पण सिनेमात खुबीनं आणि ठासून पेरलेल्या ॲक्शननं त्याला चांगला फायदा मिळवून दिला आहे. शिवाय जोडीला मोठे नटनटी कुणी नसल्यानं शशीला आपलं वर्चस्व सिनेमावर ठेवता आलं आहे.

'राज कपूरची हास्य आणि वेदना एकाच वेळी गुंफणारी अभिनयकुशलता, शम्मी कपूरचा खेळकरपणा, धर्मेंद्रची प्रसन्न तंदुरुस्ती आणि महमूदचं हास्य = शशी कपूर' अशी झोकदार जाहिरात सध्या होते आहे. 'जीवनसंग्राम'नं दाखवलेली नवी वाट हे वर्णन सफल करून दाखवण्याची संधी शशी कपूरला देते का पाहायचं. त्यासाठी मुख्य पथ्य शशी कपूरला उत्तम कथा आणि दिग्दर्शक निवडण्याचं पाळावं लागेल. 'अनाडी'मध्ये असित सेनसारखा दिग्दर्शक लाभूनही सिनेमा अगदीच निष्प्रभ ठरला. हे टाळणं आणि हृषिकेश मुखर्जीसारख्यांच्या सिनेमात काम करण्याचं स्वप्न पुरं करणं या उमद्या नटाला कधी आणि कसं काय जमतं पाहायचं.


■ ■

# शशीकपूर



# दोन आगामी


# 'जान हाजिर है'



'जान हाजिर है' या आपल्या ताज्या चित्रपटात निर्माते विजय आनंद यांनी संपूर्णपणे नव्या रक्ताला वाव दिला आहे पहिल्या चित्रात नवी जोडी नीता आणि प्रेमकिशन दिसत आहेत. प्रेमकिशनला प्रेमनाथ आणि बीना राय या कलाकार मातापित्यांचा वारसा लाभला आहे.

नीताबरोबरचा या चित्रपटातला चेहरा नवाच वाटला तरी तो अनुभवी आहे. 'इश्क इश्क इश्क' द्वारा चंदेरी दुनियेत पदार्पण करणारा हा शेखर कपूर (देव व विजय आनंद यांचा भाचा) इंग्लंड मधली आपली लठ्ठ पगाराची नोकरी सोडून मुंबापुरीत नशी अजमावयाला आला आ

# 'एक गावकी कहानी'





'जेमिनी' चित्रसंस्थेने एकच चित्रपट एका वेळी तीन भाषांमध्ये तयार करण्याचा विक्रम केला आहे.

'एक गावकी कहानी' या हिंदी आवृत्तीचा नायक मध्यभागी दिसत असून, डावीकडे 'येह्लोरम नल्लवरे' या तामिळ आवृत्तीचा नायक मुथुरामन आणि उजवीकडे 'अंध्रुमाची वारे' या तेलगु आवृत्तीचा नायक शोभनबाबू.


– तिन्ही आवृत्तींची नायिका मात्र एकच आहे.

– मंजूळा.

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC-68

# धर्मेंद्र

यालाच काहीजण हॉलीवुडचा
बर्ट लँकेस्टर म्हणतात. म्हणे!



एक खास लेख
—अरुणा अंतरकर

पुढील अंकी

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२
सादशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावक**